
उत्तरायण
भाग : २
डॉ. सुहास पेठे

* उत्तरायण *

भाग : २

(जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ. पेठे यांनी दिलेली उत्तरं)

डॉ. सुहास पेठे
एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* उत्तरायण : भाग २

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : जुलै २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

जीवन प्रत्यक्ष जगताना जिज्ञासेची ज्योत
वर्षानुवर्षं जागृत ठेवून
प्रश्नरूपानं, उत्तरांच्या माध्यमातून
त्या विचारांचा लाभ इतरांना देणाऱ्या
सर्व जिज्ञासू साधकांना –

आणि

प्रश्नांच्या उत्तरांची बुद्धी देणाऱ्या
श्री परमेश्वराला व श्री संतांना –

कृतज्ञतापूर्वक अर्पण...

...सुहास पेठे

उत्तरायण

भाग : २

माणसाच्या शिकण्याच्या प्रक्रियेत जिज्ञासा, शंका, प्रश्न, निरसन यांना मोलाचं स्थान आहे. याची सुरुवात अगदी लहानपणापासून होते. ती प्रक्रिया मनानं जिज्ञासू व्यक्तींच्या बाबतीत उत्तरायुष्यातही सुरू राहाते.

तिच्या स्वरूपात काही वेळा चिकित्सेला एक विशिष्ट अपरिहार्य स्थान असलं तरी ते तिचं उद्दिष्ट नसतं, असू नये. कारण नुसत्या चिकित्सेनं पदरात काही न पडता अखेर 'संशयात्मा विनश्यति' एवढं झालेली कित्येक माणसं आपल्याला दिसतील. मूळ उद्दिष्ट जर ज्ञानप्राप्तीचं असेल, प्रपंचाचं स्वरूप, व्यवहार, शेवट समजून घेऊन, तो नेटकेपणानं करून परमार्थाकडं जाण्याचं असेल तर अशा शंका-प्रश्नांची खूप मदत होते. डोक्यात अडकलेले विचार मोकळे होऊन जीवन व विचारप्रवास सुखरूप होत राहातो.

तेच परमार्थातल्या शंकाप्रश्नांचंही आहे. तिथंही असलेल्या शंकांचं ध्येय हे उत्तर मिळाल्यावर त्यावर विचार करून प्रत्यक्ष कृतीचा-साधनेचा मार्ग चालण्याचं असतं. म्हणजे एकेक पाऊल देवाकडं जात राहाता येतं. अशांती, क्षोभ, संदेह कमी कमी होऊन समाधान-शांती वाढत जाते.

म्हणून इथं शंका-प्रश्नांना शिबिरात, महिन्याच्या उपासनेत एक दिवस व अन्य व्यक्तिगत भेटींत एका मर्यादित स्थान देण्यात आलेलं आहे. या शंकांची उत्तरं काही कुठला अभ्यास करून दिलेली नाहीत. उत्स्फूर्त आहेत, आयत्या वेळची आहेत. फक्त त्यांचं वेळोवेळी ध्वनिमुद्रण, आवश्यक ती निवड व संपादन डॉ. धनंजय, डॉ. सुचेता व अन्य साधक यांनी वर्षानुवर्षं कष्टपूर्वक केलं आहे. प्रश्न विषयवार देण्याऐवजी प्रश्नांबरोबर विषयसूचीही देण्याचा प्रयत्न केला आहे.

ही उत्तरं म्हणजे मी अंतिम शब्द किंवा निकाल समजत नाही. अनेकदा उत्तरांना वेळेच्या व सामूहिकतेच्या मर्यादा असतात. त्यामुळं अनेक मुद्यांचा समावेश उत्तरांत होऊ शकला नाही, हे वाचकांनी कृपा करून समजून घ्यावं अशी

प्रार्थना आहे. माझी भूमिकाही कुणा मार्गदर्शकाची नाही. शोधकाची आहे. शोधताना, जाताना सापडलं ते समोर ठेवलं आहे. म्हणून याला शंकानिरसन म्हटलं असलं तरी काहींचं पूर्ण निरसन कदाचित होणार नाही, पण उत्तराच्या दिशेनं विचारसूर्याचा प्रवास - उत्तरायण - तरी सुरू व्हावं, एवढी नम्र भूमिका आहे.

इथं प्रश्नकर्त्याला नाव द्यावं लागत नाही. घरी संतछाया हॉलमध्ये असलेल्या प्रश्नपेटीत आपली शंका कागदावर लिहून टाकता येते. महिन्याच्या प्रश्नोत्तरसत्राच्या दिवशी पेटी उघडून त्या प्रश्नांची उत्तरं उपासनेच्या वेळीच नेहमीच्या साप्ताहिक निरूपणाऐवजी दिली जातात. त्यामुळं प्रश्न विचारणाऱ्या बरोबरच इतर तशाच शंका असणाऱ्यांचं व भविष्यात तशा शंका येऊ शकणाऱ्यांचंही समाधान होतं.

अगदीच व्यक्तिगत प्रश्न असतील तर त्यांचा समावेश त्यात केलेला नसतो. नुसत्या बौद्धिक शंकांनाही स्थान नसतं. प्रापंचिक व पारमार्थिक असं वेगळं विषयांचं बंधन मुद्दामच ठेवलेलं नाही. कारण दोन्हीही, विशेषत: प्रापंचिक प्रश्न पारमार्थिक प्रवास करणाऱ्याला भेडसावीत असतात. कारण तोच अधिक सावधपणे जगायचा प्रयत्न करतो, असा अनुभव आहे. म्हणून अनेक प्रश्नांच्या विषयांना बंधन दिसणार नाही. त्याचा उपयोग होतो, म्हणून ते तसेच ठेवले आहेत.

अनेक जिज्ञासूंना याचा उपयोग झाल्याचं कळून आनंद वाटला. कुणा जिज्ञासूंना हे सारं असंच उपयोगी पडत राहिलं तर ईश्वरानं केलेल्या कृपेबद्दल मला धन्यता वाटेल. प्रकाशनाशी निगडित सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

- सुहास पेठे

उत्तरायण - भाग : २

प्रश्नानुक्रम...

१. स्वतःच्या तसंच इतरांच्या आजारपणाकडे कसं बघावं ? त्याचा आपल्या परमार्थाला अनेकदा अडथळा वाटतो हे बरोबर आहे का ? आजारपणाचा परमार्थाला काही उपयोग करून घेता येईल का ? ..१३

२. उपाधी म्हणजे काय ?आपण जसजसे सगुणाची उपाधी वाढवीत जातो तशी आपली उपाधी कमी कमी होत जाते,असं महाराजांचं एक वचनआहे, त्याचा अर्थ काय ? ..२२

३. साधना करण्याचं महत्त्व पटलं असूनही ते करताना त्यात सातत्य रहात नाही, त्यासाठी काही उपाययोजना करावी का ? कोणती करावी ? ..२७

४. आपल्या साधनेची चर्चा पूर्णपणे टाळावी का ? ..३३

५. प्रपंचात मुलाचा आजार बरा व्हावा,नोकरी लागावी, घर व्हावं, लग्न व्हावं असे अनेक नवस आपण करतो. बऱ्याच वेळा देव त्या गोष्टी देतोही. पण परमार्थात माझा मीपणा कमी व्हावा, माझी वृत्ती आवरली जावी, माझा अहंकार कमी व्हावा, तुमच्या पायी रहावं अशा रीतीनं भगवंताला मागितलं असता ते मात्र या मानानं होताना दिसत नाही किंवा त्याला फार वेळ लागताना दिसतो. असा फरक आहे का ? ..३५

६. मोक्षप्राप्तीच्या परीक्षेचा निकाल किती कडक लागतो ? त्याचं पासिंग पर्सेंटेज किती आहे ? ..३७

७. एखाद्या ग्रंथाची साधकानं हस्तलिखित प्रत केली असेल तर त्याची पुढील व्यवस्था काय करावी ? तो समाधिस्थळी अर्पण करावा का ? त्यावर आपला नामोल्लेख करावा का ? ..३८

८. चांगल्या चांगल्या गोष्टी, विचार वाचनात आले की, ते मला लोकांना सारखे सांगावेसे वाटतात, हे योग्य आहे का ? अशा वेळी काय करावं ? ..३९

९. हे सर्व जग हे मायाजाळ आहे, हे सर्व कळतं, ते सोडून संन्यास घ्यावा वाटतो. पण पुढं याची जाणीव होते की, आपली कर्तव्यं आपल्याला पार पाडायची आहेत.विषयातून पूर्ण बाहेर पडणं हेही हेही अशक्य वाटतं. अशा अवस्थेत काय करावं ? ..४०

१०. संत मोक्षप्राप्त असतात. त्या संदर्भात पुनर्जन्म, अवतार, अंश असणं, संतत्व येणं यांतला फरक कोणता ? ..४२

११. मृत्यू ही अटळ बाब आहे. आपल्या बरोबरच इतर संबंधित सर्वांचाही मृत्यू अटळ आहे, हे लक्षात येतं.पण हे केवळ शाब्दिक आकलन न रहाता ते पचावं व टिकावं यासाठी कोणत्या प्रकारे अभ्यास करावा ? ..४३

१२. सामान्य माणसाच्या हृदयात नेहमी भगवंत नसतो का ? की फक्त नाम घेतानाच असतो किंवा त्यावेळेला हृदयात येतो ? ..४७

१३. आपल्याला असं दिसतं की, शनीची साडेसाती असताना माणसाला बऱ्याच गोष्टी सहन कराव्या लागतात, नुकसान होतं. विज्ञान तर यांतलं काहीच मानत नाही. मग खरं काय आणि पारमार्थिकदृष्ट्या आपण साडेसाती व ग्रहदशा यांच्याकडं कसं बघावं ? ..४९

१४. सद्‌गुरूंची आपल्यावर कृपादृष्टी आहे, हे आपण कसं ओळखायचं ? आपण त्याला पात्र कसं व्हायचं ? ..५४

१५. जीवनात अयशस्वी झालेली किंवा कुणाशी विशेष न पटणारी माणसं बऱ्याच वेळा देवस्थानं किंवा संस्थानं अशा ठिकाणी आढळतात. काही वेळा स्थानं प्रसिद्ध असूनही तिथं गेल्यावर प्रसन्नता, पावित्र्य किंवा भाव न वाढता उलट कमी होऊन, इथं आपण उगीच आलो असं वाटतं. असं का होत असावं ? ..५५

१६. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर संपत्तीच्या वाटणीत मुलांची-मुलींची भूमिका काय असावी ? ..६१

१७. आजच्या काळानुसार ज्येष्ठ नागरिकांना परदेशी किंवा परप्रांतात मुलांकडं तीन-चार महिने किंवा काही वेळा दीर्घकाळही रहायला जावं लागतं. त्यावेळी याकडं त्यांनी कसं पहावं व साधनेचं रूटीन कसं ठेवावं ? ..६३

१८. मला साधनेचं महत्त्व पटलेलं आहे. माझं वय पंचेचाळीस वर्षं आहे. माझी सांपत्तिक स्थितीही बऱ्यापैकी आहे. आमच्याकडं स्वेच्छा निवृत्ती योजनाही आहे. मी निवृत्ती घ्यावी का किंवा याचा विचार कसा करावा ? ..६५

१९. मी उपासना नियमितपणे करतो. पण पैसा, व्यवसाय, विवाह इत्यादी गोष्टींची मला काळजी लागते. कधीकधी यांतल्या काही गोष्टी उदाहरणार्थ अपेक्षेप्रमाणं काही वेळा व्यवसाय चालूनही काळजी कमी होत नाही. याला काय करावं ? ..६९

२०. धर्म, कट्टरता, कर्मकांडं, विज्ञान यांना मुक्तीच्या प्रवासात किती स्थान आहे ? ..७५

२१. माणसाच्या जीवनात आणि उपासनेत विशिष्ट काल, विशेषतः संधिकाल यांचं महत्त्व काय आहे ? ..७९

२२. आळसामुळं होणारं नुकसान कळतं. तो कमी व्हावा असंही वाटतं. पण तो नाहीसा करायला काही सोपे व्यावहारिक उपाय आहेत काय ? ..९१

२३. अनेकदा निरूपणं, बोधवचनं, विवरणं यांतून काय करायला हवं, हे लक्षात येतं. पण आता वय झाल्यामुळं त्यांतल्या अनेक गोष्टी करणं अवघड झालं आहे. अशा वेळी काय करावं ? ..९५

२४. आपल्याकडं मुलगा असणं, मुलगी असणं किंवा मूलबाळ नसणं, याबाबतीत त्यात्या पालकांच्या पाप-पुण्याचा अर्थ लावला जातो. सामाजिकदृष्ट्याही अनेक प्रतिक्रियांना सामोरं जावं लागतं. याबाबतीत पारमार्थिकदृष्ट्या कोणता विचार करणं योग्य आहे ? ..९६

२५. मला कधीकधी माझ्या गुरूंचं स्वप्नामध्ये दर्शन होतं. त्याचा अर्थ कसा घ्यावा ? ..१०१

२६. मुलांनी परदेशी नोकरी स्वीकारावी काय ? अशावेळी आईवडिलांची भूमिका काय असावी ? अशावेळी मुलांची कर्तव्यं कोणती ? ..१०३

२७. जग संतांशिवाय असणं शक्य नाही, असं महाराज तसंच अनेक संतही म्हणतात . आजही अनेक संतांची माहिती कळून त्यांच्याकडं अनेक साधक, श्रोते लोक जातात पण कधी पदरात काही पडत नाही, अनेकदा फसगत होते मग खरे संत हयात आहेत का ? आणि त्यांना कसं ओळखावं ? ..१०९

२८. नामासारखा परमार्थाच्या साधनेचा कुठला मार्ग स्वीकारला की, नेहमीचं आयुष्य जगताना उदाहरणार्थ शॉपिंग, ट्रीप, वैवाहिक जीवन, मनोरंजन, खाणं, गप्पा, नातेवाईकांची फंक्शन्स - अशा गोष्टी अपरिहार्य असल्या तरी त्या करताना अपराधीपणाची भावना वाटते. हे बरोबर आहे का ? वासना, विकार व अहंकार यांचं या मार्गात स्थान कोणतं ? या साऱ्या बाबतीत परमार्थात काय अपेक्षित असतं ? ..१११

२९. मृत व्यक्तींचे फोटो घरात लावणं अशुभ असतं, असं म्हणतात. ते खरं आहे का ? त्याबाबतीत काय करावं ? ..११६

३०. विवाह करण्यापूर्वी विवाहाकडं बघण्याचा आमचा (मुलाचा-मुलीचा) दृष्टिकोन काय असावा ? ..११७

३१. एका बाजूला 'देव भेटे याचि देही' ही तळमळ आणि ध्येय बाळगणं आणि 'मोक्ष देई का घाली संसारी' अशी कृपेसाठी अनंत काळ वाट पहाण्याची तयारीही ठेवणं, यांत ध्येय असणं आणि अधीरता तर नसणं, यांचा मेळ कसा घालावा ? ..११९

*

*** मुखपृष्ठ संकल्पना ***

सागराचं अथांग हलतं पाणी विचारांचं सततचं मंथन दर्शवतं. पाण्यावरच्या लाटा, जगताना निर्माण होणारे विविध व निरंतर प्रश्न दर्शवतात. तर लाटांवर उत्तरांच्या रूपानं पडणारे सूर्याचे किरण, त्या प्रश्नांवरचा ईशकृपेचा प्रकाश दर्शवतात.

* *

उत्तरायण - भाग : २

वि ष य सू ची

(संदर्भासाठी विषयापुढे प्रश्नक्रमांक दिला आहे.)

- अवतार : १०, अंशावतार/ १०, संत/१०
- अशुभता : मृत व्यक्तींचे फोटो लावणे /२९
- आजारपण : बघण्याचा दृष्टिकोन/१.१,अडथळा/१.२, उपयोग/१.३
- आळस : नुकसान व उपाय/२२
- उपाधी : म्हणजे काय/२.१, वाढणं, कमी होणं/२.२
- काल : वेगवेगळे काल/२१, संधिकाल/२१, महत्त्व/२१
- काळजी : काळजी व उपासना/१९
- कृपा : सद्गुरूंची कृपादृष्टी ओळखणं/१४.१, पात्र होणं/१४.२
- कर्मकांडं : मुक्तीमधलं स्थान/२०
- गुरू : स्वप्नातलं दर्शन-अर्थ/२५
- चांगल्या गोष्टी : लोकांना सांगण्याची वृत्ती/८.१, योग्य कृती/८.२
- देवस्थानं : तेथील माणसं, वातावरणं/१५
- धर्म : मुक्तीमधलं स्थान/२०
- ध्येय : अधीरता/३१
- नवस : मागणं-परमार्थातलं/५
- परदेश : ज्येष्ठांचं वास्तव्य/१७.१, त्यावेळचा दृष्टिकोन/१७.२, तेथील साधना/१७.२, परदेशातील नोकरीबद्दलचा दृष्टिकोन/२६.१, परदेशी रहाणाऱ्या मुलांची कर्तव्यं/२६.३

- भगवंत : हृदयातलं स्थान/१२
- माया : मायाजाळ-कर्तव्यं/९, संन्यास घेणं/९, योग्य कृती/९
- मूल : असणं, नसणं-पारमार्थिक दृष्टिकोन/२४
- मोक्ष : प्राप्तीची परीक्षा-निकाल/६.१, पासिंग पर्सेंटेज/६.२, मोक्षसाधना व धर्म, कट्टरता, कर्मकांडं, विज्ञान/२०
- मृत व्यक्ती : फोटो लावण्यातली अशुभता-दृष्टिकोन/२९
- मृत्यू : अटळता, अभ्यास, दृष्टिकोन/११
- वय : वयामुळं साधना अवघड होणं, त्यावर मार्ग/२३
- वाटणी : वडिलोपार्जित संपत्तीची, त्यात मुलांची भूमिका/१६
- विवाह : भावी विवाहाकडं बघण्याचा दृष्टिकोन/३०
- विज्ञान : मुक्तीच्या प्रवासातलं स्थान/२०, विज्ञान व साडेसाती/११
- संत : अवतार, संतत्व/१०, देहातील संत - खुणा/२७
- संधिकाल : महत्त्व, प्रकार व उपासना/२१
- संस्थानं : तेथील माणसं, वातावरणं/१५
- साधना : साधनेची चर्चा/४, त्यात सातत्य न रहाणं - उपाय/३.१,३.२, स्वेच्छानिवृत्तीनंतरची/१८, साधना करताना नेहमीच्या जीवनातली अपराधी भावना व उपाय/२८.१, साधनेतलं वासना, विकार, अहंकार यांचं स्थान/२८.२, याबाबतीत अपेक्षा/२८.३
- स्वप्नं : गुरूंचं स्वप्नदर्शन-अर्थ/२५
- स्वेच्छानिवृत्ती : स्वीकार, दृष्टिकोन, साधना/१८.१
- शनी : साडेसाती-पारमार्थिक दृष्टिकोन/१३
- हस्तलिखित ग्रंथप्रत : पुढील व्यवस्था/७

*

१. स्वतःच्या तसंच इतरांच्या आजारपणाकडे कसं बघावं ? त्याचा आपल्या परमार्थाला अनेकदा अडथळा वाटतो हे बरोबर आहे का ? आजारपणाचा परमार्थाला काही उपयोग करून घेता येईल का ?

आपल्याला आज आजारपणाकडे बघण्याचा चांगला दृष्टिकोन येण्याची आत्यंतिक गरज निर्माण झाली आहे, हे खरं आहे. आहार, व्यायाम, जीवनपद्धती अशा गोष्टींची काळजी घेऊनसुद्धा आपल्या वाट्याला कुठलं आजारपण येणार नाही, किंवा आजपर्यंत मी निरोगी राहिलो म्हणजे मी तसाच पुढंही राहू शकेन असं म्हणणं धाडसाचं ठरेल. याचं कारण असं की, आजारपणाला कारणीभूत असलेल्या अनेक गोष्टी प्रदूषणं, विवेकहीन वैज्ञानिक संशोधनं, भोगवाद व चंगळवाद यांना बळी पडणं, ऐहिक सुखाच्या भ्रामक कल्पना, शारीरिक श्रमांच्या अभावाची ठेवण असलेली बऱ्याच समाजाची जीवनपद्धती - अशा असंख्य गोष्टी आजारांच्या या पाहुण्याला आमंत्रण देणाऱ्या ठरतात याची कल्पनाही अनेकांसमोर नसते. अर्थात त्यामुळं परिणाम टळत नाहीत. संपूर्ण जीवन निरामय राहाणं व नैसर्गिक मृत्यू येणं ही आता हळूहळू अपवादभूत भाग्यं ठरत चालली आहेत.

या साऱ्या पार्श्वभूमीवर आजारांकडं बघण्याचा विधायक व समजूतदार दृष्टिकोन अपेक्षित करणारा हा प्रश्न मी स्वागतार्ह समजतो. प्रथम एक लक्षात घेऊ की, आजार म्हणजे शरीरातला कुठलातरी बिघाड अशी सर्वसामान्य समजूत असली आणि त्यामुळं त्याची भीती किंवा त्यापासून पळण्याचा प्रयत्न याची वस्तुतः गरज नाही. आजार बिघाड दाखवीत असला तरी खरं तर आपलं शरीरयंत्र उत्तम चाललेलं असण्याचंच ते लक्षण आहे. हे कसं हे पाहू.

समजा साधं पोट बिघडलेलं आहे. आजार आहे. त्रास होतो आहे हे खरं असलं तरी त्याचा अर्थ असाही आहे की, मुळात आपलं पोटाचं यंत्र चांगलं आहे, कार्यक्षम आहे, ते योग्य प्रकारचं - योग्य वेळी घेतलेलं अन्न उत्तम रीतीनं पचवू शकतं. हे त्याचं काम एरवी बारमाही सुरू आहे. प्रश्न आहे तो ते यंत्र बरोबर असल्यामुळंच एखादी चुकीची वस्तू, चुकीच्या वेळी किंवा चुकीच्या पद्धतीनं आपल्याकडूनच खाल्ली जाण्याची प्रतिक्रिया ही आपली यंत्रणा आपल्याला देत आहे. ती यंत्रणा कार्यक्षम असल्याचं आणि आपला पुढचा प्रकृतीचा धोका टाळण्याची आपल्याला संधी देत आहे.

एखादा विषारी पदार्थ असेल किंवा अंमली पदार्थ असेल तर त्याचे शरीरावर आणखी दुष्परिणाम होऊन आपल्याला मोठ्या संकटाला सामोरं जावं लागू नये म्हणून आपलीच शरीरयंत्रणा त्वरित कामाला लागते आणि असा विषारी पदार्थ पोटातून बाहेर फेकला जातो. अशावेळी उलट्या होणं हा आजार वाटला तरी सावध होणं, अयोग्य गोष्टी टाळणं, योग्य औषध योजना करणं किंवा साधं अनशापोटी राहाणं - अशा अनेक उपाययोजना करण्याची हा आजार आपल्याला संधी देत आहे.

सारांश, आजार हे संकट आणि भीतीचा विषय नसून सुधारण्याची व तंदुरुस्त होण्याची संधी आहे. आता याच उदाहरणात पाहिलं तर, याच एका साध्या आजारपणामुळं आपल्याला किमान खालील गोष्टींची संधी आहे -

१. आपल्याला कळतं की, शरीरयंत्रणा व्यवस्थित आहे. कारण बिघडलेली यंत्रणा बिघाडही दाखवू शकत नाही.

२. आपल्या खाण्यात आलेल्या पदार्थांतलं नक्की काय चुकलं, कोणतं आरोग्याला हानिकारक आहे. याचं ज्ञान आपल्याला पुढं सावध रहायला

नक्की उपयोगी पडेल.

३. खाण्याची वेळ, आग्रह, हवामान-प्रदेश यांना प्रतिकूल असलेलं खाणं, बेसावधता - अशा अनेक गोष्टींत शिकण्याची संधी आली आहे.

४. बिघाडाच्या सूचना देणारी जी यंत्रणा शरीरामध्ये आहे ती आपल्या बाबतीत चांगली कार्यक्षम आहे. म्हणजे असं की, अनेक आजारांत बिघाड कळण्याची जी यंत्रणा आहे, ती चांगली नसेल तर बिघाड होऊनसुद्धा ते बराच काळ लक्षात येत नाहीत आणि त्यामुळं ते आजार वाढून बसतात, अनेकदा आटोक्याबाहेर जातात. तसं आपल्या बाबतीत झालेलं नाही हे चांगलं नाही का ?

५. याचाच अर्थ संवेदनांची आणि मेंदूतल्या संबंधित प्रक्रियांची यंत्रणाही आपल्या बाबतीत चांगली आहे. इत्यादी.

आता एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेऊ की, याच नव्हे तर अनेक मोठ्या आजारांच्या बाबतीतसुद्धा दुरुस्तीची यंत्रणा उपलब्ध असते. आधी म्हटलं तसं, उपास करण्यापासून त्यावरच्या औषधयोजनांपर्यंत अशा तऱ्हेच्या दुरुस्ती करून ते ते आजार बरे करता येतात, काही आटोक्यात ठेवता येतात. याचा विचार अशासाठी करायचा की, आपल्या आजारांना औषधं आहेत व त्यांतून मनुष्य बरा होऊ शकतो. असे आजार आपल्याला झाले ही गोष्ट चांगली नव्हे का ? कारण असेही अनेक आजार आहेत की ज्यांना औषधंच नाहीत. त्यांतले काही तर इतके गंभीर आहेत की ते सोसावेही लागतात व मृत्यूही पत्करावा लागतो. म्हणून औषध असलेला आजार असणं हे ज्यांच्या बाबतीत घडतं त्यांनी त्यापुरतं तरी स्वतःला भाग्यवानच समजावं. म्हणजे अस्वस्थताही जाईल, पळापळ टळेल, भीतीही वाटणार नाही.

ज्यावेळी असाध्य आजार होतात तेव्हा मनुष्याच्या कर्तृत्वाची

जी झेप आहे त्याच्या अंतिम मर्यादा निसर्ग दाखवून देत असतो, त्याकडं लक्ष देण्याची गरज आहे हे ओळखावं. कदाचित ते कर्तृत्व किंवा त्याचा अहंकार वैयक्तिक असेल किंवा मनुष्यसमाजाचा असेल. त्याची मर्यादा निसर्ग दाखवून देतो आणि म्हणतो, यापलीकडे तुम्ही जाऊ शकत नाही. तुमचं कर्तृत्व इथं लटकं पडतं आहे.

अशाही असाध्य आजारांच्या बाबतीत याचा अर्थ असा घेता येईल की, याच्यापलीकडं मी जाऊ शकत नसलो तरी याच्या अलीकडं राहू शकतो. हल्ली असे बरेच आजार आहेत की, ते कधी बरे होत नाहीत. ते माणसाला मृत्यूची जाणीव देत असले तरी काही चांगला वेळही मध्ये देतात. त्या मिळालेल्या काळामध्ये योग्य औषधपाण्यानं त्या आजारांचं व्यवस्थापन - मॅनेजमेंट करून अजूनही माणूस कार्यशील राहू शकतो. अशा आजारांच्या बाबतीत तर एवढी समजूत दाखवली तर मिळालेल्या थोड्या पण मोलाच्या काळाचं उत्तम चीज करता येणं शक्य आहे. त्यामुळं स्वतःलाही निराशा नाही आणि इतरांनाही आपल्यापासून त्रास नाही.

आजारपणांकडं बघण्याचे हे महत्त्वाचे दृष्टिकोन आहेत. आता थोडं पारमार्थिकदृष्ट्याही पाहू. त्या बाबतीत सर्वांत अडचणीचा अहंकार. त्याच्याशी लढण्यात मोठी संधीच आजार देतो. कारण आपण स्वतःला खूप चांगलं मेंटेन वगैरे केलेलं आहे अशा समजुतीत आपण असतो. तुम्ही काय मेंटेन केलेलं आहे आणि तो काय करू शकतो हे तो एका रात्रीत दाखवून देतो. अहंकाराला नुसता धक्का देण्याचंच नव्हे तर वेळी नेस्तनाबूत करण्याचं सामर्थ्य आणि संधी असे आजार माणसाला देतात.

आपण खूप सहनशील आहोत अशी प्रपंचात अनेकांची समजूत असते. ती तशी खरीही असेल. प्रपंचात आपण तेवढे त्रास सहन करतो

आणि बाकीचे सगळे आपल्याला त्रास देत असतात आणि आनंदातही राहतात. मी म्हणून हे सगळं सहन करत असतो असं अनेकांना वाटत असतं. आजारपणात आपल्यामध्ये सहनशीलता खरी कितपत आहे हे तपासण्याची संधी आपल्याला येते. मुळात हा अनपेक्षित आघात आपण किती सहन करू शकतो, त्यामुळं होणाऱ्या वेदना कितपत सहन होतात, त्यामुळं होणाऱ्या गैरसोयी किती सहन होतात, तपासण्या-उपचार-औषधं-अनेक प्रकारच्या वेळी आजारापेक्षा जास्त वेदनादायक ट्रीटमेंट हे सारं आपल्याला किती सहन होतं - ही सारी आपल्या सहनशीलतेची परीक्षा असते.

या सहनशीलतेत आणखी एक अनपेक्षित पण बहुधा अपरिहार्य गोष्ट सहन करावी लागते. ती म्हणजे तुमचे आजार कळल्यावर तुम्हाला भेटायला येणारे लोक, विशेषतः असंख्य प्रकारच्या उपचारांचे त्यांनी दिलेले सल्ले. ते शांतपणे ऐकून घेणं, प्रयोगांची तयारी दर्शवणं, त्यासाठीचे त्रास किंवा न केल्यास त्यावरच्या त्यांच्या प्रतिक्रियांचे त्रास सहन करणं, परस्परविरोधी सल्ल्यांना सामोरं जाणं हे सामान्य सहनशीलतेचं काम नाही. यात विशेष हे असतं की, लोकांनी दिलेले सल्ले हे त्यांच्या अनुभवापोटी, प्रेमापोटी दिलेले असतात. अनेक लोकांनी ऐकलेलं, कुठेतरी-कुठल्यातरी पुस्तकांत, मासिकांच्या पुरवण्यांत वाचलेलं त्यांना सांगायचं असतं. आपण बरं व्हावं अशीच त्यांची इच्छा असते. पण या सगळ्याला सामोरं जाणं आपल्याला शक्य नसतं तरीही त्यांचं मन सांभाळण्याची कसरत करावी लागते. यात सहनशीलतेची एक वेगळी परीक्षा होते. साधना तर सहनशीलतेशिवाय होणारच नाही. तिची संधी या आजारपणामुळं आहे. फक्त हे समजून घ्यायची गरज आहे.

आजाराचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा करून घेण्यासारखा

फायदा म्हणजे आजवर आपलं कर्तृत्व, बुद्धिमत्ता, मिळत गेलेली यशं, अनुकूलता, सहकार्यं, साधत गेलेली समृद्धी अशा काही गोष्टींमुळं माणसाला ईश्वराच्या अस्तित्वाची, कर्तृत्वाची, कृपेची जाणीव विसरण्याची मोठी शक्यता असते. असा अनुभवही अनेकांच्या बाबतीत आपल्याला आला असेल. पण निसर्गातल्या अतिवृष्टी, भूकंप इत्यादी नको वाटणाऱ्या पण आकस्मिकपणे समोर येणाऱ्या प्रसंगांत जशी निसर्गाच्या शक्तीची जाणीव माणसाला व्हावी तशी अशा गंभीर, असाध्य आजारांच्या प्रसंगी ईश्वराच्या - किमान मानवी क्षमतेपलीकडच्या कुठल्यातरी शक्तीची - जाणीव मिळू शकते. आजार ती देतो. घेणारा सावध व तत्पर असला तर आजार आपत्ती न ठरता इष्टापत्ती ठरतो. ईश्वराची ओळख करून देऊन माणसाचं अंतिमतः कल्याणच करून जातो.

हे सारं झालं स्वतःच्या आजाराकडं कसं बघावं यासाठी. आजारातच नव्हे तर आजाराच्या उपचारांतून जायला वेळी असाध्य असलेल्या आजारांना तोंड देऊन अखेर मृत्यूशी हस्तांदोलन करायला लागणारं शौर्य देणारा आजार हा एक अनुभव आहे. यात शरीरदुःखाची बाजू असली तरी मनोबलाची बाजूही खूप मोठी आहे. हा सारा शौर्याचा अभ्यास आपल्याला परमार्थात उपयोगी पडेल. कारण परमार्थात याहीपेक्षा काही मोठं ओलांडायचं आहे. तिथं देहदुःखच नव्हे तर भवदुःख आहे. भवसागर ओलांडायला हा सारा दृष्टिकोन उपयोगी पडेल.

इतरांचे आजार पहाणं हे स्वतः आजार सोसण्यापेक्षा वरवर पहाता सोपं वाटलं तरी तितकं सोपं नाही. आपण आत्ता म्हटलं तसं, आजाराकडं बघण्याचा एक विधायक, समजूतदार, सहनशील, सश्रद्ध असा पूर्ण सशक्त दृष्टिकोन घेऊन आपण बघता बघता आजार सोसू शकू. पण दुसऱ्याच्या आजारांच्या बाबतीत मात्र ते पहाणं ही एक कसोटी

आहे यादृष्टीनं त्याच्याकडं बघावं. खूपदा आजारातली माणसाची परस्वाधीनता, उपचार, औषधं-तपासण्या, पेशंटला नेणं-आणणं, लोकांचं येणं-जाणं हे सगळं खूप कष्टदायक असतं. पेशंटला होणाऱ्या वेदना पहाणं हीसुद्धा आपली एक कसोटीच असते. बरं करणं तर हातात नसतंच. शिवाय आपण वर म्हटला तसा विधायक दृष्टिकोन त्याच्याकडं नसेल तर त्या माणसाची होणारी चिडचिड, तगमग, इतरांना - परिस्थितीला दोष देणं, औषधांना कंटाळणं-चुकवणं, सतत तक्रारी करीत रहाणं अशा असंख्य गोष्टी आपल्याला शांतपणे सहन कराव्या लागतात. ही आपली एक कसोटीच असते.

इतरांचे आजार पहाताना एक गोष्ट पक्की कळते की, आजाराला काही शेअरिंग नाही. सहन करण्याला कुणाची मदत मिळू शकत नाही. जागापाण्याची उणीव, पैशाची चणचण, माणूसबळाचा अभाव अशा अनेक गोष्टींना शेअरिंग आहे. उपाय आहेत. मदती करता येतात. पण आजारात काही नाही. आजार ज्याचा त्याला. अशा वेळी मनुष्य खरोखर एकटा आहे या अपरिहार्य वस्तुस्थितीची एक उत्तम जाणीव होते. ती व्यवहारातच नव्हे तर परमार्थातही फार उपयोगी पडते. इतरांच्या आजारातली दुःख आपल्याला काही वाटून घेता येत नाहीत. एकवेळ सुख वाटून घेता येतं. त्यावेळी दुःखाची एकांताकडं नेण्याची प्रवृत्ती विचार करणाऱ्यालाच शिकता येईल.

आजाराचे परमार्थाला असे अनेक उपयोग आहेत. चांगल्या दृष्टिकोनानं आपल्या आजारांचं दुःख आपण गिळू शकतो, ते बाजूला ठेवता येतं, कष्ट सहनशीलतेनं सोसता येतात, परीक्षा म्हणून सगळ्याकडं पहाता येतं पण इतरांचे आजार पहाताना यांतली कुठली संधी आपल्याला नसते. स्वतःला आजारातून जावं न लागतासुद्धा दुसऱ्यांच्या आजारांतून

आपण कितीतरी शिकू शकतो. आजार खरोखर कुणालाच नको आहेत पण शिकणारा दुसऱ्यांच्या आजारांतूनसुद्धा शिकू शकेल हा केवढा दृष्टिकोन आहे याची कल्पना केलेली बरी. त्यासाठी त्याला स्वतःला आजारी पडण्याचीसुद्धा गरज नाही. इतरांचे आजारसुद्धा आधी सांगितलेलं सगळं आपल्याला शिकवू शकतात. हे सारं म्हणजे दुसऱ्यानं अभ्यास करावा आणि आपण पास व्हावं त्यातला प्रकार आहे.

अशाही परिस्थितीत अर्थात आपण अनेक गोष्टी करू शकत असतो. त्या करण्याचे प्रयत्न करावेत. त्यांच्या आजारांपोटी होणाऱ्या शारीरिक कष्टांपासून ते त्यांना सुखाच्या होणाऱ्या गोष्टी करण्यापर्यंत कितीतरी गोष्टी करता येण्यासारख्या असतात. लौकिक मदती तर आहेतच पण अगदी त्यांच्यासाठी प्रार्थना करण्यापासून आपल्या गुरूंकडे त्यांच्यासाठी शब्द टाकण्यापर्यंत आपल्याला सर्व काही करता येतं. त्यांच्यासाठी निःस्वार्थीपणे सोसलेली झीज आणि झळ हा इतरांच्या आजारांतला आपला परमार्थच आहे. तो आनंदानं केला तरी साधना होऊन जाते.

आजारासारखी आरोग्याची जाणीव देणारी दुसरी गोष्ट नाही. अन्यथा काही होत नसलं म्हणजे - असं काही होऊ शकतं, आपल्यालाही आजार होऊ शकतो - असा विचारही माणसाच्या मनात येत नाही. इतकं बेसावधपण असतं. एकदा आरोग्याची जाणीव झाली - भले ती आपल्या आजारानं होवो किंवा इतरांच्या आजारांच्या निमित्तानं होवो किंवा आपण असं काही वाचून सावध झालो म्हणून होवो - ती आरोग्याची जाणीव शरीराबद्दलच नव्हे, तर ती शरीरयंत्रणा अक्षरशः मोफत आपल्याला देणाऱ्या निसर्गाविषयी - मातापित्यांविषयी - अंतिमतः परमेश्वराविषयी कृतज्ञता उत्पन्न करायला कारणीभूत ठरू शकते.

ही कृतज्ञता माणसाला सावध तर करीलच पण त्याच्या नेहमीच्या

कदाचित भोगवादी असलेल्या, स्वार्थी असलेल्या, संकुचित असलेल्या जीवनाची सगळी दिशाच पालटून टाकू शकेल. बरं झाल्यावर सारं विसरून जाणारे कृतघ्न लोक आपण सोडून देऊ. पण कृतज्ञ लोक मात्र त्यांच्या जीवनाचा यातून विधायक पालट, नव्हे स्वर्गच करू शकतील.

जगात आजार आहेत - स्वतःला आहेत इतरांना आहेत आणि एकंदरीत रहाणीमान पहाता ते तसेच राहतीलही. पण ते आजार वाट्याला आलेच तर अप्रिय, निराशाजनक गोष्ट न ठरता आपलं जीवन चांगल्या दिशेला त्यानिमित्तानं कसं वळवावं याचे प्रसंग ठरतील. परमार्थाला, साधनेला आजारांचा अडथळा नाही उलट उपयोग आहे, हे यावरून लक्षात येईल.

यात आणखी एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आरोग्य असलं, तसं ते अनेकांकडं असतं, तरी त्याचा उत्तम वापर जो तो करतोच असं नाही. आजार किंवा आजाराकडे बघण्याचे असे दृष्टिकोन त्याला ही सावधता जरूर देऊ शकतील. मग आरोग्याचा उपयोग चैन किंवा चंगळ यांकडं न होता सेवा आणि भक्तीकडं होऊ शकेल.

अनेकदा आपल्याकडं असलेल्या आजारांची दुःखद जाणीव असते पण असलेल्या आरोग्याची जाणीव नसते. म्हणजे समजा पन्नास अवयव आहेत - यंत्रणा आहेत त्यांतल्या एक-दोनमध्ये बिघाड झाला तरी अठ्ठेचाळीस शिल्लक असतात. आजारी असतानाही या अठ्ठेचाळिसांचा वापर मी किती उत्तम करतो हे पहावं. तेवढ्यानंसुद्धा आजार असूनही आल्याजन्माचं सार्थक होईल. मग आजारपणाचा त्रासही नाही आणि ताणतणावही नाहीत. उलट स्वतःला आणि इतरांना स्वास्थ्यही आहे आणि उपयोगही आहे.

*

२. उपाधी म्हणजे काय ? आपण जसजसे सगुणाची उपाधी वाढवीत जातो तशी आपली उपाधी कमी कमी होत जाते,असं महाराजांचं एक वचन आहे, त्याचा अर्थ काय ?

माणसाच्या ठिकाणी ज्या विलक्षण क्षमता आहेत त्यांत उपाधी ओळखणं, गरजेप्रमाणं त्या निर्माण करणं, वेळी कमी करणं आणि सर्वांत विशेष म्हणजे निरुपाधिक होणं, ही एक मोठी क्षमता आहे. उपाधी म्हणजे मूळ वस्तू नव्हे. मूळ वस्तूला चिकटून राहणारी - क्वचित उपयोगी, क्वचित उपद्रवकारक ठरणारी - थोडी सावलीसारखी गोष्ट आहे. माणसानं एखादी पदवी किंवा मान्यता मिळवली की तिला आपण उपाधी म्हणतो. त्याच्या नावामागं किंवा पुढं ती लावतो. मग ते नामदार असेल, डॉक्टर असेल. मनुष्य तोच असतो पण त्याची थोडी ओळख ती उपाधी देते. पण तो मनुष्य, माणूस म्हणून त्यामुळं वाढत किंवा कमी होत नाही. ती उपाधी न लावली तरी तो तसाच राहतो.

लौकिकात उपाधींनी मानमान्यता, अधिकार, पद अशा गोष्टींचे फरक पडतात. उपाधींची खरी परीक्षा परमार्थात होते. शिक्षण आलं, घर आलं, पैसा आला, पद आलं की माणसाची सामाजिक परिस्थिती अधिक समृद्ध मानली जाते. यांनी लौकिक व्यवहारात फरक पडतो. पण आपल्या लक्षात येईल की, तो बाह्यांगाचा असतो. म्हणजे असं की, अशा उपाधी असलेल्या माणसाला बाहेर ओळखलं जाईल, मान्यता मिळेल, अधिकार दिला जाईल पण क्षणभर अंतरंगाचा विचार करू. त्यात साधी माणुसकीसारखी एक गोष्ट घेऊ.

वरच्या सगळ्या उपाधी असलेला मनुष्य अंतरंगातल्या या माणुसकीत, करुणेत, प्रेमळपणात कुठं असेल ते या बाह्य उपाधींवरून

सांगता येईल का ? उलट असं आढळेल की, अशा तऱ्हेनं उपाधींनी समृद्ध माणूस साधारणतः माणुसकीच्यासारख्या खऱ्या महत्त्वाच्या आणि उपाधीरूप नसलेल्या गोष्टींच्या बाबतीत मात्र कितीतरी खालच्या स्तरावर असलेला आढळेल. म्हणून तर जगामध्ये एवढी मोठी विषमता आढळून येते. म्हणून माणसाचं खरं काम उपाधींचं योग्य स्थान ओळखणं, वेळी त्यांचा खऱ्या विकासाला - उदाहरणार्थ माणुसकी - उपयोग करून घेणं, या विकासाच्या आड येणाऱ्या उपाधींचा त्याग करणं, हे आहे.

ही उपाधींची पार्श्वभूमी आहे. ती आपल्याला माहिती असली म्हणजे प्रपंचाचं, परमार्थाचं ध्येय कळतं. त्याची सांगड कशी घालावी हे कळतं. दोन्हींचा समतोल विकास साधून खऱ्या मानवी उद्धाराकडे कसं जावं याची अधिक बरोबर कल्पना येते. त्यातला एक भाग म्हणजेच सगुणाची कल्पना हा होय. आपल्याकडं जी सगुणाची निर्मिती केली आहे, म्हणजे वेगवेगळ्या देवता, मूर्ती, त्यांची मंदिरं, पूजा-अर्चा, स्तोत्रं - या साऱ्या गोष्टींची निर्मिती केली आहे, ती विचारपूर्वक केलेली आहे. अनेकजण मानतात तसा तो भाबडेपणा नसून उपाधींचा निरुपाधिकतेकडे जाण्यासाठी योग्य वापर करण्याची ती युक्ती आहे. ते कसं ते पाहू.

माणसाला वेष लागेल, घर लागेल, अन्नपाणी लागेल. या साऱ्या गरजेच्या गोष्टी आहेत किंबहुना त्यावर देह जगणं अवलंबून आहे, हे खरं. पण माणूस स्वतःला फक्त देहच समजायला लागला की, ही सारी त्याची ध्येयं बनतात. इतकंच नव्हे तर त्यापलीकडं काही नाही अशी त्याची पक्की समजूत होत जाते. मग एका घराची चार घरं होतात, साठे-संचय निर्माण होतात, इस्टेटी निर्माण होतात. मग त्यांतून आता उपाधी निर्माण होतात. त्या आता माणसाला अडकवून अखेर संपवून टाकतात. गरजेतला आणि उपाधींतला हा फरक लक्षात घेण्याची क्षमता माणसामध्ये आहे.

म्हणून त्यावर एक उपाय सगुणाचा निर्माण झाला.

स्वतःसाठी घर बांधलं, प्रपंच-मूल-बाळ झालं, त्यासाठी अंगडं-टोपडं केलं, वस्त्रं घेतली हे ठीक आहे. पण तो माणूस आहे, पशुपक्षी नव्हे. ते इथंच थांबतील. माणूस पुढं गेला पाहिजे. तो देव होण्यासाठी जन्माला आलेला आहे, याची जाणीव त्याला देणारी जीवनपद्धती म्हणजे सगुण आणि त्याची उपासना होय.

आता वरची कामं झाली की, स्वतःच्या घराबरोबर देऊळ बांधणारे किती असतील ? मूर्ती घडवणारे किती असतील ? देवाला वस्त्रं करणारे किती असतील ? ते असावेत. त्यांना प्रपंचाच्या उपाधींपलीकडं जायचं कळलेलं आहे. आता सगुण ही एकच दिशा आहे असं नव्हे. हेच घर ते कुणा बेघरालाही बांधून देतील, निराधार मुलालाही सांभाळतील, त्यालाही वस्त्रं देतील. सगुणाचं करण्याचा खरा फायदा हा की, मी माझ्या प्रपंचाच्या उपाधींतून बाहेर पडतो, पलीकडं जातो. जे गरजेचं आहे. तेव्हाच मला हे सगुणाचं काम शक्य आहे. त्यांत पुन्हा ते श्रेष्ठ अशासाठी मानलं की, दुसऱ्या माणसाचं करण्यात काही मर्यादा येतात, काही अपेक्षा येतात आणि पुन्हा प्रपंच सुरू होतो. मूर्ती काहीच म्हणत नाही. फक्त ती ज्याचं प्रतीक त्या देवाचं स्मरण करून देते. अन्यथा सगुण हीसुद्धा उपाधीच आहे, हे ओळखण्याएवढे आपले पूर्वज नक्कीच थोर होते.

सगुणाचं, मूर्तीचं, देवाचं करताना आपोआपच आपल्यावरचं आपलं लक्ष कमी होतं. आपली शक्ती, बुद्धी, पैसा अशा अनेक गोष्टी स्वार्थापेक्षा परार्थासाठी वापरल्या जातात. एक घर बांधलं तर त्यात कदाचित एका कुटुंबाची सोय होईल. ते सुखी असेलच याची पुन्हा खात्री नाहीच. पण एक देऊळ बांधलं तर त्यात नुसत्या एका सगुण मूर्तीची सोय होत नाही तर हजारो भक्तांना सत्प्रवृत्त करणाऱ्या उपासनेच्या स्थानाची निर्मिती

होते. म्हणजे सगुणाची उपाधी वाढली तर महाराज म्हणतात तशी आपली उपाधी कमी होते. मला पुरेसं वस्त्र असताना माझ्याकडं पैसा राहील आणि या सगुणाच्या सेवेची मला कल्पना नसेल तर मी अकारण आणखीन एक वस्त्र घेईन, जी माझी चैन असेल. पण सगुण कळलं की, तेच वस्त्र आता देवासाठी घेतलं जाईल, दुसरं घर देवासाठी बांधलं जाईल. माझी उपाधी आपोआप कमी होईल.

हेच माझ्या इतर असंख्य गोष्टींबद्दल आहे. उदाहरणार्थ वेळ घ्या. मला दिवसाचे चोवीस तास आहेत. त्यांतले गरजेचे, विश्रांतीचे आठ-दहा तास, नोकरी-उद्योगाचे आठ तास सोडले तरी पाच-सहा तास शिल्लक आहेत. ते मोकळे आहेत म्हटलं की, माझ्याकडून उपाधी वाढवायला सुरुवात होते. मग मी अकारण माणसंच जोडीन, उपक्रमच शोधीन, अनावश्यक वाचनच करीन, संस्था काढीन - चालवीन. इथंपर्यंत एकवेळ ठीक असेल पण पुढं हळूहळू मनोरंजनाचा, टी.व्ही.चा वेळ वाढेल, गप्पाष्टकं सुरू होतील, पैशाच्या हव्यासापोटी कदाचित आणखी आणखी कामं करावीशी वाटतील, क्वचित व्यसनांच्या आहारी जाईन - असं करीत करीत मी अनावश्यक, विघातकच नव्हे तर कोणत्या कृतींकडे जाईन हे सांगता येत नाही. आता निर्माण होणाऱ्या उपाधी उपद्रवात भर घालणाऱ्या ठरतील, माझ्या कदाचित इतरांच्या बाबतीतही.

त्याऐवजी वेळ असेल तर, जर सगुणाची उपाधी वाढवली तर त्याच रिकाम्या वेळात तासभर पूजेत जाईल, तासभर पारायणात जाईल, तासभर जपात जाईल, तासभर देवळात जाण्यात जाईल, तासभर कीर्तन-प्रवचनात जाईल. साहजिकच माझ्यामागे वर म्हटल्या तशा लागणाऱ्या उपाधी आपोआप कमी होतील. तर सगुणभक्तीच्या उपाधी वाढत जातील. त्यातून विघातक कृती टळून उलट संस्कार, सत्संग, आकलनाची विशालता,

सत्कर्म, त्यांना प्रेरणा इथंपासून अगदी वृत्तीतल्या बदलांपर्यंत कितीतरी उपयोग या सगुणाच्या उपाधी वाढवण्यातून साधता येतील. हीच गोष्ट आपल्या इतर दृश्य-अदृश्य उपाधींची आहे - पैसा, बुद्धीचा वापर, शक्तीचा वापर, स्वार्थाच्या असंख्य कृती - यांची आहे. त्या साऱ्या अशा सगुणाच्या दिशेला वळवता येतील.

आता वरवर पहाता सगुणाच्या बाबतीत मूर्तीचीसुद्धा वस्त्रं ही उपाधीच आहे. ती त्यामुळं वाढते. पण त्यात भक्त सावध असेल तर तो तिथंही मूर्तीच्या गरजेचा विचार करील आणि बाहेर जगातल्या असंख्य गरजूंसाठी त्या गोष्टी पुरवील. काहीही केलं तरी सगुणाची उपाधी वाढवीत गेलं तर आपली उपाधी - जी आपल्याला त्रासाची आहे, प्रपंचात गुंतवून आपलं नुकसान करणारी आहे, समाजाला वंचित करून त्याचं नुकसान करणारी आहे, मूळ दाता जो भगवंत त्याचं विस्मरण करणारी आहे - अशी उपाधी कमी कमी होत जाते एवढं खरं. त्यातून आपलंच जीवन कल्याणाच्या दिशेनं वाटचाल करू लागतं. हा सगुणाची उपाधी वाढवण्याचा आपल्याला उपयोग आहे.

आता जाताजाता हेही पाहू की, मूळ निर्गुण भगवंताची सगुण हीसुद्धा उपाधीच आहे. पण निर्गुण हे निराकारही आहे. त्यासाठी आपल्या अंतरंगाच्या उत्तम विकासापलीकडे आणि तशा कृतींपलीकडे आपण खरं तर काही करू शकत नाही, गरजही नाही. कारण यात उद्धार साधलेलाच असतो. पण ही झेप घेण्याची कुवत किती लोकांकडं आहे ? तशी कुवत असणाऱ्यांनी पक्ष्यासारखं झेप घेऊन झाडाच्या निर्गुणाच्या शेंड्यावर जरूर जाऊन बसावं. पण सामान्य माणसानं प्रथम स्वतःच्या उपाधी कमी करीत जावं, निर्गुणाचं भान ठेवून सगुणाच्या उपाधी वाढवीत जावं आणि अखेर त्याही ओलांडून निर्गुण गाठावं. शाश्वत आनंद मिळवावा, हे खरं.

*

३. साधना करण्याचं महत्त्व पटलं असूनही ते करताना त्यात सातत्य रहात नाही, त्यासाठी काही उपाययोजना करावी का ? कोणती करावी ?

पहिली गोष्ट अशी लक्षात घेऊ की, साधना करण्याचं जे महत्त्व आपल्याला पटलेलं आहे असं आपण म्हणतो ते तितकंसं खरं नाही. बरेच वेळा आपण बौद्धिक आकलनाला पटणं असं समजतो. खरं तर ते करणं योग्य आहे हे आपल्याला पटलं, एवढाच त्याचा अर्थ असतो. खरोखरी करण्यात आपल्याला मनापासून रस नसतो किंवा त्यासाठी तेवढा त्याग करण्याची तयारी अजून झालेली नसते.

एक उदाहरण देतो, म्हणजे पटकन स्पष्ट होईल. आपण रस्त्यानं चालतो आहोत. समोरून गाडी येते आहे. तिची दिशा आणि वेग आपल्या लक्षात आलेला आहे. त्यावरून आपल्याला हेही कळलेलं आहे की, ती गाडी चुकीच्या दिशेनं येते आहे आणि कोणत्याही क्षणी ती आपल्यावर आदळेल. आता त्यासाठी आपण चटकन रस्त्याच्या कडेला जाणं आणि ती गाडी चुकवणं एवढाच मार्ग आहे, हे आपल्या लक्षात येतं आणि आपल्याला पटतंही. आता इथं कुठं कृतीचा आणि त्यातल्या सातत्याचा प्रश्न उद्भवतो का ? कारण आकलन आणि पटणं हे बौद्धिक व वेगवेगळं नसून पूर्ण एक व व्यावहारिक आहे. ते अमलात आणण्यात आता वेगळा विचार करण्याची गरजही नाही आणि विलंबही नाही. मनुष्य तत्काळ कृती करून मोकळा होतो. स्वतःला वाचवतो.

आता एवढी निकड आणि असं आकलन आपल्याला साधनेचं आलं आहे, असं आपण म्हणू शकू का ? या प्रश्नाच्या उत्तरात साधना का घडत नाही किंवा तिच्यात सातत्य का रहात नाही याचं एक उत्तर आपल्याला

मिळून जाईल. आता याच्यावर उपाययोजना करण्याची गरज जरूरच आहे. त्यासाठी काय करता येईल ते क्रमानं पाहू.

पहिलं कारण साधनेचं महत्त्व म्हणजे काय हे थोडं समजून घेऊ. उच्चतर, आनंदी जीवनासाठी करायचे प्रयत्न हे साधनेचं थोडक्यात स्वरूप आहे. त्यातल्या उच्चतर जीवनाची आपल्याला खरं नीटशी कल्पना नाही. आपल्या प्रापंचिक जीवनामध्येसुद्धा उच्चतर जीवन म्हणून काही असतं. उदाहरणार्थ, इथं हा बोर्ड ठेवलेला आहे. त्यावर काही मजकूर लिहिलेला आहे. तो आपण कशाही प्रकारे लिहू शकतो. कदाचित वीस-पंचवीस प्रकारे लिहू शकतो. प्रत्येक प्रकाराचं काही वैशिष्ट्यही असेल. पण त्यात त्या लिहिण्यामागचा हेतू साध्य होईल असं लिहिणं हे आदर्श व उच्चतर प्रकारचं लेखन असेल. मजकूर तर तोच आहे. तो कसाही लिहिला तरी बहुतांशी कळू शकतो. पण हे उच्चतर लेखन अत्यंत कमी वेळात, त्यातल्या महत्त्वाच्या गोष्टींचं आकलन घडवून आणणारं, संदेशाची परिणामकारकता टिकवणारं असतं. म्हणून ते उच्चतर आहे. ते आदर्श आहे. मजकूर बदलला तर अजून फरक पडेल. याला मी उच्चतर जीवन म्हणतो. त्याची ओढ लागायला हवी, ती नसल्यामुळं पुढं सातत्य टिकत नाही.

आपल्याला हे पटलं असेल, आपण नेहमीच्या प्रपंचात सातत्य दाखवू शकत असू तर आपल्याला साधनेचं महत्त्व व तिच्या सातत्यासाठी लागणारे उपाय सुचणंही सोपं पडेल. प्रपंचात एखादी गोष्ट आपल्याला हवीच असली तर माणूस त्यासाठी कितीही कष्टांची तयारी ठेवतो. उत्तम पदार्थ पाच किलोमीटरवरच्या उपाहारगृहात मिळत असेल तर वेळ काढून पाच किलोमीटर पायी, बसनं, गाडीनं, मित्रांच्या मदतीनं कसाही प्रवास करून पोचता येतं. ही अडचणींवरची मात जर प्रपंचात आपल्याला जमते तर साधनेत मार्ग नक्की सुचतील आणि चालताही येतील. समजा हेच

सातत्य संतांनी कसं टिकवलं हे शिकायला पाच किलोमीटरवर कुणाकडं जायचं असेल तर कष्ट तेच आहेत. घेणंही शक्य आहे.

घरातला साधा स्वयंपाक असला तरी प्रत्येकाचा वेगवेगळ्या दर्जाचा होतो. एखादा आदर्श,चांगला असला, तो आपल्याला करायचा असला तर ते शिकण्यासाठी माणूस, ते ज्याला साधलं आहे त्याच्याकडं जातो. आठाच्या जागी पंधरा दिवस देतो. आपण पाककृतींचे नाही का कोर्स करीत ? पण ते शिकतोच. त्यात शिकण्याची गोष्ट सहसा सोडून दिली जात नाही. त्यात ज्या निर्धारानं सातत्य येतं, त्याच निर्धाराची गरज आपल्याला साधनेतलं सातत्य टिकवण्यासाठी आहे. आता यात जसं त्यातल्या कौशल्य असलेल्या माणसाकडं आपण जातो तसं सत्पुरुषांकडं जावं. ते शक्य नसलं तर त्यांच्या चरित्रांकडं जावं. शिकायला तर कुठूनही मिळेल. त्यांच्या चरित्रांच्या वाचनातसुद्धा जर अशी कौशल्य शोधण्याचा बारकावा आपण दाखवला तर त्यानं आपल्याला या सातत्याचे काही मार्ग जरूर कळू शकतील.

अन्नपाण्याची आपल्याला निकड आहे. त्यासाठी आपला दिनक्रम कितीही गडबडीचा असला, त्यात अनेक कारणांनी खूपदा बदल होत असले - पाहुणे येणं, आकस्मिक घटना घडणं - तरी आपण जेवणातलं सातत्य किती कौशल्यानं टिकवतो ! तेच कौशल्य आपण साधनेला लावलं तर साधना झाल्याशिवाय आपला एक दिवसही जाणं शक्य नाही. मग सातत्यात अवघड ते काय ?

समजा, माणसानं ऑफिसमध्ये नोकरी पत्करली. नोकरीची गरज त्याला ठाऊक असते. तिथले नियम त्याला माहीत असतात. अशा वेळी नियमानं वेळेवर हजर राहण्यासाठी तो कायकाय करतो ? तर वेळेवर पोचता यावं, तेही रोज नियमानं पोचता यावं, म्हणून जे जे करायचं ते

करतो. मग त्याला सकाळी लवकर उठवत नसेल तरी उठतो, लवकर आवरत नसेल तरी आवरतो, चालून पोचणं शक्य नसेल तर वाहन करतो पण वेळेवर हजर होतोच. वेळी जेवण्याएवढा अवधी राहिला नाही तर उपाशी जातो, डबा घेऊन जातो पण नियमानं आणि वेळेवर जातोच. हे एकदोन दिवस करीत नाही, वर्षानुवर्षं करतो - तीसपस्तीस वर्षं करतो. त्यावेळी सातत्य कशानं टिकतं,याचा आपणच विचार करावा. मग साधनेत हे करता येईल की नाही, हे ठरवावं. उत्तर आणि मार्ग सहज सापडतील.

त्यासाठी एक लक्षात घेणं आवश्यक आहे की, खरंतर देवाची प्राप्ती करून देणाऱ्या साधनेला, पोटापाण्याची सोय करणाऱ्या नोकरीएवढीसुद्धा आपल्यालेखी किंमत नाही. हे खरं आहे ना ? निदान नोकरीएवढं महत्त्व जरी साधनेला दिलं गेलं तरी साधनेत सातत्य येईल. फरक एवढाच की, नोकरीत सातत्य नसण्याची झळ शरीराला आहे आणि तीही लगेच आहे. साधनेत सातत्य न ठेवण्याची झळ शरीरालाही नाही आणि मनालाही नाही. नुकसान तर लगेच दिसतच नाही. त्यामुळं सातत्यात कमी पडायला होतं. पण त्याचा अर्थ साधनेत सातत्य नसण्याची झळ नसते किंवा नुकसान नसतं असं तर नक्कीच नाही. नुकसान होतच असतं, हे लक्षात ठेवून आपण नोकरीएवढं तरी सातत्य साधनेत दाखवायचं ठरवावं. नोकरीला गेलेला मनुष्य आठआठ, दहादहा तास राबतो. साधनेत देवाची तशी तरी अपेक्षा आपल्याकडून नाही. नुसत्या स्मरणानंसुद्धा साधना होत असते. हे उपकार लक्षात ठेवून साधना ही देवाची नोकरी समजून करावी. त्या अर्थानं एखादा दिवस जरी देवाच्या स्मरण न होता गेला तर देवाकडे ॲब्सेंटी - अनुपस्थिती लागेल, असं मानून राहिलो तर सातत्य आपोआप येईल. आपल्याकडून आजवर साधनेचे किती लेटमार्क आणि सुट्ट्या लागल्या असतील आणि देवानं त्या सहन केल्या असतील

याची कल्पनाच केलेली बरी. या विचारानंसुद्धा यापुढं सातत्य येईल.

आपल्याला ठाऊक असेल की, हे काही नोकरीतच असतं असं नाही. दिवसभराची दमणूक झाल्यावर, आवरून घरी अंथरुणावर झोपायला अंग टाकावं तेवढ्यात डॉक्टरांना जर पेशंट सीरियस असल्याचा फोन आला तर तत्परतेनं ते जी धाव घेतात तीच धाव आपल्याला साधनेसाठी हवी आहे. दुकानदाराला एखाद्या दिवशी दुकान उघडायला उशीर झाला तर एक-दोन गिऱ्हाइकं जातात. हे नुकसान एवढंच नसतं. त्यादिवसापुरतं नसतं. तर पुन्हा त्यांना दुकान वेळेत उघडेल की नाही याची खात्री नसल्यानं ती दोन गिऱ्हाइकं पुढच्यावेळीसुद्धा येत नाहीत. शिवाय हेच ती इतर चार गिऱ्हाइकांना सांगतात. या सगळ्या नुकसानीची कल्पना दुकानदारांना असते. म्हणून उठवत नसलं, जाववत नसलं तरी अनेकदा तेही वेळ पाळतात. आपल्याला साधनेला हेच हवं आहे.

यात नोकरानं नोकरी पत्करली आहे, डॉक्टरांनी पेशंट पत्करला आहे, दुकानदारानं गिऱ्हाइक पत्करलं आहे, पण आपण कुठं देव पत्करला आहे ! एवढा विचार मनात आला तरी साधना आणि सातत्य लांब नाही, हे आपल्या लक्षात येऊ शकेल.

एक व्यावहारिक मार्गही आहे. सकाळी आपल्याला विशिष्ट वेळेला कुठं जायचं असलं, काही काम असलं, ते कदाचित लक्षात राहण्याची शक्यता नसली तर आपण घरात कुणालातरी ते सांगून ठेवतो. आपण विसरलो तरी तो आठवण करतो आणि आपलं काम होतं. सातत्याच्या बाबतीत हेही शक्य आहे. या बाबतीत साधनेचा थोडा विषय झाला तरी परवडतं. निदान ज्याचा विरोध नाही त्यालातरी हे सांगता येतं. तो मदत करतो. आता तर माणसाची मदत झाली नाही तर घड्याळातल्या किंवा मोबाईलमधल्या रिमाइंडरचीसुद्धा मदत घेता येईल.

दुसरा मार्ग गुरूंना प्रार्थना करण्याचा. तोही आहे. ही प्रार्थना देवालाही करता येईल. त्यासाठी सकाळी उठल्याउठल्या किंवा झोपताना मनोमन केलेली प्रार्थना खचित उपयोगी पडते. अनेकदा वेळ असतो पण साधनेची आठवण होत नाही. अशा वेळी ही प्रार्थना आपल्याला आठवण करून द्यायला मदत करील.

या साऱ्यावरून आपल्या लक्षात येईल की, मदत कुठूनही होऊ शकेल. मीच ती घेण्याची गरज आहे. आणि त्याला खरा अडथळा कुठून असेल तर तो आपल्या मनाकडूनच आहे. खरी अडचण मनाचीच आहे. मनाला हे खरंच हवं असेल तर अंधारात काजवासुद्धा मार्ग दाखवील, हे लक्षात घ्यावं.

आपण व्यवहारातल्या कित्येक गोष्टींसाठी मन मारतो, मनाविरुद्ध असूनही अनेक गोष्टी करतो. पण परमार्थात मात्र मन जणू काही वाघ असल्यासारखे त्याला घाबरून वावरतो. माझी ही विनंती आहे की, मन वाघ मानू नका. साध्या भाषेत सांगायचं तर काठी उगारल्याशिवाय हे काम होणार नाही. मनाशी थोडं कडक राहिल्याशिवाय साधनेत सातत्य येत नाही. दिलेला गृहपाठ मुलांनी रोजच्या रोज केला नाही तर साध्या शाळेतसुद्धा कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या शिक्षेला सामोरं जावं लागतं. भले ती शारीरिक नसेल. पण गृहपाठ दोनदा करावा लागेल. मनाला थोडा दबाव दिल्याशिवायही काही वेळा काम होत नाही. मग साधना चुकवीत असेल तर मनाला मोकळं का सोडावं ? एकदा चुकवला तर चांगला दोनदा जप करून घ्यावा. तिसऱ्या दिवशीपासून सातत्य येईल.

एकूण काय, आपल्याला झेपेल ती उपाययोजना करून सातत्य आणणं शक्य आहे.

*

४. आपल्या साधनेची चर्चा पूर्णपणे टाळावी का ?

आपल्या साधनेची सार्वत्रिक चर्चा टाळणं हे चांगलंच आहे. हे झालं सर्वसाधारण उत्तर. उच्चारलेलं पुण्य नष्ट होतं, साधनेचा नकळत अहंकार होतो, एका अर्थानं साधनेला दृष्ट लागते, लोकांकडून आदर वाट्याला येतो व त्यात फसगत होण्याची शक्यता असते - अशा काही कारणांसाठी साधनेची चर्चा सार्वत्रिकपणे करण्याचं टाळावं, असं म्हटलं जातं. त्यात तथ्य आहे.

यात अजूनही काही गोष्टी आहेत. प्रत्येकाची आपापल्या ठेवणीप्रमाणं साधन करण्याची पद्धत, काळ, वेळ, प्रकार असतो. ते सर्व, जे चर्चेत भाग घेतात त्या सर्वांना लागू असतंच असं नाही, त्यांची स्वतःचीही अशीच काही पद्धत, प्रकार असू शकतात. या व्यक्ती जर तेवढ्या समंजस नसतील तर आपल्या साधन करण्याच्या पद्धतीबद्दल त्या आक्षेप घेतात, क्वचित वाद घालतात, आपल्या पद्धतीतल्या काही चुका दाखवतात.

उदाहरणार्थ माळ न घेता जप करणारी व्यक्ती माळ घेणाऱ्याला माळ घेऊन जप करण्याच्या पद्धतीतल्या चुका दाखवू शकते. वास्तविक प्रत्येक उपासना पद्धतीत आपापले गुणदोष असतातच. म्हणजेच माळ न घेणाऱ्यालासुद्धा माळ न घेण्याच्या त्याच्या पद्धतीतले धोके दाखवता येणं शक्य असतं.

वेगवेगळ्या पंथातल्या साधनपद्धतीतही असे फरक असू शकतात. त्यात काही व्यक्ती त्या पद्धतींचा गाभा लक्षात न घेता या पद्धतींच्या बाह्यांगाच्या बाबतीत अकारणच आग्रही असतात. अनेकदा त्या पंथाचं, त्याच्या संबंधित साहित्याचं पुरेसं ज्ञान त्यांच्याकडं नसतं व दुर्दैवानं त्याची त्यांना जाणीव नसते. अशा व्यक्ती आपले आपले पंथ व पद्धती दुसऱ्या

व्यक्तींवर अकारणच लादण्याचीही भूमिका घेतात.

अशा प्रसंगी आपण जर या संवादात, काही वेळा वादात- कमी पडलो तर आपल्याच पद्धतीविषयी आपल्याला शंका येऊ शकते. असा संदेह साधनेवर येऊ शकतो. त्यातून आपली साधना व ती सांगणाऱ्या व्यक्ती यांच्याविषयी शंका व अश्रद्धा उत्पन्न होऊन आपलं चांगलं चाललेलं साधन उलट कमी होतं, बंद पडतं.

हे टाळण्यासाठी अशा साधनेच्या चर्चा टाळणं हे सुरक्षित आहे हे खरं. आता याची दुसरी बाजूही समजून घेऊ. साधना करताना काही प्रश्न निर्माण होतात,काही अनुभव येतात, काही भ्रम होत असतात, ते दूर व्हावे अशीही तळमळ असते, काही अनुभवांचा उलगडा व्हायचा रहातो या कारणांसाठी त्याची चर्चा कुणाकडेतरी करून हा उलगडा करून घेणं किंवा निरसन करून घेणं याला जरूरच काही हरकत नाही.

एखाद्या व्यक्तीपुरती, अधिकारी साधकापुरती अशी चर्चा उपयुक्त ठरते, हा अनुभवच आहे. काही ठिकाणी अंतरंग साधकांचा किंवा एकमेकांची मनःपूर्वक प्रगती इच्छिणाऱ्या व्यक्तींचा समूह - क्लोज किंवा इनर सर्कल - असतं. त्याचा उद्देश आत्ता म्हटला तसा विधायक असून स्वतःला काही वेगळेपण किंवा महत्त्व, श्रेष्ठत्व देण्याचा नसतो. तर प्रामाणिकपणे एकमेकांना साधनेत सोबत व मदत करण्याचा असतो. अशा मर्यादित साधकवर्तुळात साधनेची चर्चा करणं आपल्याच हिताचं ठरतं. त्यामधून आपल्याच चुका व भ्रम दूर होऊन आपल्याला शुद्ध व योग्य मार्ग मिळतो. यासाठी आपल्या प्रगतीसाठी व मर्यादित प्रमाणात अशी चर्चा करायला काही हरकत नसावी.

म्हणून साधनेची सार्वत्रिक चर्चा टाळावी असं म्हटलेलं आहे, पण ती पूर्णपणे टाळावी असं म्हटलेलं नाही.

*

५. प्रपंचात मुलाचा आजार बरा व्हावा, नोकरी लागावी, घर व्हावं, लग्न व्हावं असे अनेक नवस आपण करतो. बऱ्याच वेळा देव त्या गोष्टी देतोही. पण परमार्थात माझा मीपणा कमी व्हावा,माझी वृत्ती आवरली जावी, माझा अहंकार कमी व्हावा, तुमच्या पायी रहावं अशा रीतीनं भगवंताला मागितलं असता ते मात्र या मानानं होताना दिसत नाही किंवा त्याला फार वेळ लागताना दिसतो. असा फरक आहे का ?

परमार्थाच्या मागण्या भगवंत त्वरित पुऱ्या करीत नाही, असं माझं मत आहे. प्रपंचातल्या मागण्याही फार लवकर पुऱ्या होतात असं नव्हे. पण काही वेळा त्या होतात असं आपल्याला वाटतं. प्रारब्धाची वेळ आल्यामुळं काही वेळा तसं होतंही. त्यातल्या त्यात परमार्थापेक्षा प्रपंच देणं ही खूप सोपी गोष्ट आहे. आपण ज्यांचा उल्लेख केला त्या, म्हणजे परमार्थ देणं, हे मुक्त करण्यासारखं आहे, खूप मोठं आहे.

या साऱ्याचं कारण प्रपंचात मायेचं अधिराज्य चालतं. यात ज्या गोष्टी मागितल्या जातात त्या मायेतल्या आहेत. उदाहरणार्थ घर, गाडी, पैसा इ. इ. माया म्हणते हा माणूस या गोष्टी देऊन भुलत असला तर बरंच झालं. एक तर तो आपल्या ताब्यात येईल. तसंच तेवढा हा देवापासून लांब जाईल. मुळात आपण जन्माला आलेले आहोत याचाच अर्थ मायेच्या कक्षेतले आहोत. त्यामुळं तिच्या कक्षेतलं मिळणं, पुन्हा आपल्याला अस्वस्थ ठेवणं आणि तिच्या कक्षेबाहेर - म्हणजेच भगवंताच्या कक्षेत जाऊ न देणं - हे उलट सोपं आहे. यात आणखी एक भर आहे ती म्हणजे आपण स्वतःही खरं तर मनानं मायेच्या बाहेर जाऊ इच्छीतही नाही.

विचार करा की, खरे आपण कोणाच्या बाजूचे आहोत. मोक्ष

हवा की मुलगा बरा व्हावा, लग्न व्हावं असं विचारलं तर आपलं पटकन आणि सहज येणारं उत्तर कुठलं असेल, ते स्पष्ट आहे. मग आपण कोणाच्या बाजूचे आहोत. आपण मनानं मायेच्या बाजूचे आहोत, अशांतीच्या बाजूचे आहोत. शांततेच्या बाजूचे नाही.

नाहीतर आपल्याला मौनजपाला अडचण आली नसती. एकटं रहावं लागलं तर कंटाळा आला नसता. आपण सकाळी उठून पेपरची वाट बघितली नसती. नेट लावून तासन्‌तास सर्फिंग केलं नसतं. आपण अशांततेच्या बाजूचे आहोत, आपला कल मायेकडे आहे म्हणून तर आपण जन्माला आलो आहोत आणि असेच राहिलो तर असेच जन्माला येत राहू, मग परमार्थातली मागणी मागण्यात आणि पुरी होत नाही म्हणण्यात कितपत अर्थ आहे ?

आता याच प्रश्नासाठी आणखी एक छोटं उदाहरण पाहू. आपल्या घरी पाहुणे येतात. त्यांच्याबरोबर लहान मूल असतं. ते आल्यावर आपल्या घरातल्या वस्तू, खेळणी, भांडी-कुंडी अशा वस्तू मागतं. आपणही त्या त्याला लवकर व आनंदानं देतो. समजा त्या मुलानं पुढं हट्ट धरला, मला तुमचा फ्रीज, टीव्ही, फर्निचर हवं आहे, शेवटी तो हटून बसला मला तुमच्या घरातले कपाटातले सगळे सोन्याचे दागिने हवे आहेत. अशा वेळी आपण कुठलं किती प्रमाणात देऊ आणि कुठलं टाळू किंवा वेळी देणारही नाही हे उघड आहे. भगवंताला प्रापंचिक गोष्टी मागतो तेव्हा तो म्हणतो घेऊन जा, त्यात काय एवढं, ते मायेतलंच आहे. खेळण्यांसारखं आहे. थोडक्यात भागतंय तर देऊन टाकू पण तो मोक्ष मागायला लागला तर भगवंत सावध होतो, त्याला ते आवडतं पण ते सोन्याच्या दागिन्यांसारखं आहे. अर्थात कोण पटकन देईल ? म्हणून थोडा वेळ लागतो. असं हे सारं आहे.

*

६. मोक्षप्राप्तीच्या परीक्षेचा निकाल किती कडक लागतो ? त्याचं पासिंग पर्सेंटेज किती आहे ?

प्रश्न चांगला आहे. उत्तर न फोडण्यासारखंच आहे. उत्तराची शंका येण्यासारखाही आहे. पण शेवटी आपण सारे उद्धारासाठी जमलो आहोत, त्यामुळं असा प्रश्न मनात येणं स्वाभाविक आहे. म्हणून आपण त्याचा विचार करू.

मोक्षप्राप्तीच्या परीक्षेचा निकाल किती कडक लागतो यापेक्षा तिला खरे बसू इच्छिणारे किती असतात, हेच महत्त्वाचं आहे. वरवर पहाता, मोक्ष किंवा उद्धार हा प्रत्येकाला आदर्श आणि त्यामुळं हवासा वाटतो. पण ते सारं स्वीकारायला मात्र फार कमी लोकांची तयारी असते. म्हणून मी म्हणेन की, मोक्षप्राप्तीच्या परीक्षेचा निकाल चांगला लागतो. बसलेल्या जवळजवळ सर्व लोकांना पासिंगची संधी असते. तो निकाल कडक नाही. बसणारे कमी आहेत, ही अडचण आहे.

वास्तविक आपण मुक्त व्हावं, उद्धरून जावं यासारखी विश्वशक्तीला आनंद देणारी गोष्ट नाही. त्यामुळं नुसतं या परीक्षेला बसतो म्हणणाऱ्यालाही उत्तेजनार्थ पास करतील अशी परिस्थिती आहे. परीक्षेला बसणार असं तर बरेच लोक म्हणतात, असंही आढळतं. मग अडचण कुठं आहे ? तर मोक्षाचा आनंद सर्वश्रेष्ठ, शाश्वत आहे, 'म्हणून' तो आपल्याला म्हणजे आपल्या मनाला 'हवा'आहे !

पण ते हवेपण - मन नष्ट झाल्याशिवाय तो मिळणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. शिवाय तो मिळाला तर हा आनंद अनुभवणार कोण, अशीही शंका येते. शिवाय मनाला नष्ट व्हायचं नसल्यानं ते फक्त मोक्षाच्या गप्पा मारतं, त्या गप्पा, चर्चा यांचाच आनंद घेणं पसंत करतं. आपली

फसगत होते. ते शेवटपर्यंत आपल्याला परीक्षेलाच बसू देत नाही. आणि ते आपल्याला कळूही देत नाही. मग आपण पास कसे होणार ?

म्हणून आपण यातली अडचण ओळखावी, एक प्रकारानं मनानं नष्ट होण्याची तयारी ठेवावी, मोक्ष म्हणजे शाश्वत आनंद मिळवायचाच हे ध्येय ठेवावं - परीक्षेला बसावं ! पास करू इच्छिणारा भगवंत आपली वाट पहातो आहे, याची खात्री बाळगावी, उद्धरून जावं !

*

७. एखाद्या ग्रंथाची साधकानं हस्तलिखित प्रत केली असेल तर त्याची पुढील व्यवस्था काय करावी ? तो समाधिस्थळी अर्पण करावा का ? त्यावर आपला नामोल्लेख करावा का ?

हस्तलिखित प्रत करणं ही एक साधना आहे. ती पूर्ण करण्यासाठी अशा हस्तलिखित ग्रंथाचं प्रथम एक पारायण करावं. त्यानं आपण केलेली सेवा कितपत पूर्ण व निर्दोष झाली आहे, ते कळतं. काही त्रुटी असल्यास सुधारण्याची संधी मिळते. ती घ्यावी. अशी हस्तलिखितं स्वीकारण्याची कुठं योजना असल्यास त्या ठिकाणी ते द्यावं. हे काम साधना म्हणून पूर्ण व्हायचं असेल तर, जे हे स्वीकारणार त्यांचा नियम किंवा आग्रह असल्याशिवाय हस्तलिखितावर आपला नामोल्लेख करू नये. एखाद्या मंदिराच्या पायाभरणीसाठीसुद्धा अशा हस्तलिखिताची गरज असेल तर तिथं अर्पण करावं. इतर कुणी त्यावरून पारायण करू इच्छीत असेल तर त्याला द्यावं. हेही शक्य नसेल व स्वतःला ते सांभाळणं शक्य नसेल तर आपण त्या ग्रंथाचं पूजन करून लिखित जपवहीच्या पद्धतीनं कागदाच्या पुनर्निर्मितीसाठी तो ग्रंथ पल्प फॅक्टरीला विनामूल्य द्यावा.

*

८. चांगल्या चांगल्या गोष्टी, विचार वाचनात आले की, ते मला लोकांना सारखे सांगावेसे वाटतात, हे योग्य आहे का ? अशा वेळी काय करावं ?

कळलेली गोष्ट, विचार चांगला असला की, तो आवडणं आणि एक समाजप्रिय प्राणी या नात्यानं दुसऱ्या माणसापर्यंत पोचवावासा वाटणं, हे तसं स्वाभाविकच आहे. फक्त ते करताना काही पथ्य पाळणं आपल्या हिताचं होईल.

८.१. हे चांगले विचार खरं तर अमलात आणावे अशी सांगणाऱ्यांची - संतांची तळमळ असते. त्यामुळं आपल्या परिस्थितीनुसार ते अमलात आणणं, किमान तशी सुरुवात करणं हे, आपण दुसऱ्याला सांगण्यापूर्वी, करतो आहोत ना, हे पहावं.

८.२. दुसऱ्याला सांगताना, त्याला त्याचं महत्त्व वाटेल ना, गरज आहे ना - याचाही विचार, काही सांगण्यापूर्वी करण्याची गरज आहे. नाहीतर असं सांगितलेलं वाया जातं. भूक लागलेली नसताना जेवायचा आग्रह केल्यासारखं.

८.३. एकदा सांगून झाल्यावर तो त्याचं पुढं काय करतो आहे यात आपण अडकत नाही ना, हे पहावं. अडकण्यानं आपलंच नुकसान होत असतं.

८.४. एखादी गोष्ट आपल्याला चांगली वाटली, उपयोगी वाटली तरी ती दुसऱ्याला त्याच्या परिस्थितीत चांगली, योग्य वाटेलच असं नसतं, हेही लक्षात ठेवावं. त्या अर्थानंही सारखंसारखं सांगू नये.

८.५. सांगताना दुसऱ्या विषयीची हितबुद्धी आणि आपली सांगण्याची ऊर्मी यांची गल्लत होत नाही ना, याची काळजी घ्यावी. हितबुद्धी अर्थातच चांगली तर ऊर्मी हानिकारक असते.

*

९. हे सर्व जग हे मायाजाळ आहे, हे सर्व कळतं, ते सोडून संन्यास घ्यावा वाटतो. पण पुढं याची जाणीव होते की, आपली कर्तव्य आपल्याला पार पाडायची आहेत. विषयातून पूर्ण बाहेर पडणं हेही अशक्य वाटतं. अशा अवस्थेत काय करावं ?

हे जग हे माया आहे हे कळलं ना ? हेही खूप आहे. आता ते माया आहे, हे ओळखून व्यवहार करावेत. हाच त्याच्यावरचा आपल्यासाठी उपाय आहे. चाललेले व्यवहार खरे नाहीत हे लक्षात ठेवायचं आणि ते खरे असल्यासारखं वागायचं आणि भगवंताचा विसर पडू द्यायचा नाही, हा मायेवरचा उतारा आहे. उदाहरणार्थ व्यवहारात, नातेसंबंधात आपल्या नणंदेला, भावजयीला, विहिणीला प्रसंगी काही द्यावं लागतं. आपण ते कितीही चांगलं केलं तरी शेवटी त्यांना ते पसंत पडणार नाही हे माहिती असतं. तरी ते द्यावं लागतं. आपण दिलं आणि नंतर त्यांनी मान मुरडली की, ते योग्य झालं असं समजायचं. हे सगळं ओळखून आपणही करायचं आणि तेही करतात. हीच माया.

तसं माया म्हणजे काही पूर्ण वाईट नाही. भगवंतामुळंच तिला अस्तित्व आहे ना ? तिच्यामुळं तर आपल्याला जगण्याची संधीही आहे. तिच्याबरोबरीनं काही चांगल्या गोष्टी येतात. संबंध येतात, कर्तव्य येतात, संधी येतात, ध्येयं येतात. फक्त ते सारं जोपर्यंत मायेतलं असतं तोपर्यंत ते आपल्याला कधी पूर्ण समाधानी किंवा शांत करू शकत नाही. तो मायेचा स्वभाव आहे. आपल्याला आशा लावील, अस्वस्थ ठेवील ती माया. तिचा स्वभाव ओळखून, तिनं दिलेल्या संधी घेऊन, कर्म करून, निरपेक्षतेचा, अनासक्तीचा, शांतीचा अभ्यास केला तर मायेची अडचण न होता मदत होते. मायेतल्या गोष्टींवर समाधानासाठी अवलंबून राहील

तो भुलेल आणि फसेल.

मायेच्या चांगल्या गोष्टींत एक महत्त्वाची गोष्ट पण आहे. आपल्याला आपलं प्रारब्ध चुकत नाही. ते भोगूनच संपवावं लागतं. ती संधी मायेच्या या प्रपंचात आहे. म्हणून या संधीचा वापर करून उलट आपण मुक्ततेचं ध्येय ठेवावं.

आपल्याला विषयातून पूर्ण बाहेर पडणं हे अशक्य वाटतं, याचा अर्थ आपली संन्यासासाठी लागणारी पूर्वतयारी नाही, हे आपण ओळखून मान्य करावं. संन्यास घेऊनसुद्धा प्रारब्ध चुकत नाही. तर अशा परिस्थितीत आपण त्या पर्यायाचा विचार करू नये, असं मला वाटतं. त्यापेक्षा हा वरचा मध्यम मार्ग बरा. संन्यास घेण्यापेक्षा खरंतर संन्यस्त वृत्तीनं प्रपंचात रहाणं हा मायेचा भेद करण्याचा प्रापंचिकांना चांगला मार्ग आहे. संतांनाही तो आवडतो.

विषयातून बाहेर पडणं अशक्य वाटतं, असं कृपया म्हणू नये, अवघड आहे असं म्हणावं. विषयाला मायेची मदत असली तरी विषयातून बाहेर पडणाऱ्याला भगवंताची मदत आहे, हे लक्षात ठेवावं. शेवटी ईश्वर हा मायेचा नियंता आहे. अशक्य म्हटलं की, मार्ग बंद होतात. अवघड म्हटलं तर प्रयत्नांना आणि यशाला वाव रहातो, आणि तो तसा आहेही. मनुष्य शेवटचा एक क्षण निर्विषय झाला तरी पुरे आहे. आपण आयुष्यभर जर निर्विषय होण्यासाठी धडपड केली असेल, भले ती अयशस्वी झाली असेल, तरी शेवटच्या क्षणी भगवंत म्हणतो, चल मी आता तुला उचलून नेतो ! 'भागलिया मज वाहतील कडे...' यावर विश्वास ठेवून राहिलं तर हे करता येईल. मायाजाळाचाही त्रास नाही.

यासाठी मात्र आपली जी रोजची विषयानुकूल जीवनपद्धती आहे, ती थोडीशी बदलावी लागेल. ते करूया. मग हे सोपं होईल.

*

१०. संत मोक्षप्राप्त असतात. त्या संदर्भात पुनर्जन्म, अवतार, अंश असणं, संतत्व येणं यांतला फरक कोणता ?

संत आपल्यासारखेच प्रारब्ध घेऊन जन्माला येतात. फक्त ते जाणीवपूर्वक आपलं मोक्षाचं ध्येय ठरवतात, त्यानुसार आचार करतात आणि मुक्त होऊन जातात. त्यामुळं पुनर्जन्म हा विषय संतांना नाही.

अवतार हे स्वतःच्या इच्छेनं खाली येतात आणि त्यांच्या इच्छेनं अवतार-समाप्ती करतात. अंशावतार हा स्वतंत्र विषय आहे. जसे श्री मारुती आहेत. जेव्हा राम अवतार घेतात, तेव्हा त्यांच्या ईश्वरी कार्याला खूप मदत लागते. ती अंशानं वेगवेगळ्या व्यक्तींच्या स्वरूपात येते आणि अखेर एक मोठं अवतारी कार्य आकाराला येतं. काही वेळा, काही विशिष्ट कार्यासाठीसुद्धा एखादी ईश्वरी शक्ती अंशरूपानं अवतार घेते.

बाकीचे आपण लोक मात्र कर्मकौशल्याच्या अभावी पुनर्जन्माच्या चक्रामध्ये अडकलेले असतो. दर वेळेला शुद्धीचे अधिकाधिक प्रयत्न करीत गेलो तर उन्नत होतो आणि अखेर मुक्त होतो. म्हणून एखाद्याच्या ठिकाणी भगवंताची - मुक्तीची बुद्धी पाचव्या वर्षी असते, ती दुसऱ्याच्या ठिकाणी पन्नासाव्या वर्षीही दिसून येत नाही.

ज्यांचं प्रारब्ध संपतं ते भगवंताच्या इच्छेसाठी जगतात. भगवंताला त्यांच्यामार्फत जे करायचं आहे, त्यासाठी ते जगतात. त्यांना स्वतःला आता काहीच करायचं नसतं. ही मुक्त अवस्था मोठी आनंदाची असते. श्री मामासाहेबांना पडल्या जागी डुलकी लागे. हवं त्या वेळी ते जागेही होत. तेव्हा त्यांना विचारलं असता ते म्हणाले, 'चित्ताला पांडुरंगाशिवाय विषय नाही. ते रिकामं असतं. म्हणून हे शक्य आहे !' आपल्या डोक्यावर ओझी असतात, म्हणून झोप लागत नाही, कर्मं करावी लागतात.

*

११. मृत्यू ही अटळ बाब आहे. आपल्या बरोबरच इतर संबंधित सर्वांचाही मृत्यू अटळ आहे, हे लक्षात येतं. पण हे केवळ शाब्दिक आकलन न रहाता ते पचावं व टिकावं यासाठी कोणत्या प्रकारे अभ्यास करावा ?

मृत्यू 'अटळ' आहे, या शब्दामध्येच आपली मृत्यूबद्दलची धारणा व्यक्त होते. अटळ आहे याचाच अर्थ, जर टळला असता तर बरं झालं असतं किंवा टाळता आला असता तर आपण टाळला असता, असा अर्थ होतो. म्हणजेच त्याला आपण नाईलाज समजतो. हा एक संस्कारच आहे. वास्तविक जर जन्माचा आनंद आहे, तर मृत्यूचाही आनंदच वाटला पाहिजे. आकारात आलो त्याचा आनंद आहे, तसा निराकारात जाण्याचाही आनंदच आहे.

कसंही असो, तो जीवनाचाच भाग आहे. तो जर भीतीचा, टाळण्याचा विषय होत असेल, तर मग मात्र आपण त्याचा पहिल्यापासून जरूरच अभ्यास करावा. प्रथम एक पाहू की, आपल्याला त्याची भीती किंवा काळजी का वाटते ? तर, तो आपण जे जे गोळा करून ठेवलं आहे, ते ते सगळं आपल्यापासून हिरावून घेतो. खरं सांगू का, ते गोळा केलेलं इथंच रहातं आणि आपल्याला मात्र जावं लागतं, याचं आपल्याला अतिशय दुःख होतं. मृत्यू ही साधारणपणे म्हातारपणी घडणारी गोष्ट असल्यानं तरुणपणी त्याची किंवा त्याच्या भीतीची फारशी जाणीवही होत नाही. मात्र तो जसा जवळ येतो तसा त्याचा धाक वाटायला लागतो, विचार मनात येतो. अलीकडच्या परिस्थितीत काही शारीरिक हाल होऊ नयेत, निदान पटकन व अनायास मृत्यू यावा असं तरी वाटतं. पण हासुद्धा मृत्यूच्या भीतीचा आणि टाळण्याचाच एक प्रकार आहे, हे आपल्या लक्षात

येईल. शरीराची आणि मनानं गोळा केलेल्या वस्तूंची आसक्ती आड येते, हे खरं. यातून सामान्यही सुटत नाहीत आणि आपण कृपया लक्षात घ्या, असामान्यही सुटत नाहीत. शरीराची आसक्ती तर सर्वांना सारखीच आहे. पुढची आसक्ती जी वाकळेची आणि झोपडीची असू शकते तीच अगणित संपत्तीची, महासत्तेची, गोड गळ्याची, प्रसिद्धीची आणि इस्टेटींची असू शकते. म्हणून लौकिकदृष्ट्या थोर असलेली माणसंसुद्धा या मृत्यूच्या भयापासून मुक्त असतीलच असं नाही.

आपण मृत्यूचा अभ्यास केला तर, खरंतर आपण या भयातून तर मुक्त होऊच पण आपण अधिक चांगलं जीवन जगू शकू. मृत्यू मुख्यतः दोन प्रकारचा आहे. एक शारीरिक आहे, एक मानसिक आहे. शरीराच्या नैसर्गिक वाढीचा शेवटचा टप्पा म्हणजे मृत्यू आहे, हे एकदा लक्षात आलं की, टाळणं, पळणं या साऱ्या गोष्टी गौण होऊन जातात. जमिनीत बीज पेरल्यापासून तिची निगा राखणारा, त्या बीजाच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्याबरोबर अस्वस्थ न होता उलट आनंदी होत जात असतो. अंकुर आला, डहाळी आली, वृक्ष झाला, फांद्या-पानं-फुलं आली, फळ आलं की, या प्रत्येक गोष्टीनं त्याला आनंद होतो. फळ आल्यावरसुद्धा त्याचा जो उत्तम उपयोग असेल - ते खाणं असेल, देणं असेल, देवाला अर्पण करणं असेल, ते नष्ट होणं असेल - ते होण्यात त्याला आनंद होतो.

तेच आपल्या जीवनाचं आहे. निसर्गानं जीवनाच्या रूपानं पेरलेलं बीज, मृत्यूचं फळ त्याला अर्पण करून या वाढीचा नैसर्गिक व सुंदर शेवट करीत असतं. शरीराच्या मृत्यूकडं बघण्याचा हा दृष्टिकोन असेल तर सबंध जीवनाकडं बघण्याचा दृष्टिकोनही बदलून जाईल. त्यातलं पान, फांदी, फूल, फळ जे येईल, त्याचा चांगल्यात चांगला वापर करण्याचा आपण आयुष्यभर आनंदानं प्रयत्न करू. मग शारीरिक मृत्यू ही वेगळी

किंवा भयाची, टाळण्याची वस्तू राहिली नाही, असं लक्षात येईल.

मृत्यूतला खरा प्रश्न हा दुसऱ्या म्हणजे मानसिक मृत्यूचा आहे. जास्त भीतीचा आणि त्रासाचा विषय तोच आहे. आपण आधी म्हटलं तसं, अनेक गोष्टी गोळा केलेल्या असतात, त्या खूपदा बाह्य असतात. पण त्यांची आसक्ती मात्र मनात असते. त्यामुळं अडचण त्या आसक्तीची, म्हणजे मनातली असते. घरदार असो, दागदागिने असोत, जमिनी असोत, माणसं असोत, आपली तथाकथित प्रसिद्धी असो, लोकांतलं स्थान असो - ते सगळं बाहेरच असतं. तुम्ही नसला तरी ते बाजूला, बाहेर असल्यामुळं ते एका अर्थानं सुटलेलं नि मोकळंच असतं. अडचण असते ती मनानं ते सोडण्याची. त्यात थोडी सूक्ष्म अडचण असते ती, आपल्या आतल्या गोष्टी सोडण्याची. त्यात आपले अनुभव, मतं, आग्रह, दृष्टिकोन - अशा गोष्टी येतात. त्याही सोडायला मनुष्य तयार होत नाही. मृत्यू तर या साऱ्या बाहेरच्या आणि आतल्या सगळ्याच गोष्टी हिरावून घेणार हे दिसतं. खरंतर त्यात एवढं अडकून बसण्यासारखं काही नसतंही. आपल्याला ते सगळं मोठं वाटतं, अलौकिक वाटतं, कौतुकाचं वाटतं. हे सगळं आपलं झालं. पण जगाच्या हजारो वर्षांच्या पटावर या सगळ्या गोष्टींना एखाद्या ठिपक्याएवढंसुद्धा मोल नसतं. हे ज्यांच्या लक्षात येतं ते त्या गोष्टी - म्हणजे त्यांची आसक्ती आधीच सोडून देतात. हा मानसिक मृत्यू ! तो स्वीकारला तर मृत्यू तुमचं काय हिरावणार ? हा अभ्यास आहे.

एक विचार करावा, जे माझं हिरावून घेतलं जातं ते मुळात माझं असतंच कुठं ? जे तुमचंच आहे, ते घेतलं जाऊच शकत नाही. मृत्यू देह नेतो म्हणजे देह आपला नाही. घरंदारं, प्रसिद्धी, मानमान्यता, इस्टेटी क्षणात नेतो म्हणजे त्याही खऱ्या आपल्या नाहीत. आता देह नेला तरी इच्छा, वासना राहतातच. त्याही पलीकडं असलेलं आपलं जे खरं हिरावून

घेतलं जाऊ शकत नाही, ते आपलं खरं स्वरूप असलं पाहिजे. ते चैतन्य. त्याचा नाश आपल्यापुरताही नाही आणि विश्वापुरताही नाही.

आता इच्छा आणि वासना राहातात म्हटलं तर त्या आपल्या ठरतील, हे खरं. पण त्या मुक्ततेपेक्षा बंधनाला कारणीभूत होतात, भीतीला कारणीभूत होतात. म्हणून मीच त्या सोडून दिल्या तर लक्षात येतं की, त्याही माझं खरं स्वरूप नाहीत. कारण त्या सोडता येतात. उलट त्या सोडल्यामुळं एका बाजूनं आपला चांगल्या अर्थानं मानसिक मृत्यूच घडतो. आणि मग शारीरिक मृत्यूची भीतीच उरत नाही आणि पुनर्जन्मही लागत नाही. जो खरा गुरूंचा आहे, तो आपली मतं, आग्रह, पैसा, इस्टेटी, माणसं, शरीर सगळंच मनानं सोडतो. म्हणून तो निर्भय रहातो.

श्री निसर्गदत्त मला मृत्यूचं भय नाही, असं जे म्हणत त्याचं कारण यातच आहे. त्यांनी म्हटलंच आहे, मी शरीरालाही मृत आहे आणि मनालाही मृत आहे. त्यांना ते स्वरूपसाधनेनं जमलं. आपली साधना कोणत्याही प्रकारची असो, खऱ्या अर्थानं साधना म्हणजे जे माझं नाही, ते माझं नाही अशी मनाला खात्री देणं. ही द्विरुक्ती नाही. जे माझं नाही, ते मला 'माझं' वाटतं ना ? ती अडचण दूर करण्यासाठी हे सांगितलं आहे आणि तो साधनेचा एक भाग आहे. मग अशी खात्री असलेलं मन बळकट व समर्थ असतं. वस्तुस्थितीला सामोरं जाण्याचा असा ज्याचा मानसिक पातळीवरचा अभ्यास झाला, तो मृत्यूला घाबरत नाही ! हे आपल्याला करता येईल.

यासाठी एक मदत म्हणून संतांच्या चरित्रांचा, तसंच सामान्य माणसांच्या, अगदी झाडाच्याही मृत्यूंचा अभ्यास करावा. म्हणजे फरक लक्षात येतो. संतांची मृत्यूकडं बघण्याची दृष्टी काय होती,ती त्यांनी अमलात कशी आणली, ते अभ्यासावं. मग अशुभता, अस्वस्थता निघून जाईल !

*

१२. सामान्य माणसाच्या हृदयात नेहमी भगवंत नसतो का ? की फक्त नाम घेतानाच असतो किंवा त्यावेळेला हृदयात येतो ?

श्वासाच्या बाबतीत जसा सामान्य किंवा असामान्य असा भेद नसतो, तसाच भगवंत असण्यानसण्याच्या बाबतीत नसतो. भगवंत सर्वांचा आहे व तो सर्वांच्या हृदयात असतो. तो या अर्थानं येतजात नाही. तो नसतो अशी वेळ नाही. अडचण अशी की, तो जागा रहात नाही. म्हणजे आपण त्याला जागा राहू देत नाही. किंवा तो जागा रहावा, अशी आपली जीवनपद्धती असत नाही. तेच शिकायचं.

भगवंत जागा रहाणं हे, शब्दशः घेऊ नये. तो जागा रहाणं म्हणजे आपल्यातलं देवत्व जागं रहाणं. ते जागं ठेवण्यासाठी एका बाजूला विवेक-विचार दिलेले आहेत. दुसऱ्या बाजूला अनेक साधनं दिलेली आहेत. त्यांतलं नाम हे प्रमुख साधन आहे. विवेक असो किंवा नाम असो, आपल्या लक्षात येईल की, प्रश्न देवत्व जागं रहाण्याचा आहे, ते कृतीत येण्याचा आहे. विवेक जागा राहिला की, भगवंत जागा राहिलाच. पण ती सामान्यांच्या दृष्टीनं अर्थातच कठीण वाट आहे. म्हणून सामान्य माणसाला इतर साधनं दिली. त्यातसुद्धा देवाच्या सगुण-निर्गुण स्वरूपाचं स्मरण देणारं नाम दिलं. नाम ही भगवंताला दिलेली हाकच आहे. तिनं अंतर्यामीचा भगवंत जागा व्हावा, जागा रहावा हा उद्देश आहे.

आपण स्वतःपुरता विचार करावा की, आपल्यालासुद्धा हाक मारल्यावरच ओ द्यायची सवय आहे ना ? हाक मारल्याशिवाय तत्पर राहणारे, जागे रहाणारे, चौकशी करणारे किती असतील ? म्हणून भगवंताला ती गरज नसली तरी आपल्याला जागं रहायला हाक मिळण्याची गरज आहे, स्मरण मिळण्याची गरज आहे. ते नामानं साधतं. जगाच्या रहाटीच्या,

ओढीच्या, विषयांच्या वाऱ्यानं आपल्या अंतरंगातला भगवंताचा मंद दिवा सारखा विझतो, त्यात तेल कमी पडतं. श्री तात्यासाहेब म्हणत तसं, अनुसंधानाचा दिवा टिकायला नामाचं तेल सतत घालावं लागतं. नामानं हेही होतं आणि विझत्या दिव्याला कडेला हात धरून, तो जाऊ नये म्हणून प्रयत्न करावेत, तसं नामानं विघातक गोष्टींना, विषयांनाही अडवलं जातं. नामाचा दिवा विझू दिला जात नाही.

म्हणून सामान्य-असामान्य कोणाच्याही हृदयात भगवंत सतत जागा ठेवण्यासाठी त्यानं सतत नाम घेत असावं हे चांगलं. सतत याचा अर्थ अगदी शब्दशः लावू नये. नाम जमलं नाही तरी आठवण ठेवता येईल, स्मरण राहील, सवड होईल तेव्हा नाम घेता येईल. व्यवहारानं नाम किती घेता येईल हे ज्याच्या त्याच्या परिस्थितीवर ठरेल. पण देवत्व टिकायला आपापल्या कामांत, कर्तव्यांत त्याचं स्मरण करण्याचे प्रयत्न करता येतील.

जेव्हा आपण कृती करणार, महत्त्वाचे निर्णय घेणार, प्रसंगांना सामोरे जाणार, त्याच्या सुरुवातीला, शेवटी नाम घेतलं गेलं तरी ठीक आहे. पणतीच्या आकाराच्या मानानं तिच्यात तेल मावतं. ते एकदा घातलं आणि वर म्हटला तसा दिवा विझू नये म्हणून हात धरलेला असला, म्हणजे सावधान असलं की झालं. तेल जसं सारखं घालावं लागत नाही तसं नामही इतकं सारखं घ्यावं लागणार नाही, स्मरण पुरेल. एखाद्याचं श्वासावरच चाललं तर फारच उत्तम.

पण सामान्य माणसाला तरी अशा मार्गांनी हृदयातला भगवंत जागा ठेवता येतो, त्याचा अनुभव घेता येतो. त्याचा परिणाम कृतींवर होतो, त्यामुळं आनंदाचा मार्गही चालता येतो !

*

१३. आपल्याला असं दिसतं की, शनीची साडेसाती असताना माणसाला बऱ्याच गोष्टी सहन कराव्या लागतात, नुकसान होतं. विज्ञान तर यांतलं काहीच मानत नाही. मग खरं काय आणि पारमार्थिकदृष्ट्या आपण साडेसाती व ग्रहदशा यांच्याकडं कसं बघावं ?

प्रथम श्री शनिदेवतेला नमस्कार करू. पहिल्यांदा हे लक्षात ठेवू की, हा विषय ज्योतिषशास्त्रातल्या जाणकारांचा आहे. सखोल व अचूक माहिती कृपया त्यांच्याकडून घ्यावी. इथं आपण फक्त अल्पमतीप्रमाणं पारमार्थिकदृष्ट्या शक्य तेवढा विचार करतो आहोत.

विज्ञान म्हणजे विशिष्टांचं ज्ञान. त्यात विश्लेषण आहे, सत्यता पारखणं आहे, अनुभवांची सार्वत्रिकता आहे. उदाहरणार्थ एक वनस्पती आहे, ती विशिष्ट आहे. तिचं विश्लेषण वेगवेगळ्या प्रकारे केलं, ते आवश्यक ते प्रयोग करून ताडून पाहिलं की, काही निष्कर्ष किंवा तथ्यं प्रस्थापित करता येतात. ते विज्ञान - वनस्पतिशास्त्र झालं. पण आता आपण असं पाहू की, आपण एक दृश्य पाहिलं. त्यात अनेक गोष्टी आहेत. वनस्पतीही आहेत. नारळ, केळीची झाडं आहेत. नदी वहाते आहे. वारा वहातो आहे. पक्षी उडत आहेत. प्राणी फिरत आहेत. यांतल्या प्रत्येक घटकाची माहिती वरच्या पद्धतीनं विशिष्टाचं ज्ञान करून घेऊन मिळवता येईल. पण हे एकूण सगळं दृश्य पाहिलं, शांतपणे पाहिलं की, मनुष्य म्हणतो की, हे किती अप्रतिम आहे, हे केवढं सृष्टिसौंदर्य आहे. आता हे कुठल्या विज्ञानात येतं ? तर नाही. त्यामुळं विज्ञानात सर्व काही येतं असं नाही. त्याला त्याच्या मर्यादा आहेत. किंबहुना ते वैशिष्ट्यही आहे, कार्यकक्षाही आहे.

आपल्याला ज्या ग्रहस्थितीबद्दल, मनस्तापाबद्दल, साडेसातीबद्दल

विचारायचं आहे, ते विज्ञानात सापडणार नाही. कारण सगळे सार्वत्रिकतेचे निकष त्याला लागत नाहीत. ते पारखूनही घेता येत नाहीत. उदाहरणार्थ हेच निसर्गसौंदर्य आहे. तर एखादा म्हणेल, आहाहा !, दुसरा म्हणेल, छान !, तिसरा म्हणेल, त्यात काय विशेष आहे ?, ज्याला ते नेहमीचंच आहे, त्याचं त्याकडं लक्षही जाणार नाही. आता गोष्ट एकच आहे, पण त्यावरच्या इतक्या प्रकारच्या प्रतिक्रिया आपल्याला घडताना दिसतात. याचं तुम्ही काय करणार ? इथं संश्लेषणही आहे, सापेक्षताही आहे, असंवेदनाशीलताही आहे, अनेक गोष्टी आहेत. इथं विज्ञान चालत नाही. म्हणून आपण विज्ञानाच्या मर्यादा ओळखून असावं. विज्ञानाबद्दल आदर असावा, पण प्रत्येक गोष्ट विज्ञानानं, तर्कानं पारखून ती सत्य ठरली पाहिजे, ही जी अपेक्षा आहे ती वैज्ञानिक अंधश्रद्धा आहे. विनोबांनी म्हटलंच आहे की, तर्क तो देव जाणावा, या श्रद्धेचे नाव अंधश्रद्धा.

आता इथं आपल्याला शनीबद्दल विचारलं आहे. पण शनी आहे, बुध आहे, गुरू आहे. या नावांचे अवकाशात ग्रहगोलही आहेत. पण ती त्या ग्रहगोलांची नावं नव्हेत. तर या देवता आहेत. त्यांची नावं या ग्रहगोलांना दिली असतीलही. त्या देवतांकडं मायेतल्या व्यवस्थेची काही कामं दिलेली आहेत. त्या यंत्रणा आहेत. त्या देवतांबद्दलचे श्लोक वाचले, इतिहास पाहिला तर आपल्याला हे स्पष्ट होईल. देवता आपापलं काम करीतच असतात. जसं आपल्या माणसांच्या या छोट्याशा व्यवस्थेत काही अधिकार देऊन लोक सर्वत्र नेमलेले असतात. त्यांना पदं-खुर्ची आहे. पण ती खुर्ची म्हणजे तो माणूस नव्हे, तर दिलेले अधिकार व व्यवस्था यांचं ती खुर्ची प्रतिनिधित्व करते. आपल्या व्यवस्थेत खुर्चीतली माणसं बदलली तरी कामं, अधिकार कायम रहातात. ही आपली मानवी व्यवस्था आहे. तशीच एक मायेची फार वरची व वेगळी व्यवस्था आहे. तिचं आकलन

होण्याची किंवा ती पचवण्याची झेप आपल्या सर्वांच्या ठायी नाही. त्यामुळं आपण ग्रहगोलांकडं बोट दाखवून म्हणतो की, हे गुरुत्वाकर्षणामुळं फिरतात, त्यांना स्वतंत्र बुद्धी, शक्ती नाही. त्यांचा आमच्यावर काय परिणाम होणार? पण हा फक्त भूगोल आहे. भूगोल म्हणजे आपण म्हणतो आहोत ती परमेश्वरी व्यवस्था नव्हे.

ही देवतांची नावं आहेत. आणि त्या कार्यनियंत्रक शक्ती आहेत, हे लक्षात ठेवावं. त्या मायेच्या शक्तीखाली आणि माया परमेश्वराच्या अंतिम शक्तीखाली काम करते. तशीच शनी ही एक देवता आहे. त्यांतल्या त्यात शनीचाच प्रश्न आपल्याला जास्त पडला आहे. कारण शनीला भलेभले लोक घाबरतात. ते बरोबरच आहे. कारण तो लोकांची दुर्दशा करून टाकतो. त्यात जे नुकसान होतं, त्याची भीती माणसाला वाटते.

आता वास्तविक जर ती देवता आहे तर तिचं काम नुकसान करण्याचं नसून आपल्याला प्रकाश देण्याचं आहे. ते काम शनीही करीत असणारच. पण प्रत्येक देवतेच्या प्रकाश देण्याच्या, काम करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. बुधाची पद्धत वेगळी, गुरूची पद्धत वेगळी. एक बुद्धीला पटवून देऊन तुमच्याकडून काम करून घेईल. एक मार्गदर्शन करील, बोटाला धरून काम करवून घेईल. शनी फटके देईल आणि काम करून घेईल. कारण महाराज म्हणत तसा तो देवांचा फौजदार आहे. तो त्याच्या पद्धतीप्रमाणंच काम करणार.

एक सोपं उदाहरण सांगतो. पाण्यात गुरं बसलेली असतात. त्यांना जर तिथून बाहेर काढायचं असलं तर कोण कशा पद्धतीनं काढेल ? काही गुराखी हाका मारतील, काही खडे मारतील तर काही काठीनं ढोसतील. तसं हे आहे. जीव जन्माला आला आहे, त्यानं कर्मांचे राहिलेले परिणाम - प्रारब्ध भोगून आणि उरलेली कर्म कौशल्यानं करून, मुक्त व्हावं अशी

योजना आहे. देवतांचं कामही त्या त्या जीवाला परमेश्वराकडं न्यायचं आहे. मुक्त करायचं आहे. फक्त प्रत्येक देवतेची पद्धत वर म्हटल्याप्रमाणं वेगळी आहे.

शनीची एवढी भीती वाटायचं कारण म्हणजे, माणसाला देवाकडं घेऊन जायचं असेल तर त्याला प्रपंचातून, त्याच्या आसक्तीतून बाहेर काढावं लागतं. त्याशिवाय इलाज नाही. ते केल्याशिवाय मूळ काम होत नाही. आता मूळ कामाची कल्पना येऊन ते बुद्धीला पटून करून घेणं वेगळं, मार्गदर्शन करून, मुक्तीची ओढ लावून, मदत करून, आसक्तीतून मोकळं करणं वेगळं आणि प्रपंचाचे झटके देऊन, त्याचा त्रास झाल्यामुळं, त्याची आसक्ती कमी होऊन त्यातून मोकळं होणं वेगळं. शनीचा मार्ग हा असा शेवटच्या प्रकारासारखा आहे.

आता शनीचा त्रास थोडा जास्त वाटतो, याला कारण आहे. समजा एखादा बडबडा माणूस आहे, प्रौढी मिरवणारा माणूस आहे. त्याच्या सहवासात काही कारणानं आपल्याला रहावं लागलं, तर आपण कंटाळतो. तो जर लवकर निघून गेला तर आपल्याला बरं वाटतं. शांत वाटतं. तो मुक्कामी थांबणार असला तर अस्वस्थता येते. समजा शेजारी म्हणून रहायला येणार असेल तर काय वाटेल, आपल्या कामाच्या ठिकाणी दोन-तीन वर्षांसाठी आला तर काय वाटेल, याचा विचार करावा. शनीचा त्रास वाटतो, कारण मुळात त्याची कामाची पद्धत वर म्हटली तशी सकृतदर्शनी त्रासाची आहे. त्यात त्याचा मुक्कामही प्रदीर्घ असतो.

एकदोन दिवसांत आपण माणसाला कंटाळतो. इथं शनिदेवांबरोबर साडेसात वर्षं काढायची आहेत.कालावधी मोठा असल्यामुळं किती काळ सहन करायचं, असं आपल्याला वाटतं. पण ते चांगलं काम करीत असतात, हे विसरून चालत नाही. हा बघण्याचा एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे.

आता शनिदेव फौजदार आहेत. त्यामुळं ते गुलाबाची डहाळी घेऊन तुमच्यामागं फिरणार नाहीत की वाऱ्याची झुळूक घेऊन येणार नाहीत. हे उघड आहे. ते दंडुकाच घेऊन येणार. ते कधी माणसांच्या रूपानं असणार, कधी परिस्थितीच्या रूपानं असणार. पण ते काम काय करतात, ते लक्षात घेणं हे पारमार्थिकदृष्ट्या महत्त्वाचं आहे. आपल्याला सतत प्रपंचाचीच चिंता पडलेली असते. त्यात अडचण आली, त्रास झाला की सहन होत नाही. अशा वेळी त्यानं आपलं कल्याण होतं आहे, याची जाणीवही रहात नाही.

तो जे आपलं प्रापंचिक नुकसान करतो, अनपेक्षितपणे मनस्ताप निर्माण करतो, त्याची आपल्याला भीती वाटते पण त्या रूपानं आपलं प्रारब्ध कमी होत असतं, आपण हलके होत असतो, मुक्तीच्या दिशेनं लवकर पुढं जात असतो, हे लक्षात येत नाही. म्हणून ही अडचण वाटते. प्रापंचिक अनुकूलतांत मनुष्य बेसावध होतो. त्याचं आयुष्य कसं जातं, हे त्याला कळतही नाही. देवाचा, गुरूचा, उपासनेचा त्याला विसर पडतो. हे शनीला चालत नाही. म्हणून तो प्रापंचिक प्रतिकूलता उभ्या करतो. त्यामुळं या सगळ्या गोष्टींची जाणीव आपल्याला होते. प्रपंचाचं फोलपण चांगलं लक्षात यायला लागतं. या अर्थानं शनीच्या या कृपेमुळं परमार्थाच्या वाढीसाठी लागणारी वैराग्याची आवश्यक बैठक निर्माण होते. यात अंतिमतः हितच आहे. शनीचं एक नाव 'कोणसंस्थ' असं आहे. म्हणजे कोपऱ्यात बसलेला. म्हणजे तो आलेलाही कळत नाही. त्रास झाला की कळतं. यावरून त्याची काम करण्याची पद्धत कळेल.

सारांश, शनीकडं पारमार्थिकदृष्ट्या माणसाला तयार करण्याचं काम दिलेलं आहे. फक्त त्याची कामाची पद्धत वेगळी आहे. त्रासदायक वाटली तरी प्रभावी आहे, एवढं लक्षात ठेवलं म्हणजे झालं !

*

१४. सद्‌गुरूंची आपल्यावर कृपादृष्टी आहे, हे आपण कसं ओळखायचं ? आपण त्याला पात्र कसं व्हायचं ?

आपली प्रापंचिक स्थिती जरी आपल्या कर्मांनुसार ठरत असली तरी ती जरूर तेवढी प्रतिकूल ठेवून आपली पारमार्थिक प्रगती उत्तम करण्यावरून गुरूंची कृपादृष्टी ओळखावी. आपल्या मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टींमध्ये आपलं चित्त कसं रहातं, यावरून ओळखावं. प्रपंचात आणि परमार्थात घडणाऱ्या गोष्टींमध्ये कोणत्या गोष्टींचं महत्त्व आपल्याला वाटतं, त्यावरून ओळखावं. प्रपंचात प्रतिकूलता देण्यामागं गुरूंची कृपादृष्टी असते. प्रपंचात अनुकूलता देण्यामागं कृपादृष्टी ऐवजी परीक्षा असते.

प्रपंचात अनुकूलता असेल तर किती लोक परमार्थाकडं वळतील, किती लोक प्रगतीचं प्रमाण राखू शकतील, ते कशाला गुरूंकडं किंवा भगवंताकडं जातील, याचा विचार करावा. बायको, मुलं मनासारखी आहेत, मुलं उत्तम शिक्षण घेत आहेत, त्यांना चांगलं वळण आहे, नोकरी-व्यवसाय उत्तम चाललेला आहे. तर मग कशाला कोण परमार्थाकडं येईल ? देवाची गरजही वाटणार नाही ! पण यात खऱ्या कर्त्याचा विसर पडल्यामुळं आणि आपण ज्यासाठी जन्माला आलो, ते साध्य होत नसल्यामुळं आपलं पारमार्थिकदृष्ट्या नुकसान आहे, हे आपल्या लक्षात येत नसलं तरी गुरूंच्या येत असतं. म्हणून ते या प्रतिकूलता देऊन आपल्याला सावध करीत असतात. ती त्यांची कृपादृष्टीच आहे.

तिला पात्र होण्यासाठी, अनुकूलता दिली तर, परीक्षा समजून सावध रहाण्याएवढी साधना करावी. प्रतिकूलता दिली तर, उद्देश ओळखावा, कृतज्ञ रहावं आणि तळमळीनं साधना करावी. या मार्गानं आपण त्यांच्या कृपेला पात्र होऊ शकू !

*

१५. जीवनात अयशस्वी झालेली किंवा कुणाशी विशेष न पटणारी माणसं बऱ्याच वेळा देवस्थानं किंवा संस्थानं अशा ठिकाणी आढळतात. काही वेळा स्थानं प्रसिद्ध असूनही तिथं गेल्यावर प्रसन्नता, पावित्र्य किंवा भाव न वाढता उलट कमी होऊन, इथं आपण उगीच आलो असं वाटतं. असं का होत असावं ?

आपला प्रश्न थोडा थेट व धाडसी आहे. हे निरीक्षणही पुरेसं असेल आणि पूर्णतः असेल असं मला वाटत नाही. देवस्थानांच्या ठिकाणी असलेली बरीच माणसं त्यागाची, निष्ठेची, उपासनेचीही असतात. नाहीतर अशी स्थानं टिकणारही नाहीत. त्यांचे सन्मान्य अपवाद आपण गृहीत धरून या प्रश्नाचा विचार करू.

आपल्याप्रमाणं अनेकांना असा अनुभव येतो हे खरं आहे. अयशस्वी माणसं अशा ठिकाणी असतात, याचं एक सकारात्मक साधं उत्तर असं आहे की, बाहेरचं जग अयशस्वी माणसांना नाकारतं. ज्याचं कुणी नसतं त्यांना देव असतो. मग अशा अयशस्वी माणसांना प्रपंचाऐवजी अशा ठिकाणांचा आधार मिळतो.

दुसरं असं की, जर प्रपंचामध्ये मनुष्य यशस्वी असेल तर त्याचा प्रपंच उत्तम चालतो. इतरांना त्याची गरज लागते. अशी किती माणसं असा यशस्वी व सुखाचा वाटणारा प्रपंच सोडून देवस्थानसारख्या ठिकाणी कामाला आणि सेवेला येतील ? याचाही आपण विचार करावा.

तिसरं असं की, मनुष्याचं इतरांशी पटत नाही यालाही काही कारणं आहेत. एक तर अशा अनेक माणसांना एककल्लीपणाची, काही वेळेला लौकिक बुद्धिमत्तेचीसुद्धा देणगी असते. प्रपंच तर तडजोडीचा आहे. ही माणसं तडजोडीला तयार नसतात. आग्रही असतात. काहींना

हे सगळं असतं, पण निर्णयशक्तीचे अभाव असतात. धरसोडवृत्ती असते. तडजोड हे जीवनाचं स्वरूप आहे, याची त्यांना वेळीच कल्पना आलेली नसते. तसं शिक्षण किंवा संस्कारही त्यांना घडलेले नसतात. मग त्यांचं जगाशी जमत नाही. स्वाभाविकपणे ज्याच्याशी जमत नाही अशा जगात राहण्यापेक्षा, ते या कुठली बांधिलकी नाही असं वाटणाऱ्या जागेच्या शोधात असतात. त्यावर त्यांना अशी स्थानं हा एक उपाय वाटतो.

चौथं कारण असं आहे की, काहींना व्यवहाराचं स्वरूप नीट लक्षात आलेलं नसतं. त्यात जशी तडजोड आहे तसेच अपरंपार कष्टही आहेत. शिवाय शिक्षणासारखे शास्त्रीय स्वरूपाचे आणि वेळीच करायचे व्यवस्थित प्रयत्नही आहेत. त्यानुसार फळं येतात. पुढचे प्रयत्न करावे लागतात. त्यात झळ आहे. समाजाचं करावं लागतं. यशापयश सोसणं आहे. निंदा आहे. व्यवहाराच्या या स्वरूपाची शिकवण आणि आचरण याचा अनेकदा अभाव असतो. मेळ बसत नाही. म्हणून त्यांचं समायोजन प्रपंचाच्या ठेवणीशी होत नाही. मग अशी माणसं असे पर्याय शोधतात. तिथं हे टळतं असं नाही, पण टळेल असं त्यांना वाटतं.

पूर्वीच्या काळी माणसाला काही जमलं नाही तर निदान शिक्षक तरी हो असं म्हटलं जाई. अशी परिस्थिती अर्थात तेव्हाही खऱ्या अर्थानं नव्हती, आत्ताही नाही. पण शिक्षण अर्धवट राहिलं, कुणाशी जमेनासं झालं, लग्नकार्य होत नसलं किंवा त्याची बांधिलकी नको वाटत असली तर मग इतर लोकही तू आपला निदान देवाच्या ठिकाणी तरी रहा, असं म्हणतात. त्यांना वाटतं, तिथं थोडेफार कष्ट करील, एरवी निवांत असेल आणि पोटापाण्याची सोय मिटेल. साध्या शब्दात तिथलं जिणं, बिनकष्टाचं आणि कुणालाही जमण्यासारखं आहे, असा एक समज आहे. अर्थातच संस्थान किंवा देवस्थानचा उद्देश खरा व शुद्ध टिकायचा असेल, तर हा

समज नक्कीच चुकीचा आहे, हे आपल्याला पटेल.

खरं तर परमार्थात असं मुळीच नाही. सेवेलासुद्धा ज्ञान आणि कौशल्य लागतं. आपल्या घरातला साधा केर काढायच्या कृतीला जर कौशल्य लागत असेल, तर अशा सामुदायिक उपासनेच्या जागी ज्ञान आणि कौशल्याशिवाय कसं काम होईल ? ते तर लागेलच. याविषयी असे बरेच अपसमज आहेत, म्हणूनही माणसं तिथं जातात.

प्रपंचाला कुटुंबापासूनच एक बांधीव स्वरूप आहे. दैनंदिन कामांत त्या माणसांचा आणि बांधिलकीचा संबंध आहे. देवस्थानातली मूळ माणसं सोडली तर इतर कधीतरी येणाऱ्याला असं वाटतं की, तिथं मुक्त वातावरण आहे. कारण येणारे बरेचसे व्हिजिटर्स-भेटीदाखल आलेले असतात. ते काही तासांसाठी किंवा एखाद्या दिवसासाठी येतात. कुणी तर नुसत्या दर्शनासाठी येऊन जातो. त्यामुळं बऱ्याचशा माणसांचा जास्त काळ संबंध येत नाही. अनेकदा तो पुन्हापुन्हा व लवकरही येत नाही. त्यामुळं एवढी बांधिलकी वाटत नाही. तासभर चांगलं रहाणं सोपं असतं. घरात चोवीस तासांचा आणि बारा महिन्यांचा संबंध आहे. मग चांगलं राहण्याची परीक्षा होणारच. ती अवघड आहे. त्या मानानं हे सोपं पडतं. म्हणून सेवेकरी कसाही असला तरी त्याचा जास्त संबंध येत नाही. तो जसा असेल तसा चालून जाऊ शकतो, असं वाटतं.

देवस्थानातलं वातावरणही मुळात थोडं मिस्टिक-गूढ असतं. संबंध थोडा असतो, शंका-प्रश्नांना फारसा वाव नसतो, मोठी उत्तरदायित्वं नसतात. उदबत्ती लावल्यावर छान वाटावं तसं आलेल्याला तो थोड्या वेळासाठीच आलेला असल्यामुळं छान वाटतं. त्यामुळं सेवेकऱ्यांनाही स्वतःत फारसे बदल न करता स्वतःला छान वाटतं, छान समजता येतं. हे प्रपंचात नाही. प्रपंचात माणूस खराच बदलला असला तरच छान वाटतो.

कारण चोवीस तासांचा संबंध आहे. त्या दृष्टीनंही संस्थानचं किंवा देवस्थानचं वातावरण अनेकांना सोयीचं वाटतं. म्हणून ते तिथं जातात. त्यात त्यांची चूक नाही, पण फसगत आहे.

या म्हणण्याची सत्यता पहायची असली, तर एरवी छान वाटणारं, सौजन्याचं वाटणारं, पवित्र वाटणारं वातावरण हे दर्शनासाठी आलेले, तात्पुरते येऊन गेलेले, आरती-उत्सवापुरते येऊन जाणारे लोक गेले की, पहावं. मग उरतात ते नेहमीचे सेवेकरी. मग त्यांचे खरे स्वभाव, खरे संबंध, सौजन्य, पावित्र्य यांच्या स्थितीवरून खरी कल्पना येईल. कारण आता ते कायमचे बरोबर रहाणारे असतात. म्हणजे तो एक प्रपंचच उरतो. त्यात त्याची खरी स्थिती कळून जाते.

याचा अर्थ देवस्थान किंवा संस्थान असू नये, त्यांत कुणी माणसांनी जाऊ नये असा नक्कीच नाही. आधी म्हटलं तसे सन्मान्य अपवाद हे असतातच. ते आदर्श घालून देत असतात. त्यानुसार वागण्यासाठी तिथं जावं. मुद्दा असा की, सेवेच्या नावाखाली देवस्थानात जाऊ नये. खरी सेवा करायची असेल तर घरातल्या किंवा शेजारच्या लहान, अपंग मुलांपासून वृद्ध मंडळींपर्यंत कुणाचीही सेवा आपण प्रपंचात राहूनसुद्धा करू शकतो. सेवा हा स्वतंत्र विषय असल्यामुळं त्याच्या तपशिलात मी इथं जात नाही. पण एक नक्की की, इथंही सेवा शक्य आहे आणि ती खरीच करायची असली तर कष्टाची आहे. त्यात झळ लागेल. ती अवघड आहे. पण जास्त फळ देईल आणि पुढंही नेईल. त्यासाठी म्हणून, कुठं जावं लागणार नाही. मला गरज वाटते म्हणून मी सेवेसाठी कुठं जाणं वेगळं आणि असं स्थान चालावं म्हणून, त्यांना गरज आहे म्हणून, कुठं जाणं वेगळं, हे लक्षात घ्यावं.

आधी म्हटलं तशा इतर कारणांनी आणि एक पळवाट म्हणून

अशा स्थानांत जाणारी माणसं तिथं एकतर टिकत नाहीत, टिकली तर तटे, भांडणं अशा अनेक स्वभावदोषांमुळं तिथलं वातावरण प्रदूषित करतात. त्यात त्यांचं आत्मनियंत्रण कमी व्हायला लागलं की, त्याचा परिणाम सगळ्या वातावरणावर आणि त्याचं पावित्र्य, शांतता, येणाऱ्या भाविकांना मिळणारी सेवा - या सगळ्यांवर व्हायला लागतो. पूज्य काकासाहेबांनी एकदा व्यक्तीच्या आदराच्या बाबतीत सांगितलं होतं की, काही व्यक्तींच्याबद्दल आपल्याला आदर वाटतो. तो काही ऐकल्यामुळं असतो, काही वेळेला त्यांचं काही लेखन वाचल्यामुळं असतो, कुणाचं प्रवचन ऐकल्यामुळं असतो. त्याची परीक्षा कशावरून करावी ? लांबून आदर वाटला तर आदर वाटण्यासारखं काहीतरी आहे, हे खरं आहे. पण हा आदर तुम्ही जसजसे त्या व्यक्तीच्या जवळ जाल तसतसा जर आदर वाढत गेला तर तिथं 'खरं काहीतरी' आहे. कारण लांबून आदर वाटण्याच्या गोष्टी या कदाचित कौशल्याच्या, विद्वत्तेच्या, अभिनयाच्या - अशा इतरसुद्धा असू शकतील.पण जवळ गेल्यावर आचरण, प्रेम, निरपेक्षता, निःस्वार्थीपण, कृतज्ञता, स्नेह - अशा अनेक गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव येत असतो. म्हणून जवळ गेल्यानंतर आदर वाढला तर तो आदर खरा ठरेल, ती आदराची परीक्षा ठरेल.

हे सारं या माणसांना आणि या स्थानांना लावून पहावं. माणसांच्या बाबतीत ती मूळ उद्दिष्टांसाठी आलेली असतील, तेच काम करीत असतील तर अशा स्थानी गेल्यावर त्यांना भेटणं, देवाला भेटण्याइतकं पवित्र वाटेल. पण ती मूळ उद्दिष्टांसाठी आलेली नसली, तर असे उलट अनुभव येतात. स्थानांच्या बाबतीतही ती स्थानं ज्या मूळ उद्दिष्टांसाठी निर्माण झाली आहेत, त्याची जपणूक होत असेल तर आपल्याला अशा स्थानी गेल्यावर अनायासे चित्तवृत्ती पालटणं, शांतीचा अनुभव येणं, सहजपणे पवित्र विचार मनात

येणं, मनाची मलिनता जाणं, नाम किंवा ध्यान सहजपणे होऊन त्यात आनंद निर्माण होणं - असे अनुभव येऊ शकतात. पण मूळ उद्दिष्टांपासून ती स्थानं दूर गेली असली तर अर्थातच उलट अनुभव येतो. आपण म्हणता तशी चित्ताला अस्वस्थता येते, भाव वाढण्याऐवजी कमी होतो.

सारांश, कामं करताना मूळ उद्दिष्टं व त्यांचा गाभा लक्षात ठेवण्याचा प्रश्न आहे. तो व्यक्तीलाही आहे आणि संस्थान किंवा देवस्थानलाही आहे. त्यासाठी व्यक्ती, उपासनेच्या आणि उपदेशाच्या आचरणाच्या गाभ्यावर स्थिर असावी लागते. तर संस्थान किंवा देवस्थान, त्याच्या स्थापनेच्या मूळ उद्दिष्टांवर स्थिर असावं लागतं.

शांतता, प्रेम, सद्भावांची वाढ, उपासनेची प्रेरणा, वृत्तीच्या बदलांना अनायासे गती - अशा गोष्टींसाठी उपासक स्थानाकडं येत असतील, तर स्थान मूळ उद्दिष्टांवर स्थिर आहे, असं समजावं. स्थान प्रेक्षणीय झालं, लोकांची ते पहायला-खायला-प्यायला गर्दी व्हायला लागली की, स्थान उद्दिष्टांपासून दूर गेलं असं समजावं.

हे सारंच शेवटी माणसांच्यावर, त्यांच्या योग्य समजुतींवर, आकलनांवर, उद्दिष्टांचा मूळ गाभा कायम ठेवून, काळाशी सांगड घालून शाश्वत मूल्यं जपण्यावर अवलंबून आहे. म्हणजे ही किती सावधतेची गोष्ट आहे, हे आपल्या लक्षात येईल. माणूस म्हणून सर्वांची ठेवण पुन्हा बाह्यांगाची व प्रपंचाची असल्यामुळं अशी उद्दिष्टं जपणं अधिकच सावधानतेचं काम होतं. गाण्यात जसे पूर्वांगप्रधान-उत्तरांगप्रधान राग असतात, तसा प्रपंच हा बाह्यांगप्रधान राग आहे. त्या गायकीची सवय असल्यामुळं माणसाला काय नि स्थानांना काय परमार्थाचा अंतरंगप्रधान राग गाणं अवघड जातं. पण ते किती गरजेचं आहे, हेही लक्षात येईल.

*

१६. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर संपत्तीच्या वाटणीत मुलांची-मुलींची भूमिका काय असावी ?

अलीकडं बऱ्यापैकी सुबत्ता आल्यामुळं, जो तो आपापल्या हक्कांना जागरूक झाल्यामुळं, काही कायदे झाल्यामुळं आई-वडिलांच्या हयातीत त्यांच्याशी कसं रहावं, त्यांच्या बाबतीत आपलं कर्तव्य काय असावं यापेक्षा मृत्यूनंतर संपत्तीच्या वाटणीतल्या भूमिकेचा प्रश्न विचारणं कदाचित आवश्यक झालं की काय, कुणास ठाऊक ? असो. आपण क्रमानं शक्य तेवढा विचार करू. मुली-जावयांनी यातूनच बोध घ्यावा.

१६.१. आई-वडील असेपर्यंत तरी निदान त्यांच्या संपत्तीचा कुठला विचार आपण करू नये.

१६.२. हे महत्त्वाचं अशासाठी आहे की, हा विचार आधीच मनात आला आणि वाटण्याएवढी संपत्ती सुदैवानं-दुर्दैवानं असली तर आपल्याला स्वावलंबनाचे कष्ट नकोसे वाटायला लागण्याची कदाचित शक्यता आहे. म्हणून असा कुठला विचार न करता आपल्या जीवनाच्या जबाबदाऱ्या पेलण्यापुरतं आपण स्वावलंबी असावं.

१६.३. शरीर, सद्‌बुद्धी, शील, संस्कार ही आईवडिलांनी दिलेली खरी संपत्ती आहे, हे लक्षात ठेवावं. अर्थात, तिची वाटणी करण्याचा प्रश्नच नाही. ती सर्वांनाच मिळालेली असते. ती सांभाळावी.

१६.४. वडिलोपार्जित संपत्तीच्या बाबतीत आपली खरी भूमिका विश्वस्ताची आहे, हे लक्षात ठेवावं. म्हणजेच आईवडिलांच्या या संपत्तीबद्दलच्या इच्छा, व्यवस्था, त्यांची मृत्युपत्रं यांचं पालन करणं, हे आपलं कर्तव्य, आपले व्यक्तिगत स्वार्थ, लोभ, आसक्ती अशा गोष्टी आड येऊ न देता,

- हे विश्वस्ताचं काम चांगल्या पद्धतीनं करता येतं.

१६.५. आईवडिलांनी कुठली इच्छा किंवा व्यवस्था केली नसल्यास, आपण सर्व भावंडं समान समजून आधी इतरांचे वाटे त्यांना द्यावे. मग आपला वाटा बाजूला करावा. पारमार्थिकदृष्ट्या हा बिनकष्टाचा पैसा असल्यामुळं त्याचं शुद्धीकरण केल्याशिवाय आपल्या प्रपंचात तो वापरायला घेऊ नये. असं शुद्धीकरण तो पैसा कोणत्या मार्गानं आला आहे, त्यानुसार दहा ते पंचवीस टक्क्यांपर्यंत दान करण्यानं होऊ शकेल.

१६.६. आपल्याला खरोखरच व्यक्तिगत दारिद्र्य किंवा गरज असल्यास अशा शुद्धीकरणानंतर या पैशाचा गरजेप्रमाणं विनियोग करावा.

१६.७. आपल्या कष्टांनुसार आपल्याला प्रापंचिक कर्तव्य पुरी करायला पुरेसा पैसा असेल तर या पैशाची गरज आपल्याला नाही, तो दुसऱ्या कुणातरी गरजूसाठी आहे, ज्याला आईवडील नाहीत किंवा त्यांच्याकडून काही वाट्याला आलं नाही अशा निराधारांचा तो पैसा आहे असं समजावं. आणि त्या कामी - समाजसेवेला तो वापरावा.

१६.८. ही भूमिका आचरत असताना, आपले स्वार्थ आपल्याला आवरावे लागतात, हे खरं असलं तरी ते अंतिमतः आपलं स्वास्थ्य व आपल्या मुलांवर संस्कार - यांसाठी हे नक्की उपयोगी पडेल.

१६.९. अशी संपत्ती ही स्वकष्टार्जित नव्हे, म्हणून यावरून मतभेद किंवा वितुष्टांना संधी देऊ नये. अशा संपत्तीवर हक्क सांगणं म्हणजे वडील बुद्धिमान होते, म्हणून मला प्राईज द्या म्हणण्यासारखं आहे, एवढं कळलं तरी पुरे.

*

१७. आजच्या काळानुसार ज्येष्ठ नागरिकांना परदेशी किंवा परप्रांतात मुलांकडं तीन-चार महिने किंवा काही वेळा दीर्घकाळही रहायला जावं लागतं. त्यावेळी याकडं त्यांनी कसं पहावं व साधनेचं रूटीन कसं ठेवावं ?

आजकाल हा प्रश्न बऱ्यापैकी सामान्य-कॉमन प्रश्न झालेला आहे. जीवन जसं पुढं जातं, तसे प्रश्नही बदलत जातात. जसे नवीन प्रश्न निर्माण होतील तशी काळानुसार नवीन उत्तरंही मिळतील. शोधावी लागतील. ती मिळली की, त्यांचा स्वीकार करण्याची आपण तयारी ठेवावी.

आजच्या काळात पहिली भूमिका अशी असावी की, हे अपरिहार्य आहे. परप्रांतात असो, परदेशी असो - जाण्यासाठी आपलं पहिल्यापासून बसलेलं रूटीन सोडावं लागतं, तिथं अडचण येते. निवृत्त झाल्यावर पूर्वीच्या काळीही काही लोकांना मुलांच्या नोकऱ्यांच्या गावी जाऊन रहावं लागत होतंच. आजच्या उदारीकरणाच्या काळात परदेशाच्या कुठल्याही टोकाला जाऊन रहावं लागतं, एवढाच फरक. या वस्तुस्थितीचा स्वीकार करावा. हे जर स्वीकारलं गेलं नाही, आणि आहे तिथं रहाण्याएवढी शारीरिक, आर्थिक स्थिती असली तर आम्ही यात कशाला पडावं, असं म्हणून पहिल्यापासूनच संघर्षाला सुरुवात होऊ शकते, ती टाळावी हे बरं.

दुसरं असं की, काहींना परदेशी जाण्याचंही आकर्षण असतं, हौसही असते. ते ठीक. तरी, उतरत्या वयात, कमी राहिलेल्या आयुष्यमानात जर खरंच परमार्थ करायचा असेल तर लौकिक हौस पुरवण्यापेक्षा परमार्थाला मिळालेली ती एक संधी आहे, अशी भूमिका ठेवली तर सावधही रहाता येईल आणि तिथं गेल्यावर होणारं अकारण फिरणंही टळेल.

जाणाऱ्या व्यक्ती कोण आहेत - स्त्री किंवा पुरुष- यावर या

परिस्थितीचा उपयोग कसा करून घ्यायचा हे अवलंबून राहील. ज्येष्ठ स्त्रिया जर मुलीच्या किंवा सुनेच्या बाळंतपणासाठी गेल्या असल्या तर त्यांच्या आणि त्यांच्याबरोबर जाणाऱ्या त्यांच्या पतींच्या कामात आणि अर्थातच त्यांच्या साधनेच्या रूटीनमध्ये फरक असू शकतो. पण उभयतांना ही एक संधी आहे, तिचं चीज आपापल्या परीनं करता येईल.

आपल्याला इतर वेळी घरी जप करण्यात अडचणी येतात. वाजलेली बेल, फोन, आलेला माणूस, नातेवाईक, परिचित व्यक्ती, त्यांची कर्तव्यं या गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळं बाहेर जाऊन जप करावा लागतो. आपापल्या घरातल्या, गावातल्या व्यवहाराच्या चौकटी बसून गेलेल्या असतात, त्या मोडता येत नाहीत. इष्टही नाही.

तिथं मात्र या अडचणींना एक मोठा पर्याय आपसूकच निघालेला असतो. तिथं त्या अर्थानं कोणतं बंधन नसतं. व्याप नसतात. भाषेचे प्रश्न असतात. संपर्क कमी असतात. आता त्याचा लाभ करून घ्यायचा असला तर तिथं निर्माण होणारे संबंध जरुरीपुरते ठेवता येणं शक्य आहे. समजा बदल म्हणून, मुलांच्या इच्छेसाठी रहायला गेलो असलो तर त्यांना ज्यात आनंद वाटतो तेवढ्या गोष्टी केल्या की, आपण उपासनेला मोकळे होऊ शकतो. ज्या गोष्टी इथं राहून एकांताच्या, वेळेच्या अभावी आपल्याला करता आल्या नाहीत, त्यांची यादी ठेवावी. उदाहरणार्थ पारायणं, वाचनं, सप्ताह, श्रवण, संकल्पित जप इत्यादी. त्या आता आपली तिथली कर्तव्यं करून, आपला दिनक्रम ठरवून आपल्याला पार पाडता येतील.

कदाचित आपली इच्छा असूनही मागं पडलेली साधना पुरी करण्यासाठी देवानं व्यवस्था केली आहे, असं मानलं तर या गोष्टीचा त्रास न वाटता ती संधी ठरेल !

*

१८. मला साधनेचं महत्त्व पटलेलं आहे. माझं वय पंचेचाळीस वर्षं आहे. माझी सांपत्तिक स्थितीही बऱ्यापैकी आहे. आमच्याकडं स्वेच्छा निवृत्ती योजनाही आहे. मी निवृत्ती घ्यावी का किंवा याचा विचार कसा करावा ?

प्रश्न विचारणारी व्यक्ती प्रापंचिक आहे व तिला साधना करण्याची पुरेशी कल्पना व आवड आहे, असं गृहीत धरून त्याचं उत्तर मांडतो.

१. आपलं ध्येय कसं निवडावं आणि ते कसं साध्य करावं यांविषयी आपल्याकडं पूर्वी चर्चा झालेल्या आहेत. तरीही या प्रश्नाच्या निमित्तानं त्याचा सारांश पाहू आणि त्यात काही भर घालता येईल का, तेही पाहू.

२. प्रथम आपल्यावरच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या कुठल्या आहेत त्याचा विचार करावा. कारण महाराजही कर्तव्यांना प्राधान्य देतात. ते व्यक्ती म्हणून आणि समाज म्हणूनही विचारणीयच आहे. या जबाबदाऱ्या पूर्ण करायला आपल्याला किती काळ अजून नोकरी करावी लागेल याचा - बाहेरची महागाई, लोकरीतीच्या अपेक्षा अशा गोष्टी विचारात घेऊन निर्णय घ्यावा. त्यावरून आपलं स्वतःचं मनाशी एक निवृत्तीचं वय काढावं. प्रत्येकाच्या बाबतीत त्याच्या कुटुंबाच्या ठेवणीप्रमाणं हा विचार वेगवेगळा करावा लागेल, हे उघड आहे.

३. वरचा विचार करताना, आजच्या काळातली जीवनपद्धती पहाता, आज असलेली किंवा पुढं वाढू शकणारी आजारपणं आणि त्यांचा अपेक्षित खर्च यांचाही विचार त्यात केलेला असावा. हे अनिश्चित स्वरूपाचं असलं तरी आपण विचार केलेला असला म्हणजे अशा अनपेक्षित गोष्टींना सामोरं जायची जरी वेळ आली तरी देव आपल्याला सांभाळून घेतो.

४. नोकरीतील नियम, प्रकृतीची स्थिती या आपल्याला निवृत्त करीत असतातच. परमेश्वर तर आपल्याला पूर्ण निवृत्त करणार आहेच. आपणच स्वतःला कधी निवृत्त करणार, हा प्रश्न आहे. आणि त्यासाठी आपण करता आहात तो विचार स्वागतार्ह आहे. कारण परमार्थ म्हणजे आपलं कर्तव्य संपल्यानंतर नोकरीत काय, प्रपंचात काय न रेंगाळणं म्हणजेच रिटायर होणं. ते व्हायला, स्वतः तयार होणं, यासारखी आनंदाची गोष्ट नाही. त्यात इतरांचं स्वास्थ्यही जपलं जातं, इतरांच्या कर्तृत्वालाही वाव मिळतो. त्या अर्थानं कुटुंबव्यवस्थेतूनसुद्धा स्वेच्छेनं, समजून, इतरांना कल्पना देऊन एक प्रकारानं निवृत्त होणं चांगलंच.

५. श्री महाराजांनी म्हटलं आहे की, संस्थेतसुद्धा आपण हवे असतो तोपर्यंतच रहावं, हे चांगलं. ते लक्षात ठेवावं. आपल्या गरजांची त्याच्याशी सांगड घालावी. आणि मग कुठल्याही संस्थेतून-व्यवस्थेतून निवृत्त व्हावं. वयं झाली, कार्यक्षमता कमी झाली, पर्यायी माणसं असली तरी पदांना चिकटून रहाणाऱ्यांनी केवढी अस्वास्थ्य निर्माण केली आहेत, ते आपण पहातो आहोतच. हे कदाचित कुटुंबातही असेल, राष्ट्रीय पातळीवरच्या एखाद्या व्यवस्थेतही असेल.

६. आता आपल्याला साधनेचं महत्त्व पटलेलं आहे, त्याबद्दल विचार करूया. ती गोष्ट खूप चांगली आहे. त्यामानानं वेळेत घडलेली आहे. फक्त ती पटणं वेगळं आणि त्यासाठी करायची साधना, तिचा कालावधी आणि त्यात मिळणारा आनंद - हे वेगळं, हे लक्षात घेण्याची गरज आहे. नुसतंच महत्त्व पटलं म्हणून आपण निवृत्त होणार असू आणि निवृत्तीमुळं निर्माण होणारा सर्व रिकामा वेळ साधनेत घालवण्याची आपली शारीरिक विशेषतः मानसिक तयारी झाली नसली, तर आपला निर्णय हे

अस्वास्थ्याला आमंत्रण ठरतं. त्यात वेळ कसा घालवावा या प्रश्नापासून अकारण कुठल्यातरी गोष्टींत गुंतून स्वतःला आणि इतरांना त्रास उत्पन्न होण्यापर्यंत कोणतीही परिस्थिती वाट्याला येऊ शकते, याची आपल्याला पूर्वकल्पना असलेली बरी.

७. होतं काय की, जप खूप करावासा वाटतो. सध्या नोकरीमुळं त्याला तासभरच वेळ मिळतो. आपल्याला असं वाटतं की, आपण निवृत्त झालो की, ही अडचण दूर होईल आणि आपण सातआठ तास जप करू शकू. पण प्रत्यक्षात सातआठ तास त्यात रहाण्याची तरी आपली तयारी झाली आहे की नाही, याचा विचार नोकरी सोडण्यापूर्वीच करावा लागतो. तो न केला तर एकदोन दिवस बरे जातात. पण पुढं मात्र तास-दोनतासांच्या वर जपात लक्ष लागत नाहीसं होतं. इतर संपर्कही कमी झालेले असतात. कामं, बाहेर पडणं, इतर लोकांच्या भेटीगाठी होणं, अनेक विषय कळणं, त्यावर चर्चा होणं - अशा अनेक गोष्टी आता शक्य राहिलेल्या नसतात. नुसत्या नोकरीतच नव्हे तर नोकरीच्या जागी असलेल्या लोकांतसुद्धा परतण्याची आता संधी नसते. मग अकारण आपलं चुकलं की काय, आपण गडबड केली की काय असे नकारात्मक विचार मनात गर्दी करतात. त्यांत या मूळ निर्णयाला विरोध असलेले नातेवाईक किंवा सहकारी काही वेळा आणखीच नकारात्मक चर्चा करून भर घालतात. मग जपातही लक्ष लागत नाही. इतर साधनाही होत नाही.

८. या सगळ्याचा योग्य विचार करून असा निर्णय घेण्यापूर्वी प्रथम काही काळ आहे त्या नोकरीत उपलब्ध असलेली दीर्घ मुदतीची रजा घेऊन दिवसभर आपण साधनेत काढू शकतो का, जपाव्यतिरिक्त इतर कोणत्या साधनांत आपण राहू शकतो, घरच्या कामांत अकारण न गुंतता, मिळणारा

जादा सातआठ तासांचा वेळ आनंदानं कारणी लावू शकतो का याचा प्रयोग करावा. पुढच्या आर्थिक नियोजनासारखीच, वेळी त्यापेक्षाही जास्त महत्त्वाची ही तयारी आहे. कारण तिच्यावर उद्धाराची साधना तर अवलंबून आहेच, पण त्याहीपेक्षा आपल्या कुवतीचं रास्त आकलन आणि त्यामुळं टिकणारं स्वास्थ्य हे अवलंबून आहे. म्हणून असा प्रायोगिक अंदाज निर्णय घेण्यापूर्वी अवश्य घ्यावा.

९. नोकरीत असताना जसा आपण साधनेला वेळ देऊ शकत नाही, तसा अनेकदा सामाजिक कामांनाही वेळ देऊ शकत नाही. वास्तविक समाजऋण म्हणून त्याचीही गरज असते. ते काम कॉलनीतला केर काढण्यापासून, एखाद्या सामाजिक कार्यात भाग घेण्यापर्यंत काहीही असू शकतं. अशा काही कामांचीही आपण आखणी करून ठेवावी.

१०. कामं साधनेची असोत किंवा वर म्हटली त्याप्रमाणं सामाजिक असोत, ती जितकी स्वावलंबी व निरपेक्ष असतील तितकी चांगली ठरतात. म्हणजे असं की, साधनेत एखाद्या सत्संगात जाण्यासाठी आपण निवृत्त झालो आणि तो सत्संग बंद झाला काय, आणि एखाद्या सामाजिक संस्थेत काम करायच्या विचारानं निवृत्त झालो आणि त्या संस्थेत काम करायची संधी मिळाली नाही काय - दोन्हींतही आपलं नियोजनही चुकू शकतं आणि निराशाही येऊ शकते. म्हणून साधनेत किंवा सामाजिक कार्यांतसुद्धा स्वाधीनच्या गोष्टींवर अवलंबून रहाणं चांगलं ठरतं.

११. हे सारं करताना, घरातली साथ त्याला आनंदानं आहे ना, हे पहावं. निर्णय घेताना, द्विधा झाल्यास चिठ्ठीचीही मदत घेता येईल. एकूण सारं विचारपूर्वक व आनंदानं होतं आहे ना, हे पाहिलं म्हणजे झालं.

*

१९. मी उपासना नियमितपणे करतो. पण पैसा, व्यवसाय, विवाह इत्यादी गोष्टींची मला काळजी लागते. कधीकधी यांतल्या काही गोष्टी, उदाहरणार्थ अपेक्षेप्रमाणं काही वेळा व्यवसाय पुरेसा चालूनही काळजी कमी होत नाही. याला काय करावं ?

यातला मूळ प्रश्न खरंतर काळजीचा आहे. त्याचा विचार व उपाय पहाण्यापूर्वी हा प्रश्न मला व्यक्तिगत संवादात विचारला गेलेला असल्यामुळं त्यासंबंधी झालेली प्राथमिक प्रश्नोत्तरं मी प्रथम देतो. आणि मग सलग सामूहिक उत्तराची चर्चा करू.

मी त्यांना असं विचारलं की, 'तुम्ही काळजी कधी करता ?'

त्यावर ते म्हणाले की, 'काळजी आपोआप लागते. उजाडलं की काळजी लागते. रात्र असली तरी काळजी लागते. काळजीला अशी काही काळवेळ नाही.'

त्यावर मी विचारलं की, 'तुम्ही उपासना कशी करता ?'

त्यांनी सांगितलं की, 'मी रोजच्या रोज नियमानं उपासना करतो.'

मी विचारलं की, 'ती तुम्ही ठरलेल्या वेळी करता का ?'

ते म्हणाले, 'हो !'

'आपण काळजी काही वेळ ठरवून करता का ?'

'नाही. काळजीची अशी काही वेळ ठरवलेली नाही.'

'मग उपासनेची वेळ कशासाठी ठरवलेली आहे ?'

त्यांनी विचार करून सांगितलं की, 'उपासना मुद्दाम करावी लागते. काळजी मात्र सहजपणे होते. त्यामुळं उपासनेची वेळ ठरवली पण काळजीची वेळ ठरवता येत नाही.'

मी म्हटलं, 'ज्याप्रमाणं काळजी तुम्हाला सहज लागते, त्याप्रमाणं

तुमची उपासना जेव्हा सहज होईल, त्यावेळी काळजी सुटेल.'

हे अर्थातच नुसतं बौद्धिक उत्तर नव्हे. आपण आपली काळजी आणि उपासना यांची तुलना करून बघावी. त्या कशा चालल्या आहेत, ते पहावं. उपासनेसाठी लक्षात ठेवून पाच वाजता, आठ वाजता बसावं लागतं. आरतीची वेळ पहाटे, सकाळी, संध्याकाळी लक्षात ठेवून ती करावी लागते. जर ती वेळ लक्षात राहिली नाही तर उपासना चुकते, होत नाही. झालीच तर कदाचित यांत्रिकतेनं होते. पण काळजी मात्र लक्षात न ठेवता लागते. ती सहज झाली आहे. शिवाय ती यांत्रिक नाही, तर मनापासून आहे. अस्वस्थ ठेवणारी आहे. ही झाली एक बाजू.

आता आपण असं लक्षात घेऊ की, काळजी हा एक सलणारा काटा आहे. एक वरवरचं उदाहरण म्हणून लक्षात ठेवायचं ठरवलं तर, रस्त्यानं चालताना अनेकांना काटे टोचल्याचा अनुभव आहे. गृहीत धरू की, अर्ध्या सेंटिमीटरचा काटा आहे. तो पायात घुसला आहे. तर तो काटा काढायला, दुसरा काटा किंवा तत्सम वस्तू लागते. पण तो काटा मात्र अर्ध्या सेंटिमीटरपेक्षा जास्त लांब, अधिक खोलवर जाणाराच लागतो. मूळ काट्याच्या एक दोरी तरी पुढं जाऊन, खालून पहिला काटा उकलणारा हा दुसरा काटा लागतो. आजच्या भाषेमध्ये कदाचित तो शस्त्रक्रियेतला चिमटा असेल. पण त्यानं जरी बाहेरून हा पहिला काटा ओढता आला, तरी या काटा ओढणाऱ्या चिमट्याचा अणकुचीदारपणा आणि पकड ही त्या लागलेल्या काट्यापेक्षा जास्त प्रभावी लागेल.

याचा अर्थ असा झाला की, पहिल्या, जुन्या पद्धतीप्रमाणं काळजीच्या सलणाऱ्या काट्यापेक्षा निश्चिंत, काळजीरहित बनवणाऱ्या उपासनेची लांबी म्हणजे प्रमाण जास्त लागेल. त्याचबरोबर नव्या पद्धतीप्रमाणं उपासनेतली तीव्रता आणि उपासना मनापासून करण्याची

पकड काळजीपेक्षा अधिक प्रभावी लागेल. हा विचार आपण उपासनेबद्दल, उपासनेच्या प्रमाणाबद्दल केला आहे का ? हे कृपया पहावं.

उपासना माणसाला काळजीरहित, चिंतारहित बनवू शकते, हे नक्की आहे. कारण ती अंतिमतः काळजीचं फोलपण लक्षात आणून देते. पहिला काटा आपोआप लागला, तर दुसरा काटा आपण आणू शकतो. पण तो वरवर टोकरून हा खोलवर गेलेला काळजीचा काटा कसा निघायचा? त्यामुळं आपण असा विचार करावा की, ज्या प्रमाणात, जितक्या सहजपणे आपण काळजी करतो, तशी सहजपणे, तितक्या प्रमाणात, त्याच्यापेक्षा जास्त उपासना, तीही मनापासून, तीव्रतेनं, समजून घेऊन आपण करू शकलो, तर हा काळजीचा काटा निघेल. काळजी नावाचा विषय माझ्या चित्ताला राहणार नाही. आता यात आपण प्रमाणाचा प्रश्न पाहिला.

त्यावर ते म्हणाले की, 'हा मार्ग माझ्या लक्षात आला, पटला. त्यासाठी ज्या नियमिततेनं आणि तीव्रतेनं उपासना करीत रहाणं महत्त्वाचं आहे, तेही पटलं. इथं आलं की, ही वृत्ती टिकते. पण बाहेर गेलं की, ही वृत्ती जाते, असा मला पूर्वी अनुभव आला आहे. यावर आपण काय करावं ? आणि याचा अर्थ कसा लावावा ?'

मी विचारलं, 'तुम्ही इथं किती महिन्यांनी आलात ?'

ते म्हणाले, 'जवळपास चार महिन्यांनी आलो.'

मी विचारलं, 'दरम्यानच्या काळात तुम्ही काळजी किती दिवस करीत होता ?'

ते म्हणाले, 'जवळजवळ रोजच करीत होतो.'

मी विचारलं, 'तुमची स्वतःची उपासना तुम्ही स्वतः टिकवू शकाल अशी परिस्थिती तुमच्या घरी आहे का ?'

त्यावर ते म्हणाले, 'नाही.'

त्यावर पुढं आता याचा विचार करणं आवश्यक झालं, तो असा की, इथल्या सत्संगाचा, उपासनेचा परिणाम झाला, हे बरोबर आहे. पण असा परिणाम आपण ज्या वातावरणात जातो, तिथं जी सात्त्विकता असते, जी उपासना असते तिच्यामुळं तो झालेला असतो. तो काही इथं आल्यावरच होतो, असं मला वाटत नाही. आपण अशा कुठल्याही इतर वातावरणात गेलो तरी तो आपल्यावर होईल. जर आपल्याला काळजी रोज लागत असेल, तर आपल्याला रोज उपासना लागेल, हे खरं. ती आपण करतो आहे, हेही खरं. पण आपल्या व्यक्तिगत उपासनेतून एवढं सत्संगाचं वातावरण तयार होत नाही, तेवढी तीव्रता किंवा प्रमाण त्याला नाही, हे समजून घ्यायला हवं.

ते निर्माण होईल एवढी तीव्रता उपासनेला येईपर्यंत तरी आपल्याला खऱ्या सत्संगाची, त्या ठिकाणी जाण्याची गरज आहे. तेव्हा अशा सत्संगात जाण्याची आपण कोणती तरतूद केली आहे ? ती साप्ताहिक असेल, मासिक असेल, आपल्या गरजेनुसार असेल. तो सत्संग कुठं मिळेल, ते आपण हुडकावं. ते अमुक ठिकाणी जाऊन होईल, असं मी म्हणत नाही. ते देवळात, आरतीला, प्रवचनाला, पारायणाला - अशा कुठल्याही एखाद्या सत्संगाला जाऊन वाटत असेल, तर ते करावं. पण एकतर तिथं गेल्यावर नव्या उपाधी निर्माण होऊ नयेत, काळजी लागू नये, उलट आपल्या नेहमीच्या काळजीचा सहजतेनं विसर पडावा, चित्त सहजतेनं निर्लेप व्हावं. परिणाम असा असावा की, तिथं सहजतेनं मनानं चिंतारहित, अशा अर्थानं 'वर' जाता यावं. आणि आल्यावरही सहजतेनं तसंच 'वर' रहाता यावं. आता हे जे चिंतारहित रहाण्याचं प्रमाण आहे, ते किती काळ टिकेल त्यावर पुन्हा आपण केव्हा तिथं जावं, हे ठरेल. पुन्हा खाली यायच्या आत तिथं परत जावं लागेल. कदाचित ही गरज आठवड्यानं पडेल किंवा

महिन्यानं पडेल. मग मात्र ती फ्रिक्वेन्सी - प्रमाण नियमितपणे सांभाळायची जबाबदारी आपलीच आहे.

काळजी रोज तर उपासना रोज, हे आपण पाहिलंच. पण उपासनेचा दर्जा आपल्याला काळजीरहित करण्याएवढा होईपर्यंत, आत्ता पाहिलं त्या प्रमाणं अशा खऱ्या सत्संगाला जाण्याची गरजही तितक्या प्रमाणात आहे. स्वतःची उपासना काय किंवा सत्संगाला जाणं काय, यांत यांत्रिकता येऊ नये हे वेगळं सांगायला नकोच. उलट त्याचा उद्देश आपल्याला स्वतःच्या 'मनापलीकडं' नेऊ शकणारी उपासना सापडणं आणि स्थिर होणं, शिवाय ती व्यक्तिशः करता येणं - हा आहे. तोवर सत्संगाची गरज आहेच.

सत्पुरुष यासाठीच सांगून गेले आहेत की, मरेपर्यंतच नव्हे तर पुन्हा सत्संगासाठी मी पुनर्जन्म घ्यायलाही तयार आहे. गुरुदेव रानडेसुद्धा म्हणत की, मला सत्संगाची गरज वाटते. हे त्यांना म्हणावंसं वाटतं. गृहीत धरू की, त्यांनी हे कदाचित आपल्यासाठीही म्हटलं असेल. पण आपण एवढं समजू शकतो की, आपण त्यांच्यापेक्षा लहान आहोत आणि त्यांना सत्संगाची गरज आहे, तर आपल्याला त्याची आत्यंतिक गरज आहे, एवढं नक्की. मी जर धंद्यासाठी धडपड करीत असेन, मुलीच्या लग्नासाठी खेटे घालत असेन, पैशासाठी धडपडत असेन तर काळजी दूर करण्यासाठी - सत्संगासाठी धडपड नको का करायला ? मुलीच्या लग्नासाठी जी धडपड आहे, त्याच्यापेक्षा जास्त धडपड सत्संगासाठी केली तर काळजी तर जाईलच आणि मुलीचं लग्न व्हायचं तेव्हा होईलच.

काळजी करून मुलीचं लग्न लवकर किंवा उशीरा तर नेता येत नाही ना ? आपण प्रयत्न करायचे तेच करतो. मग काळजी करून आपण काय साधतो ? हे एकदा लक्षात घेतलेलं बरं. कदाचित त्यातला फोलपणा लक्षात आला तर काळजीही सुटेल, आणि उपासनेलाही वेळ मिळेल. हे

आपण काळजी आणि उपासनेचा संबंध यांविषयी पाहिलं.

आता, मुळात श्री महाराज म्हणतात तसं, काळजीचं मूळ कर्तेपणात आहे. ती पैशाची लागो, मुलीच्या लग्नाची लागो, नाहीतर नोकरीधंद्याची लागो. मी केल्यानं अमुक एक गोष्ट होणार - व्हावी - न झाल्यास ती माझ्यामुळं झाली नाही असं होणार - अशा अनेक कल्पना या कर्तेपणाशी निगडित आहेत. कर्तेपण नसणं याचा अर्थ कर्तव्यं नसणं किंवा कर्तव्यं न करणं असा नव्हे. कर्तव्य गरजेचं असतं, पण कर्तेपणा काळजी उत्पन्न करणारा असतो, हा महत्त्वाचा फरक लक्षात घेऊया.

कर्तव्यं ही सबंधांनी, वेळेनुसार, विधिनिषेधांनी ठरतील. ती त्यात्यानुसार करावी लागतील, करावीही. एकदा काम म्हणून ते केल्यानंतर त्याला येणाऱ्या पुऱ्या-अपुऱ्या, बरोबर-चूक, हव्या असलेल्या-नको असलेल्या अशा अनेक फळांशी आपला कर्ता म्हणून संबंध उरत नाही. कर्तेपणात मात्र या प्रत्येक गोष्टीशी संबंध येऊन, आपण काळजीला आमंत्रण देत असतो. हवं असलेलं घडलं तर कर्तृत्वाचा अहंकार होतो, घडत नसलं तर घडेल की नाही यानं काळजी लागते, शेवटी नको असलेलं घडलं तर निराशेचा रोग जडतो. एकूण कर्तेपणानं काळजी मूळ धरते, तर कर्तव्यानं जीवन निकोप रहातं.

कर्तेपणा आणि कर्तव्यं यांतल्या सीमारेषा अनेकदा लक्षात येत नाहीत. त्या मुळात पुसट आणि फसव्याही असतात. शिवाय कर्मं करताकरता कर्तव्याची भावना जाऊन कर्तेपण कधी चिकटतं, आणि काळजी कधी सुरू होते, हेही अनेकदा कळत नाही. या साऱ्याला उपाय म्हणून खरा कर्ता भगवंत आहे, याची जाणीव देणारी उपासना हाच माणसाला काळजीवरचा अनुभवसिद्ध आणि सोपा उपाय ठरतो.

*

२०. धर्म, कट्टरता, कर्मकांडं, विज्ञान यांना मुक्तीच्या प्रवासात किती स्थान आहे ?

आपल्या प्रवासात रस्ते, सामान, शिदोरी, निर्धार अशा गोष्टींना जेवढं स्थान आहे, तेवढंच या गोष्टींना आहे. पण शेवटी हे स्थान 'प्रवासातलंच स्थान' आहे. तो प्रवास आहे. गंतव्य स्थान-मुक्कामाचं स्थान नव्हे. मुक्ती हे 'गंतव्य स्थान' आहे. त्यामुळं या गोष्टी अल्टिमेट नव्हेत. प्रवासात तर अशा रस्ता, सामान, शिदोरी या गोष्टींना जरूर स्थान असतं. पण ते स्थान अंतिम नसतं.

समजा एखाद्या माणसाला दिल्लीला जायचं आहे. तो प्रवासाला निघाला. तो पहिल्या मुक्कामात पुण्याला पोचला. त्यानं तिथून फोन केला की, मी इथं पोचलो. तर ज्यानं त्याला दिल्लीला पाठवलं तो सुटकेचा निःश्वास टाकून निश्चिंत होईल का ? किंवा त्याला स्वतःलासुद्धा निश्चिंत रहाता येईल का ? कारण तो अजून मूळ मुक्कामाला - गंतव्य स्थानाला पोचलेला नाही. मुक्तीची अवस्था तशी आहे. धर्म, निर्धार अशा गोष्टींना तेव्हा अर्थ मिळेल, जेव्हा मनुष्य अंतिम टप्प्यापर्यंत पोचेल.

या सर्व गोष्टींमध्ये, म्हणजे वर म्हटल्याप्रमाणं धर्म, कट्टरता, कर्मकांडं इत्यादी सर्व गोष्टींत काही चांगला, काही वाईट, काही आवश्यक, काही अनावश्यक भाग असतो. उदाहरणार्थ, इथं कट्टरता शब्द आला आहे. कट्टरता असायला एक निर्धार लागतो. तो निर्धार कुठल्याही कामात आवश्यक आहे. पण कट्टरतेत अतिरेकही येतो. तो चुकीचा आहे, अनावश्यक आहे.

आपण साधनाला कट्टर साधन म्हणतो. पण त्यामध्ये अतिरेकाचा संबंध नसून जे करणं आवश्यक आहे, ते करण्यासाठी लागणारा निर्धार

आवश्यक आहे, तो उपयोगी आहे, त्याला स्थान आहे, असं आपल्याला म्हणायचं आहे.

या निर्धारामध्ये साधनेत ढिलाई, चुकारपणा, अनियमितता अशा गोष्टी येऊ नयेत, असा त्याचा अभिप्राय आहे. दुसऱ्या कुठल्या प्रकारची कुणाची साधना किंवा ती करण्याची पद्धत चुकीची आहे, कनिष्ठ आहे, त्याज्य आहे, त्याप्रमाणं करू नये - असं आपल्याला अभिप्रेत नाही. म्हणजेच कट्टरतेतल्या अतिरेकाला स्थान नाही. निर्धार स्वतःचं साधन करीत असला तरी दुसऱ्यालाही त्याचं करू देतो. अतिरेक स्वतःचं साधन करील की नाही कुणास ठाऊक ? दुसऱ्याला त्याचं करू देत नाही, हा फरक आहे. अशा वेगवेगळ्या कट्टरतांमुळं-अतिरेकांमुळं किती नुकसान होतं ते आपण अनेक क्षेत्रांत पाहिलं आहे.

आता कर्मकांडं. कर्मकांडांत कर्माला स्थान आहे. कर्म तर तसं अपरिहार्यच आहे. आपल्याला उपयोगी आहे. मुक्तीच्या प्रवासातही त्याला योग्य स्थान आहे. पण कर्मकांडांत मात्र नुसतंच कर्म नाही तर अवडंबरं आणि आग्रह आहेत. म्हणून कर्मकांडांतलं कर्म योग्य आहे. पण त्यांतली अवडंबरं आणि आग्रह या त्याज्य गोष्टी आहेत.

याचबरोबर विज्ञानानं संशोधनाबरोबर करीत असलेल्या ज्ञानाच्या विस्ताराचा आवश्यक तो विचार करणं, हेही एका मर्यादेत आत्मज्ञानाला - मुक्तीच्या प्रवासाला, त्याचा मार्ग देणाऱ्या धर्माच्या संशोधनाला उपयोगी ठरणारं आहे. म्हणून विज्ञानाची प्रगती ही धर्माच्या विरोधात मानायचं कारण नाही. त्याचबरोबर विज्ञानानं धर्माचा अधिक्षेप करण्याचंही काही कारण नाही.

विज्ञान हे साधारणतः दृश्याचा इंद्रियांच्या सहाय्यानं केलेला प्रयोगशील अभ्यास आहे. त्यातली सार्वत्रिकता, अनुभवाधिष्ठितता,

व्यक्तिनिरपेक्षता, बदलक्षमता - अशा अनेक गोष्टी आवश्यक व स्वागतार्ह आहेत. त्यानं दृश्य विश्वाचा उलगडा तर होतोच, पण त्याच्या नियंत्रणाचे विविध मार्गही उपलब्ध होतात. माणसाच्या आचाराला दृश्याचं प्रधान अंग असल्यामुळं विज्ञान त्यादृष्टीनं आवश्यक व स्वीकार्य आहे. पण त्याचबरोबर दृश्याला लागून असलेली आणि माणसाचं खरं ध्येय असणारी अखंड समाधानरूप मुक्ती ही मात्र विज्ञानाच्याच काय पण मनाच्याही कक्षेत न येणारी गोष्ट आहे. तितकी मर्यादा किंवा मोकळेपणा हा विज्ञानात गरजेचा आहे. पण इंद्रियाधीन अनुभवालाच प्रमाण समजण्याची असमंजस प्रवृत्ती हा विज्ञानातला त्याज्य आणि अनावश्यक भाग आहे.

धर्म हा एक प्रकारचा रस्ता आहे, वाट आहे. साध्या भाषेत सांगायचं तर आचरणाचा रस्ता म्हणजे धर्म. तो कुणीतरी प्रयोग करून, ध्येयाला उपयोगी आहे म्हणून त्यात्या काळानुसार घालून दिलेला असतो. जो रस्ता अधिकाधिक शुद्ध, निरुपद्रवी, अनाग्रही, मुक्ततेला उपयोगी - तो चांगला.

आपण पाहिलं असेल की, पावसाळ्यात रानं वाढून रस्ते मुजतात. पण रानं काढून, पुन्हा चालून, वर्दळीनं ते निर्माण करता येतात. नव्या वाटासुद्धा रुळवता येतात. पण वाटेचा आग्रह धरला किंवा त्याला चिकटून बसलो आणि ध्येय गाठलं नाही, तर 'वाटेचे आग्रह'- 'धर्माचे आग्रह' फोल ठरतात. म्हणून जितकं विज्ञान प्रगत होत जाईल, विश्वाची रहस्यं उलगडत जातील, तितकं मुक्तीचं - आत्मज्ञानाचं स्वरूप - म्हणजे धर्माचं ध्येय स्पष्ट होत जाईल. धर्मसंशोधन होत राहील तर ही प्रक्रिया टिकून राहील. काळाला, प्रगतीला, मुक्तीच्या ध्येयाला अनुरूप राहील. मूल्यं शाश्वत असली, मुक्तीचं ध्येय शाश्वत असलं तरी जायचे रस्ते काळाच्या कक्षेत आणि माणसांच्या ठेवणींच्या कुवतींच्या आधीन असतात.

अशा तऱ्हेनं सतत बदलत असणाऱ्या काळाचं भान ठेवून त्यासाठी धर्मांचं म्हणजे आचरणाच्या मार्गांचं संशोधन करीत असणं, गरजेचं आहे, हे उघड आहे. काळाचं भान ठेवणं म्हणजे शाश्वत मूल्यांशी तडजोड नव्हे, हे इथं स्पष्ट केलेलं बरं.

म्हणून कर्मकांडांत जसं कर्म आणि कर्तव्यं ही आवश्यक पण अवडंबरं आणि आग्रह हे त्याज्य. तसंच धर्माच्या बाबतीत, आचरण आणि त्याचे नियम आवश्यक पण त्याचं संशोधन, त्यातल्या बदलांचा स्वीकार यांची तयारी नसणं हे अडथळ्याचं आणि त्याज्य आहे. साधा रस्तासुद्धा जर रोज झाडावा लागत असेल, स्वच्छ ठेवावा लागत असेल, आधी म्हटलं तसं पावसाळ्याच्या काळात त्यावरचं रान काढावं लागत असेल, तर तो आचरणाला उपयोगी व सुलभ ठरतो. तर धर्म हा 'आचरणाचा सामुदायिक राजरस्ता' तर संशोधित, सुलभ व कालोचित करीत स्वच्छ ठेवणं - हे आपल्याच हिताचं ठरेल, नाही का ?

आचारलक्षणो धर्मः किंवा धारणात् धर्मः, म्हणजे साध्या भाषेत धर्म जर आचार असेल किंवा लोकांना एकत्र आणणारा असेल तर त्यात परिस्थितीनुसार बदलणाऱ्या आचारव्यवहाराचा आणि कालाधीन लोकांचा विचार केल्याशिवाय, धर्माची उपयुक्तता कशी ठरेल ?

म्हणून मुक्तीच्या संदर्भात, शाश्वत मूल्यांना धरून असलेले आचार, त्यांची व्यवहाराशी सांगड या गोष्टी आपल्या मुक्तीच्या ध्येयाला उपयोगी तर त्यांतली पोथीनिष्ठता, धार्मिक कट्टरता, इतर आचारधर्मांचा द्वेष, वेळी त्यांना नष्ट करण्याची प्रवृत्ती - अशा गोष्टी त्याज्य ठरतात.

या साऱ्यांचा योग्य तो विचार करून आपला मुक्तीचा मार्ग आपण चालावा.

*

२१. माणसाच्या जीवनात आणि उपासनेत विशिष्ट काल, विशेषतः संधिकाल यांचं महत्त्व काय आहे ?

एकतर हा प्रश्न थोडा व्यापक आहे. त्यात जीवनाचा आणि उपासनेचाही संबंध आहे. आपण थोडक्यात क्रमानं विचार करू.

२१.१.माणसाच्या आयुष्यात निसर्गक्रमानं येणारे बालपण, तरुणपण, प्रौढपण आणि वृद्धपण हे चार ठळक काल कुणाच्याही सहज लक्षात येणारे आहेत. त्यात लक्षात घेण्यासारखं हे आहे की, या कालांचा माणसाच्या प्रगतीसाठी उपयोग आणि स्थान काय आहे, यांची कल्पना वेळेत येणं हे घडतंच असं नाही. ते घडलं तर अमुक एक गोष्ट आधीच केली असती तर बरं झालं असतं, किंवा लहानपणीच शिकलो असतो तर बरं झालं असतं, किंवा तरुणपणीच याची तरतूद केली असती तर बरं झालं असतं, असे पश्चात बुद्धीचे प्रसंग उद्‌भवणं टळू शकतं.

२१.२. या चार महत्त्वाच्या आणि प्रत्येकाच्या आयुष्यात येणाऱ्या कालांसाठी पूर्वीच्या - ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास - अशा व्यवस्था त्यात्या कालाचा उत्तमात उत्तम उपयोग करून घेण्यासाठीच निर्माण केल्या गेल्या होत्या. माणसाचं आयुष्यमान आणि बाहेरची परिस्थिती यांतले बदल लक्षात घेतले तर निदान शिक्षण, अर्थार्जन, प्रपंचकर्तव्यं आणि निवृत्ती - अशी या कालांची योग्य लाभ घेण्याची व्यवस्था आजही कुणालाही अमलात आणण्यासारखी आहे. या सर्व कालांसाठी सामान्यतः गरजेच्या म्हणून लागू असलेल्या व्यायाम, आहार-विहार, सर्वसाधारण नियमितता व संयम - अशा अनेक गोष्टी या अर्थातच हिताच्या म्हणून गृहीत धराव्यात.

२१.३. काळ म्हणून जाणीवपूर्वक वरच्या विभागणी लवकर वयात लक्षात येणं किंवा कुणी त्या लक्षात आणून देणं, त्यात्या कालांचा उत्तम लाभ घेण्यासाठी आवश्यक ती जीवनपद्धती अभ्यासून स्वीकारणं, पुढं येणाऱ्या कालाच्या टप्प्याची पूर्वतयारी आधी केलेली असणं आणि मनानं पुढचा टप्पा आनंदानं स्वीकारायला तयार असणं - या साऱ्या किती गरजेच्या गोष्टी आहेत, हे वेगळं सांगायला नको. कारण विशेषतः सहवासानं म्हणा, सवयीनं म्हणा त्यात्या कालाची गोडी लागून, सवय होऊन मनुष्य त्यात्या काळात अडकला तर त्याची नैसर्गिक प्रगती थांबते आणि त्याचं रेंगाळणं कौटुंबिक किंवा सामाजिकदृष्ट्या इतरांनाही अडचणीचं ठरतं. याची कल्पना नसताना जगणाऱ्या लोकांकडून याचा दुर्दैवी अनुभव आपल्याला येत असतो. निसर्ग जसा क्रमानं पुढंपुढं जात विकसित होत असतो, तसंच खरं माणसानंही या विविध टप्प्यांतून पुढं जात असणं हे नैसर्गिकही आहे आणि त्याच्या प्रगतीचं, हिताचंही आहे. ते न घडलं तर मग जसा निसर्ग आपले पुढं नेण्याचे कायदे वापरतो, तशी माणसांची व्यवस्थासुद्धा आपापले कायदे निर्माण करू लागते.

उदाहरणार्थ, नैसर्गिकदृष्ट्या गरजेचं असताना शिक्षणासाठी, व्यवहारासाठी पाहू शकणारे सक्षम डोळे आणि दृष्टी निसर्ग माणसाला देतो. त्याचा वापर त्यानं करावा, हेही अपेक्षित करतो. तो वापर केल्यानंतर पुढं जाणाऱ्या वयानुसार हा वापर कमी कमी करत जाण्याची गरजही अर्थात नैसर्गिक असते. पण या डोळ्यांच्या वापरात - पहाण्यात मनुष्य अडकला आणि पुढच्या टप्प्यात - आश्रमात जायला कुरकुरू लागला, टाळाटाळ करू लागला तर निसर्ग डोळ्यांची क्षमता कमी करण्याचा आपला कायदा अमलात आणायला सुरुवात करतो. मग कमी दिसतं म्हणण्यात अर्थ नसतो आणि दिसत असताना जे वाचायला, पहायला हवं

होतं, शिकायला हवं होतं ते न करता त्या दृष्टीचा गैरवापर केला असला आणि त्यानं आपलं नुकसान झालं असलं तर, अर्थातच त्याला निसर्ग जबाबदार कसा असेल ?

हीच गोष्ट माणसाच्या अर्थार्जनाची आहे. त्यात स्वावलंबनासाठी अर्थार्जन जितकं गरजेचं तितकंच आपल्या, बरोबरच्यांच्या, आणि समाजाच्या भविष्याच्या तरतुदीसाठी योजनाबद्ध अर्थार्जनही तितकंच गरजेचं आहे. आता हे नियोजन या टप्प्यात माणूस करू शकला नाही तर त्याच्यावर आणि त्याच्या इतर संबंधितांवरही अनवस्था प्रसंग ओढवणार, याला नोकरी देणारी मानवी व्यवस्था, अर्थातच जबाबदार कशी असेल ? मनुष्य या नियोजनात कमी पडला तर त्यासाठी व्यवस्था थांबत नाही, ती साठाव्या वर्षी त्याच्या हातात निवृत्तीचं पत्र देण्याची यंत्रणा राबवते. याला ती जबाबदार असत नाही. उलट पुढच्या नव्या पिढीसाठी अशी जागा रिकामी करून देणं हे व्यवस्थेचं कर्तव्यच ती पार पाडीत असते. म्हणून वेगवेगळ्या टप्प्यांचा अभ्यास, सावधानता आणि त्यानुसार आपलं जीवन घडवणं हे किती गरजेचं आहे, ते सहज लक्षात येईल.

२१.४. आधी म्हटल्याप्रमाणं हे वेगवेगळे काळ ओळखणं, त्यांनुसार आपापलं जीवन अधिकाधिक आदर्श घडवणं हे व्यवहार म्हणून आणि उपासना म्हणूनही माणसाला गरजेचं आहे. एखादं काम कौशल्यानं करणारा माणूस जसा लवकर त्या कामातून मोकळा होऊ शकतो, ते कामही चांगलं होतं आणि तो दुसऱ्या कामालाही वेळ देऊ शकतो, तसा कौशल्यानं हे काळ किंवा टप्पे ओळखून काम करणारा माणूस तो तो टप्पा कौशल्यानं पूर्ण करून परमार्थ साधू शकतो. इतकंच काय पण त्याच्या त्यात्या टप्प्यांतल्या प्रपंचालासुद्धा परमार्थाची उंची आणि दर्जा असतो. यात एकतर पुढं परमार्थ करणं सोपं पडतं किंवा तो वेगळा करावाही लागत नाही.

२१.५. या कालांची कल्पना येण्यासाठी आणि त्यांचा योग्य लाभ घेण्यासाठी जाताजाता एक उदाहरण म्हणून पहाण्यासारखं आहे की, माणसाच्या आयुष्यात जसे हे टप्पे आहेत, तसेच त्याच्या रोजच्या दिवसातही काल-टप्पे आहेत. जसं पहाट-सकाळ-दुपार-संध्याकाळ-रात्र. या प्रत्येक काळाचं काही वैशिष्ट्य आहे. जसं पहाटेची निर्मल शांतता, जशी सकाळची जीवनोत्सुक सहजता, दुपारचा निर्धार व कार्यशीलता, संध्याकाळचा थकवा पण सार्थकताही आणि रात्रीची तृप्ती, विश्रांती आणि प्रतीक्षाही. या साऱ्यांशी मनुष्य परिचित व सुसंवादी असेल तर जीवन नैसर्गिक आणि आनंदी असेलच.

असाच काहीसा विचार उदाहरणानं आपल्याला संगीतात आढळेल. पहाटेपासून रात्रीपर्यंतच्या या प्रत्येक काळाची, त्यावेळी असलेल्या निसर्गाच्या सहज स्थितीची, माणसाच्या त्यात्या वेळच्या मनःस्थितीची आणि त्या साऱ्यांत सुसंवाद निर्माण करण्याची दिशा आणि प्रेरणा घेऊन संगीतातल्या रागांची निर्मिती झालेली आपल्याला दिसेल. त्यात्या रागांतल्या स्वरांची निवड, त्यांतला भाव हा त्यावेळी तो राग गाण्यात अत्यंत सहजता आणि प्रभाव देऊ शकतो.

हे एकदा लक्षात आलं तर दिवसाच्या वेळांची आणि त्यात्या वेळी अधिकाधिक प्रभाव देऊ शकणाऱ्या कामांचीसुद्धा सांगड का घातली गेली आहे किंवा आपल्यालाही आपापल्या प्रकृतीनुसार ती कशी घालता येईल याची कल्पना आपल्याला येऊ शकेल. सगळेच काल हे दिवसाचे भाग असले तरी काही कामं ही त्यात्या काळाच्या वैशिष्ट्यांची सांगड घालून अधिक यशस्वीपणे करता येतील, हे उघड आहे.

२१.६. असाच विचार कालांच्या बाबतीत उपासनेच्या संदर्भातही केला गेला आहे. पहाटे ध्यान, पाठांतर, सकाळी पूजा, प्रार्थना, दिवसभरात

निर्धारानं स्मरण, संध्याकाळी कृतज्ञतेनं पुन्हा सायंपूजा-आरती, तर रात्री शेजारती अशा पारंपरिक उपासना हे दर्शवतात. हे उपासनेचे प्रकार बाजूला ठेवले आणि सार्वत्रिक स्वरूपाची नामासारखी उपासना घेतली तरी पहाटेची प्रार्थना, उगवलेल्या दिवसाबद्दल कृतज्ञतेनं आणि नेमानं सकाळच्या वेळेचा शक्य तेवढा वापर, मग दिवसाच्या कामकाजाला सुरुवात, दिवसभर निर्धारानं वेगवेगळ्या टप्प्यांवर अनुसंधानाचे प्रयत्न, संध्याकाळी घरी आल्यावर पार पडलेल्या दिवसाबद्दल पुन्हा कृतज्ञतेनं नामस्मरण-नेम, रात्री दिवसभराच्या कर्तव्यांचं, उणिवांचं, जमलेल्या-न जमलेल्या गोष्टींचं, घडलेल्या साधनेचं मनःपूर्वक निवेदन आणि शक्यतो नामस्मरणात झोपेच्या स्वाधीन होणं, हा साधकाचा त्याला मिळालेल्या दिवसभराच्या कालाचा औचित्यपूर्ण वापर ठरेल. आजच्या बदलत्या काळानुसार शिफ्टमधली कामं, रात्रपाळ्या, आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या नोकरीच्या वेळा - या सगळ्यांत या साऱ्या नैसर्गिक अनुकूलता आणि त्यांची सांगड ही अवघड असली तरी अशक्य नाही - कौशल्याची आहे, हे खरं.

हे जे दिवसाच्या काळाच्या टप्प्यांबद्दल आपण बोललो, तेच एकूण आयुष्याच्या आधी विचार केलेल्या मोठ्या कालखंडांच्या बाबतीतही खरं ठरणारं आहे. त्यातही असं पूर्वायुष्यातलं, मध्यआयुष्यातलं आणि उत्तरायुष्यातलं उपासनेचं नियोजन शक्य आणि उपयुक्त आहे.

२१.७. या साऱ्या पार्श्वभूमीवर 'संधिकाल' ही एक फार महत्त्वाची गोष्ट आहे. वेगवेगळ्या अर्थानं आपण वर एखादा दिवस,आयुष्य, व्यवहार-परमार्थ या साऱ्या बाबतींत वेगवेगळ्या काळांचा, टप्प्यांचा विचार केला. त्यावरून आपल्या सहज लक्षात येईल की, या प्रत्येक काळात जशी वैशिष्ट्यं आहेत, ती उपयुक्त असली तरी वेगवेगळी आहेत. तशीच त्या काळात मध्ये बदल घडतात तेव्हा काही अंतरंही आहेत. उदाहरणार्थ, सूर्य

असतो तेव्हा उजेड असतो. पुढं तो मावळतो तेव्हा नंतर रात्रीचा अंधार पडतो. हे दोन टप्पे वेगवेगळे असले तरी ते असे पाठोपाठ असत नाहीत. मध्ये सूर्य मावळलेलाही आहे आणि अजून अंधार पडलेलाही नाही, असा एक - दिसत असण्यानसण्याचा काळ - येतो. तो या दिवस आणि रात्रीला एक प्रकारे जोडतो. म्हटलं तर त्यात दिवसाचा प्रकाशही आहे आणि रात्रीचा अंधारही आहे. दिवसाचे, टप्पा म्हणून, गुणधर्म वेगळे आहेत आणि रात्रीचे, टप्पा म्हणून, गुणधर्म वेगळे आहेत. या दोनही टप्प्यांचा सांधा म्हणून, हा काळ मध्ये काम करतो. म्हणून त्याला संधिकाल असं म्हणतात.

अर्थातच त्याचं स्वतःचं एक वैशिष्ट्य असतं. हे वैशिष्ट्य जसं आयुष्य म्हणून बाळाचा युवक होण्यामध्ये किंवा युवकाचा प्रौढ होण्यामध्ये आहे, तसंच सकाळची दुपार किंवा दुपारची संध्याकाळ होण्यामध्ये आहे. दोन्ही टप्प्यांच्या अनुकूलता आणि वैशिष्ट्यं यांचा आपल्या प्रगतीसाठी अधिक उपयोग करून घ्यायचा असेल किंवा निदान त्यांचा आपल्या प्रगतीत अडथळा होऊ द्यायचा नसेल, रस्ता चुकू द्यायचा नसेल तर या संधिकालाच्या बाबतीत अभ्यास आणि सावधानता लागेल. हे ट्रॅन्झिशन आहे. उदाहरणार्थ, रेल्वेच्या एका मार्गावरून दुसऱ्या मार्गावर जाताना या रुळावरून त्या रुळावर जायला होतं. तिथंही असाच एक सांधा येतो. तो व्यवस्थित असला तर प्रवास थांबतही नाही, योग्य ती दिशाही मिळते आणि प्रगतीपण होत रहाते. म्हणून संधिकालाचं महत्त्व आहे.

रेल्वेचे रूळ ज्यावेळेला असे सांधे बदलतात तेव्हा आपण पाहिलं असेल की, दोन्ही रूळ अत्यंत कौशल्यानं कापलेले असतात. दुसऱ्या अशाच कापलेल्या रुळांशी त्यांची कौशल्यानं जोडणी केलेली असते. त्यात ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे की, ते दोनही रूळ त्या सांध्यांवर

साहजिकच कमकुवत झालेले असतात. पण सावधतेनं केलेल्या उत्कृष्ट जोडणीमुळं रूळ बदलूनही गाडीचा ताण, वेग, भार - हे सारं कौशल्यानं पेलून, गाडीच्या प्रवासाला आवश्यक ते वळण ही जोडणी देऊ शकते, हे उत्कृष्ट संधिकालाचं उदाहरण आहे. साहजिकच आहे की, या सगळ्या गोष्टींची काळजी घेतली नसली की, अपघाताची शक्यता अशाच सांध्यांवर जास्त असेल.

माणसाच्या प्रपंचाच्या बाबतीत, व्यवहाराच्या बाबतीत या आश्रमांत किंवा आपण आधी म्हटल्याप्रमाणं जीवनपद्धतीच्या टप्प्यांत - शिक्षण, नोकरी, गृहस्थाश्रम - अशा ठिकाणी येणाऱ्या सांध्यांच्या बाबतीत हे संधिकाल समजून जर आवश्यक काळजी घेतली गेली, तर ती ट्रॅन्झिशन स्मूथ होतात. विनात्रास, विनाखडखडाट आणि विशेषतः विनाअपघात होऊ शकतात. याची काळजी घेतली गेली नाही तर व्यक्तिगतच नव्हे तर किती सामाजिक प्रश्न निर्माण होतात, हे आज आपण कुटुंबात व बाहेर रोज पहातो आहोतच.

२१.८. संधिकालाला आणखीही बरेच अर्थ आहेत. उदाहरण म्हणून एखादा लक्षात घेऊ. यश आणि अपयश हे दोन टप्पे माणसाला वेगवेगळ्या बाबतींत, वेगवेगळ्या वेळी आयुष्यभर अनुभवाला येत असतात. मनुष्य यशाकडून अपयशाकडं किंवा अपयशाकडून यशाकडं असे प्रवास सतत करीत असतो. त्यावेळीही एक संधिकाल येऊन जातो. तो सांभाळावा लागतो. दोन्हीही वेळा साध्या भाषेत तो अस्थिर होण्याची - बावचळण्याची शक्यता असते. समजा यशाकडून यशाकडं प्रवास करणाऱ्या माणसाला कधीतरी अपयश येतं. त्यांतला संधिकाल त्याला पेलता येत नाही. मग अपयशानं मनुष्य निराशेच्या गर्तेत गेल्यासारखा होतो. कदाचित अपयशाकडून यशाकडं जातानाही हेच घडतं. ते सोपं वाटतं पण तेही

तितकंच अवघड असतं. यशानं हुरळून जाणारे कमी नाहीत. त्यानं त्यांचे जमिनीवरचे पाय तर सुटतातच पण लोकांची किंमत कमी होते, संबंध बिघडतात, उपासना, देव सुटतो. हे यशाकडून अपयशाकडं जातानाचा संधिकाल न मानवल्याचं लक्षण आहे. त्यासाठी तयारी न केल्याचं लक्षण आहे. या संधिकालात जर त्यानं मनःस्थितीची तयारी ठेवली असेल तर अपयश पचवावं लागतं - तसंच यशही पचवावं लागतं, हे कळू शकेल आणि अमलातही आणता येईल, वरची नुकसानंही टळतील.

हे कधी बेघर, घरवाला होतो, त्यावेळीही होतं. कधी घरवाल्याचा, परिस्थितीची चक्र उलटी फिरून, बेघर होतो, त्यावेळीही होतं. मधले संधिकाल ओळखता आले तर अशा वेळी होणारे खडखडाट, साध्या भाषेत स्वतःला लागणारी अनिष्ट वळणं - अनेकांना दूषण देणं, कोर्टकचेऱ्या, आपणही दुसऱ्याला प्रतिक्रियात्मक त्रास देण्याची इच्छा होणं, व्यसनं लागणं - ही सारी अनिष्ट वळणं संधिकालांची कल्पना आणि तयारी असलेल्याला टाळता येतील.

प्रपंचात साधारणपणे वाट्याला येणारे दुसरे टप्पे म्हणजे विवाहाच्या निमित्तानं एकट्याचे दुकटे होणं, दोनाचे चार हात होणं. ते व्यावहारिक आणि नैसर्गिक असलं तरी त्या दोन जीवनांत - टप्प्यांत - जीवनपद्धतींत फरक असल्यामुळं पुन्हा मध्ये संधिकाल येतो. त्याची तयारी असली तर तो सांधा आपले सारे इतर कौटुंबिक संबंध सुरळीत ठेवून ओलांडता येतो. संधिकाल साधता आला नाही तर, काही गोष्टी नव्या जीवनपद्धतीनं सुखाच्या झाल्या तरी, बाकीची आईवडिलांसारखी अनेक जवळची माणसं तुटतात, दुरावतात. अनेकांचे समज-गैरसमज होतात. अनेक कर्तव्यांकडं दुर्लक्ष होऊ शकतं. हे सारं संधिकालाच्या तयारीनं टाळता येतं.

हे उदाहरण एवढ्यावर संपत नाही. यात मुलाबाळांचं आगमन,

संगोपन, वर्धन, त्यांच्या जीवनासाठी त्यांना रवाना करणं एकवेळ सोडा पण या दोघांच्या जीवनपद्धतींत निसर्ग आपल्या कामांत थांबलेला नसतो, हे विसरायला होतं. कधीतरी, गृहीत धरलेला जोडीदार कुणी आधी, कुणी नंतर निघून जातो. आणि परत जीवनपद्धतीचा नवा टप्पा सुरू होतो. सहाजिकच पुन्हा एकदा संधिकाल आणि त्याच्या तयारीचा प्रश्न येतो. वास्तविक हा बदल किंवा टप्पा हा नैसर्गिक आणि गृहीत असला तरी सारीच माणसं त्याबद्दल आणि त्यासाठी लागणाऱ्या संधिकालाबद्दल सावध नसतात. मग ते एकटेपण मानवत नाही. त्याचे दुष्परिणाम प्रकृतीपासून इतरांच्या स्वास्थ्यापर्यंत कशावरही होताना दिसतात. याही वेळेला संधिकालाची कल्पना आणि तयारी आपल्याला उपयोगी पडते.

व्यावहारिक आयुष्यात असे यश-अपयशासारखे अनेक टप्पे येत असतात. जय-पराजय, अनुकूलता-प्रतिकूलता, निरोगी जीवन-प्रदीर्घ, अपरिहार्य, असाध्य आजारपणं, माणसं जोडली जाणं-समजगैरसमजानं किंवा परिस्थितीनं तुटून जाणं - अशा अनेक टप्प्यांना माणसाला सामोरं जावं लागतं. त्यांतल्या संधिकालांची तयारी असली तर बदल सोपे, सहज होतात. निदान फार दुःखद, त्रासाचे ठरत नाहीत.

२१.९. हे संधिकाल माणसाच्या जीवनात वेगळ्या पद्धतीनं वावरतात. एवढंच नव्हे तर आपलं जर आजूबाजूला निसर्गाकडं लक्ष असेल तर पशुपक्ष्यांच्या रोजच्या दिवसातसुद्धा ते वावरत असतात, हे आपल्या लक्षात येईल. रात्री वळचणीला किंवा कुठं घरट्यात विसावा घेणारे पक्षी पहाटेची चाहूल लागताच उत्साहानं आकाशात झेप घेत असतात. दिवसभर पोटापाठी वणवण करतात आणि तितक्याच सहजतेनं मावळण्याची लक्षणं दिसताच आपापल्या घरट्यांकडं परततात. मधल्या संधिकालांचा ते उपयोग कसा करतात आणि माणसालाही ज्या हवामानांशी आणि बदलांशी जुळवून

घेणं अवघड जातं, ते संधिकाल ते पशुपक्षी उपासनेनं कसे सांभाळतात हे पूज्य श्री गणोरेबाबांसारख्या सत्पुरुषांकडून शिकावं. ते म्हणत, प्रत्येक माणसाला भगवंताशी जोडणारा एक स्फुरण किंवा ध्वनिरूप बीजमंत्र दिलेला आहे. तो निसर्गदत्त आहे. आपण पाहिलं असेल की, सकाळी घरट्यांतून बाहेर झेपावणारे पक्षी आपापल्या बीजमंत्राचा त्यावेळी सहजतेनं उच्चार आणि स्मरण करीत असतात. ते त्यांचं ओरडणं नसतं. तेच संध्याकाळच्या संधिकालाच्या वेळी ते करताना दिसतील. संधिकालात माणसाकडून एकवेळ स्फुरणरूप ओंकार किंवा त्यानं घेतलेल्या गुरुमंत्रांचं स्मरण घडताना दिसणार नाही, त्याला त्याची जाणीवही असणार नाही. पण पशुपक्ष्यांसारखे जीव मात्र आपलं संधिकालाचं मंत्रकर्तव्य सांभाळतात, हे बघून आश्चर्य वाटतं, शिकावंसंही वाटतं.

२१.१०. म्हणून उपासनेच्या दृष्टीनं संधिकालांना एक विशेष स्थान आहे. कारण टप्पे बदलताना होणारे व्यावहारिक बदल तर अपरिहार्य असतील पण त्यामुळं होणारं सुखदुःख आणि नुकसान हे मात्र मानसिक आहे, उपासनेच्या अखत्यारीतलं आहे. संधिकालाच्या उपासनेनं सांभाळता येण्यासारखंही आहे. यशाकडून अपयशाचा टप्पा कदाचित टळणार नाही, आरोग्याकडून आजाराकडं जाणारा टप्पा कदाचित टळणार नाही पण त्यामुळं होणारा मानसिक त्रास, अस्वास्थ्य हे मात्र आपली संधिकालाची उपासनेची तयारी नक्की टाळू शकेल. सुसह्य करू शकेल.

म्हणून, आपल्याकडं ज्यांना शक्य आहे, त्यांना निदान सकाळच्या संधिकालातली आणि संध्याकाळच्या संधिकालातली सूर्योपासना-संध्या सांगितली आहे. ती सूर्याविषयीची कृतज्ञता आहे. व्यक्त करण्याच्या पद्धतीत फरक असू शकतील. पण सूर्याचे बदल आणि उपकार हे सर्वांवर सारखेच आहेत. त्याच्या जाण्यायेण्यानं घडणाऱ्या संधिकालांचे परिणामही

सारखेच आहेत. त्या काळात संध्या नसेल तर, सर्वांचा समावेश करू शकणारी नामाची उपासना असेल. काही नसेल तर निदान देवाचं स्मरण किंवा अनुसंधान असेल, प्रार्थना असेल. ती पुढं येणाऱ्या टप्प्यासाठी आपली मानसिक तयारी करून घेईल.

बाकीच्या आयुष्यात येणाऱ्या सगळ्या प्रकारच्या टप्प्यांना ही संधिकालाची उपासना आधार म्हणून खचित उपयोगी पडू शकेल. पहाटेचे बाह्ममुहूर्त, रात्रीचे निशीथकाल - अशा विशेष उपासना तर बळ देतीलच पण या संधिकालांचं सर्वसाधारण स्मरण व उपासना आधी म्हटलेल्या अनेक व्यावहारिक टप्प्यांतल्या मानसिक तयारीला उपयोगी पडतील.

२१.११. आता विषय निघालाच आहे तर, एक मोठा कॅनव्हास घेऊन आणखी एक टप्पा पाहू. सामान्य माणसाच्या दृष्टीनं कदाचित तो विचारात फारसा येत नसेल. पण उपासना करणाऱ्याला त्याचं भान व विचार खचित महत्त्वाचा आहे. त्यातही एक मोठा संधिकाल आहे. त्याची तयारीही आहे. तो टप्पा माणसाच्या मृत्यूचा आहे. आधीचे आश्रम किंवा आजच्या काळाला धरून असलेल्या व्यवस्था-टप्पे पाहिले, ते सध्याच्या आयुष्यातल्या संन्यास किंवा निवृत्तीपर्यंतच्या आयुष्याचाच विचार करणारे होते. पण माणसाचं आयुष्य या एका देहापुरतं मर्यादित मानणं हा तसा दृष्टिदोषच आहे. एखाद्या माणसाचा क्लोजअप घ्यावा तर तेवढाच माणूस दिसतो. त्याच्या आजूबाजूची माणसं, परिस्थिती, घर इतकंच काय मागं पसरलेलं अथांग आकाश - यांतलं तसं काहीच प्रत्यक्षात दिसत नाही. पण म्हणून फक्त तो माणूस एवढंच विश्व मानण्यातला हा प्रकार आहे. म्हणून तो दृष्टिदोष आहे. ज्यांना हा कॅनव्हास मोठा करून पहाता येतो त्यांना तो मनुष्य तर दिसतोच पण त्याबरोबर हे सारं मागचं आणि पुढचंही दिसतं. तसंच माणसाच्या या देहापुरत्या आयुष्याचं आहे. वरवर पहाता

फोटोतला माणूस दिसावा, मागंपुढं काहीच दिसू नये, त्यामुळं तेवढाच माणूस आहे, असं वाटतं खरं. पण हे कॅनव्हास मोठा करून पाहिलं की व्हावं तसं, त्या माणसाच्या आत्ता दिसणाऱ्या देहाच्या मागं आणि पुढंही त्याला अस्तित्व आणि देह आहेत, हे दिसतं.

अशा वेळी माणसाच्या सध्या दिसणाऱ्या देहाचा मृत्यू हे त्याचं दृश्याकडून अदृश्याकडं ट्रॅन्झिशन-बदल आहे, हे लक्षात येतं. अर्थात वरच्या सर्व ट्रॅन्झिशन्सचा विचार केला तर हा बदल हा सर्वांत मोठा बदल ठरेल, हे उघड आहे. या बदलाच्या वेळी येणारा संधिकाल हा आयुष्यातल्या साऱ्या संधिकालांचा राजा ठरेल, हे सांगायला नकोच.

म्हणून मृत्यूच्या वेळी येणारा संधिकाल सांभाळणं हे परमार्थात आणि उपासनेत सर्वांत मोठं काम मानलं आहे. तो संधिकाल सांभाळायला आपण आयुष्यभर केलेली उपासना, त्याक्षणी निर्माण होणारी चित्ताची अवस्था, आजूबाजूच्या वातावरणातली अनुकूलता, आजवर केलेल्या कर्मांचे संकलित परिणाम किंवा त्यांचा साधनेमुळं साधलेला परिणामांचा निरास आणि गुरूंची कृपा - हे सारं उपयोगी पडतं. मग ते जीवाला उत्तम गती मिळून उपयोगी पडो किंवा तो मुक्त होऊन उपयोगी पडो.

आता वर म्हटल्याप्रमाणं प्रथम टप्प्यांची कल्पना, मग व्यावहारिक आणि पारमार्थिक टप्प्यांची कल्पना, मग संधिकालाची तयारी, मग कर्मांतली सावधता-शुद्धता, अखेर शरणागती - अशा अनेक प्रकारे हा अंतिम संधिकाल सोपा जाईल.

एक मात्र आहे की, जो असे रोजचे विविध संधिकाल साधीत असेल, त्याला त्याचा अंतिम संधिकाल साधता येईल किंवा त्याचा अंतिम संधिकाल निसर्गाकडून किंवा परमेश्वराकडून सांभाळला जाईल !

*

२२. आळसामुळं होणारं नुकसान कळतं. तो कमी व्हावा असंही वाटतं. पण तो नाहीसा करायला काही सोपे व्यावहारिक उपाय आहेत काय ?

आळस नाहीसा करायला 'सोपे' उपाय विचारण्यातच आळसाचा आपल्यावरचा प्रभाव नकळत व्यक्त होतो. कष्ट करायला 'कमी कष्टाचा' मार्ग कसा असेल ? आळस नष्ट करणं ही आपल्या स्वतःच्याच मनाशी आपण केलेली लढाई आहे. हे लक्षात घेऊ.

१. अगदी प्रथम लक्षात घेऊ की, आपल्या मनाच्या विरोधात आपण उभं राहिल्याशिवाय आळसाशी सामना करणं अशक्य आहे.यात सर्वांत मोठा अडथळा आणि सर्वांत मोठी मदत स्वतःचीच होणार आहे, हे लक्षात घेऊन आणि त्यावर भिस्त ठेवून या कामाला सुरुवात करू.

२. आळस हा आपल्या अंगची बेसावधता दाखवतो. पटलेल्या गोष्टी आणि त्या अमलात आणण्याच्या कृती यांतलं अंतर जेव्हा मन वाढवू पहातं, तेव्हा आळसाला वाव मिळतो. त्यामुळं कृती पटली किंवा ठरली की, मध्ये वेळ न जाऊ देणं आणि तत्काळ कृतीला लागणं, हा आळसावरचा पहिला उपाय आहे. यासाठी एकदम फार मोठ्या कृती करण्याचे निर्णय घेऊ नयेत, ही सावधगिरी आहे.

उदाहरणार्थ, एकदम परीक्षेत विशेष गुणवत्ता मिळवू किंवा एक कोटी जप करू असे निर्णय अशा व्यक्तींनी सुरुवातीला तरी न करणंच बरं. त्याऐवजी आत्ता भाजी आणण्याची गरज आहे, हे ठरलं की, कोण आणतं आहे का, याची वाट न पहाता, पैसे आणि पिशवी घेऊन बाहेर पडणं, ही कृती ही आळसाच्या बाबतीतल्या लढाईची सोपी सुरुवात

आहे.अशा कृतींत यशाची शक्यताही जास्त आहे आणि त्यामुळं येणाऱ्या आत्मविश्वासानं पुढची मोठी लढाई जिंकण्याचीही शक्यता आहे.

३. यासारखाच फरक आवडीच्या आणि नावडीच्या कामांच्या बाबतीत आहे. आधीच आळस अंगात असेल आणि त्यात नावडीचं काम घेतलं तर यशाची शक्यता आणखीच कमी होते. म्हणून निदान आपल्या आवडीची कामं हुडकावीत आणि वर म्हटल्याप्रमाणं त्यांतल्या छोट्या, आवडीच्या कृती हाती घ्याव्यात. त्यात यश येतं. अनेकदा अशा कृतींना व्यावहारिकदृष्ट्या महत्त्व किंवा पैशात मोल नसतं, हेही लक्षात ठेवावं. पण आपला तो उद्देश नाही. आपल्याला आळस झटकण्याचा प्रश्न आहे. तो सुटतो आहे ना, एवढं पाहिलं तरी चालेल.

४. आधी उल्लेखलेली बेसावधता अनेकदा आपल्यावर असलेल्या उपकारांची जाणीव नसण्यातूनही येते. अन्नपाण्यापासून, जगवणाऱ्या हवेपर्यंत सृष्टीचेच काय, असंख्य माणसांचे उपकार आपल्यावर आजवर अक्षरशः अगणित प्रकारे झालेले असतात. अनेकदा त्यांच्या बाबतीत काही परतफेडीची कृती करणं तर सोडाच, पण त्याची साधी जाणीवही आपल्याला नसते. ती व्हावी म्हणून कुठलाही एक दिवस निवडावा आणि रात्री तो कसा गेला आणि त्यात दिवसभरात वेळोवेळी कुणाकुणाची आपल्याला काय मदत झाली, याची सरळ आकडे टाकून यादी करावी. असं काही दिवस केल्यावर लक्षात येईल की, आपण जगतो त्यात आपला कर्तृत्वाचा वाटा इतरांच्या मदतीच्या मानानं फार कमी आहे. त्यासाठी प्रत्येकाच्या बाबतीत काही ना काही करण्याची संधी हुडकत रहाणं हे गरजेचं आहे. मग अशा कृतींवर लक्ष ठेवावं. रोज त्यांतली जी शक्य होईल ती संधी घेऊन, आजचा दिवस कुठल्यातरी स्वरूपात अशी कृतज्ञतेची

कृती केल्याशिवाय जाऊ देणार नाही, असा निर्धार करावा.

कदाचित असा दिवस येऊ शकतो की,व्यवहारात कुणाच्याचबद्दल कोणती कृती अगदी रात्र झाली तरी आपल्याला करता येणार नाही. अशा वेळी सबंध दिवस ज्यानं आपल्याला जगवलं, त्या परमेश्वराचं निदान स्मरण केल्याशिवाय किंवा नाम घेतल्याशिवाय आपण झोपू नये, एवढी साधी कृती तरी नक्की करता येईल. या कृती वाढतील तसा आळस आपोआप हटल्याचं आपल्या लक्षात येईल. कारण, शोधायला गेल्यानंतर अशा कृतींची संख्या आणि आवश्यकता किती प्रचंड आहे, याची कल्पना येते, दिवस पुरेनासा होतो. आळसाशी सामना आपोआप होऊन जातो.

५. तत्त्वांपेक्षा कृतींचे परिणाम आणि प्रभाव जास्त असतात. म्हणून अखंड कार्यरत रहाणाऱ्या शास्त्रज्ञ, संत-सत्पुरुष, समाजसेवक - अशांची चरित्रं आणि आठवणी यांचं नित्य वाचन ठेवावं. त्यांतून प्रेरणा तर मिळतेच पण कृतींचे अनेक मार्गही सुचतात.

६. कृतींची थोडी सवय झाली, त्याचे लाभ लक्षात येऊ लागले की, मागच्या आयुष्याचं सिंहावलोकन करावं. ते जर अगदी कागदावर केलं तर नक्की लक्षात येतं की, आजवर आपल्याला मिळालेल्या कृतींच्या किती संधी आपण या आळसाच्या प्रवृत्तीनं घालवलेल्या आहेत ! या आळसाचे दुष्परिणाम, परत न येऊ शकणाऱ्या संधी, इतरांनी आळस झटकून वेळीच घेतलेले त्या संधींचे फायदे आणि त्यामुळं त्यांनी आयुष्यात साधलेली प्रगती या साऱ्याची प्रत्ययकारी कल्पना आपल्याला आली की, आता उद्याचाच नव्हे तर आजचा दिवससुद्धा आळसात घालवू नये, अशी निकड निर्माण होते. मग कामाला लागावं.

७. अनेकदा जीवन ध्येयहीन असलं की, आळसाला रान मोकळं मिळतं,

हे कृपया लक्षात घ्यावं. ध्येय भले कदाचित थोडं चुकेल, परिस्थितीनं बदलावं लागेल. पण ध्येयच नसणं हे जिणं माणसाचं नव्हे तर पशुपक्ष्यांचं ठरेल, हे लक्षात घ्यावं. त्यासाठी तरी निदान रोजच्या कामांचं आणि एकूण वर्षाचं -आयुष्याचं काही निश्चित ध्येय ठरवावं. त्यानं रोजच्या कामाचं नियोजन आपोआप होऊन जातं. तेवढं काम रोज पार पाडल्याशिवाय असं महिन्याचं, वर्षाचं ध्येय गाठणं अशक्य असतं, हे लक्षात येतंच. या ध्येयाचं स्वरूप - वर्षाचं व्यावसायिक कामाचं उद्दिष्ट असेल, वर्षअखेरीस मिळवायच्या मार्कांचं उद्दिष्ट असेल, वर्षाची जपसंख्या पुरी करायची असेल, वर्षात घ्यायची पिकं असतील-की आणखी काही ! निश्चित ध्येय हे आळसाला हाकलून लावतं, एवढं खरं.

८. थोडा सरळ धोपट मार्ग असा की, जीव थकून जाईल एवढं काम जिवाला द्यावं. दिवसात पंचवीस पानं लिहून काढणं शक्य असेल, तर चाळीस लिहायला लावावीत, तीस किलोमीटर चालणं शक्य असेल तर चाळीस किलोमीटर चालायला लावावं. यातून एक साध्य होतं की, जे काम आपल्याला करणं गरजेचं आहे, तेवढं काम तरी आळस झटकून करायला मन तयार होतं. आपल्या कुवतीच्या बाहेरची ही उद्दिष्टं ठरवताना जरूर तर जवळच्या माणसांची मदत घ्यावी. म्हणजे स्वतःला कदाचित दिलं जाणारं झुकतं माप टळतं आणि योग्य उद्दिष्ट ठेवलं जातं.

९. यांतलाच शेवटचा उपाय म्हणजे, ठरवूनही आळसामुळं न केल्या गेलेल्या दिवसातल्या कामांबद्दल, स्वतःला द्यायची शिक्षा ठरवणं. या शिक्षेला स्वतःच स्वतःला दिलेल्या शिक्षेचं स्वरूप असल्यामुळं ती काळजीपूर्वक ठरवावी. तिचं स्वरूप गरजेनुसार शारीरिक किंवा महाराज देत तसं आध्यात्मिक असावं. म्हणजे उदाहरणार्थ, दिवसाचं काम केवळ

आळसामुळं झालं नसलं तर संध्याकाळी किमान दोन किलोमीटर चालून येणं, काही पानं जप लिहून काढणं इत्यादी.

१०. आता, या साऱ्या प्रयत्नांना पाठबळ म्हणून आळसावरचा शेवटचा मार्ग आहे तो, प्रार्थना करण्याचा ! तो यश देणारा आहे आणि कुणालाही उपलब्धही आहे.

*

२३. अनेकदा निरूपणं, बोधवचनं, विवरणं यांतून काय करायला हवं, हे लक्षात येतं. पण आता वय झाल्यामुळं त्यांतल्या अनेक गोष्टी करणं अवघड झालं आहे. अशा वेळी काय करावं ?

१. प्रथम, न कळल्यामुळं आपल्याकडून न झालेल्या कामांबद्दल निराशा येऊ देऊ नये. 'जागे तभी सबेरा' या न्यायानं जाग आल्यावर चांगल्या कामांना सुरुवात करणं, हा आशाजनक मुहूर्त आहे.

२. अनेक गोष्टी कदाचित वयामुळं किंवा मनाच्या ठेवणी पक्क्या झाल्यामुळं अवघड झाल्या असतील, तरी कोणत्याही वयात, कुठलीतरी योग्य गोष्ट करणं, हे सदैव शक्य असतं. ती हुडकावी आणि करावी.

३. या वयातही - वाचा,श्रवण,दर्शन,वाचन - काही ना काही पर्याय जरूर असतील. जो पर्याय असेल, तो केला तरी चालेल.

४. न जमलेल्या गोष्टींचा मनापासून पश्चात्ताप हे पावन करणारं तीर्थ आहे, हे लक्षात ठेवून, त्या भावनेनं आज जे करणं शक्य आहे, ते केलं तरी पूर्वीचं माफ होतं, आणि आजचं पदरात पडतं.

*

२४. आपल्याकडं मुलगा असणं, मुलगी असणं किंवा मूलबाळ नसणं, याबाबतीत त्यात्या पालकांच्या पाप-पुण्याचा अर्थ लावला जातो. सामाजिकदृष्ट्याही अनेक प्रतिक्रियांना सामोरं जावं लागतं. याबाबतीत पारमार्थिकदृष्ट्या कोणता विचार करणं योग्य आहे ?

हा प्रश्न गुंतागुंतीचा, संवेदनाशील आहे. त्यात शारीरिक, मानसिक, धार्मिक, सामाजिक यांच्याबरोबर पारमार्थिक बाजूही संबंधित आहेत. त्यातच अनेक रूढी, परंपरा, इष्टानिष्ट विचार, दुसऱ्यांना दोष देण्यासाठी त्याचा वापर करणं - अशा अनेक गोष्टीही निगडित आहेत. त्यामुळं याविषयी पुढं जे मांडलेलं आहे, ते वाचताना आपण सर्व पूर्वग्रह, वैयक्तिक मतं-आग्रह, भावनिकता - अशा गोष्टी बाजूला ठेवून कृपया विचार करावा, अशी मी प्रथम विनंती करतो. त्यातही आपला इथला पारमार्थिक विचार योग्य न वाटल्यास, आपल्याला अन्य दृष्टीनं याचा विचार करण्याचं स्वातंत्र्य आहे, हे लक्षात ठेवूच.

पारमार्थिकदृष्ट्या व्यक्तीला वंशाचा दुवा आणि जीवाचा प्रवासातला टप्पा, अशी दोन अंगं आहेत. त्यांतलं पहिलं हे दृश्य असल्यामुळं, शिवाय त्याचे परिणामही अधिक स्पष्ट व इतरांशी निगडित असलेले असल्यामुळं त्याचा विचार कुटुंबं, समाज, धर्म - हे जास्त करतात, असं आढळून येईल.

मुलगा असला म्हणजे त्यामुळं धार्मिकदृष्ट्या पितृकर्मांची सोय होऊन स्वर्गप्राप्तीला मदत होते, अशा आपल्याकडील कल्पना आहेत. त्यामुळंच ते आवश्यक आणि प्रतिष्ठेचं झालं,तर मुलगी असणं हे अडचणीचं आणि कमीपणाचं मानलं गेलं. याचा विचार केला तर मुळातच पितृमार्गाची,

स्वर्ग आणि तत्सम प्राप्तीची आपल्याला पारमार्थिकदृष्ट्या आवश्यकता नाही. कारण तो थोडा कदाचित वर नेणारा मार्ग असला तरी पुन्हा पुण्य संपताच परत खाली आणणाराही मार्ग आहे. परमार्थात प्रश्न आहे तो, पूर्ण आणि कायमच्या मुक्तीचा आहे. पुनरपि संसारा येणे नाही, अशी भूमिका असल्यामुळं मग हा मुला-मुलीचा प्रश्नच गौण ठरतो.

वर मांडलेल्या धार्मिक विचाराच्या संदर्भात मुली असण्याचा विचार केलेलाही बरा. पितृकार्य म्हणजे नक्की काय आणि ते करण्याचा अधिकार मुलापुरताच आहे की, तो मुलीलाही आहे, हाच मुळात त्यावर वेगवेगळी मतं असलेला प्रश्न आहे. मुलगा आणि मुलगी यांमध्ये निसर्गानं केलेले योग्य भेद गृहीत धरले तरी व्यावहारिकदृष्ट्या, पितृकार्यच नव्हे तर वंशाचा उद्धारही मुलींनी केलेला आढळून येईल. आद्य कालातही स्त्रिया ब्रह्मवादिनी होत्या, हा इतिहास आहेच. पारमार्थिकदृष्ट्या तर मुलगा असो वा मुलगी, उद्धारासाठी जीव म्हणून सारखाच विचार केला गेला आहे. उलट जाताजाता व्यवहारानं मुलगा असलेला गृहस्थ, सून आणून प्रपंचात अडकण्याची शक्यता जास्त तर, मुलगी असलेला गृहस्थ ती योग्य ठिकाणी स्वाधीन करून प्रपंचात न अडकता परमार्थाला अधिक मोकळा आहे, हे लक्षात घेतलं तर, तिथंही पारमार्थिकदृष्ट्या अधिक अनुकूलता कुणाला आहे, ते कळू शकेल. अर्थात हा विचार करून त्याचा लाभ घेणाऱ्याला, हे सर्व लागू होईल.

सामाजिकदृष्ट्याही माणसाची प्रतिष्ठा त्याची मुलंबाळं, त्याचे नातेवाईक, त्याची इस्टेट - असल्या गोष्टींमुळं ठरत असल्यानं, या मुलाबाळांच्या प्रश्नाकडं समाज वेगळ्या पद्धतीनं पहाणं स्वाभाविक आहे. समाजाचं सातत्यही या वंशपरंपरांमुळं - मुलाबाळांमुळं चालत असल्यानं शिवाय त्यात्या इस्टेटींची व्यवस्थाही या मुलाबाळांमुळं सोपी होत

असल्यानं, सामाजिकदृष्ट्या मुलगी असणं किंवा अजिबात मूल नसणं या गोष्टी कमीपणाच्या किंवा उणिवेच्या मानल्या जातात, हे समजून घेता येतं. परमार्थात बाकीचा पसाराच काय पण, अगदी आतला मीपणासुद्धा सोडायचा विषय असल्यामुळं मुलगी असणं किंवा अजिबात मूलबाळ नसणं यानं परमार्थाला काही बिघडत नाही.

वैयक्तिकदृष्ट्या माणसाला असलेल्या भावनांतल्या वात्सल्य, संगोपन अशा अनेक गोष्टींची संधी मुलाइतकीच मुलीच्या बाबतीतही मिळते. पण वरच्या साऱ्या सेटअपमुळं, पितृसत्ताक पद्धतीमुळं त्याला मुलीपेक्षा मुलगा असणं अधिक सुरक्षित वाटतं. याला आजच्या काळात तरी फारसा अर्थ उरला नाही. मुलगा संधी मिळून परदेशी निघून जातो आणि जिच्याबद्दल असुरक्षित वाटलं ती मुलगी जवळ राहून आईवडिलांचा सांभाळ करते, ही वस्तुस्थिती आता आपल्याला नवीन नाही. कायद्यापुढंही आता दोघंही समानच समजली जातात.

आता वैयक्तिक बाबतीत अधिक भावनिक व सामाजिक प्रश्न वाटतो तो मूलबाळ अजिबात नसण्याचा. तोही वरच्या सेटअपमुळंच जास्त गंभीर वाटतो. त्यावर अनेकदा प्रत्यक्ष किंवा माघारी प्रतिक्रियाही दिल्या जातात. धार्मिकदृष्ट्याही त्याचा अर्थ पालकांच्या पाप-पुण्याशी जोडला जातो. हे आपण समजू शकलो तरी, या बाबतीत परमार्थाचा विचार मात्र अत्यंत वेगळा, तर्कशुद्ध आणि निकोप आहे. आशेचा आणि आनंदाचा आहे. कारण तो मुळातच वंशापेक्षा जीवाचा विचार करणारा आहे आणि मुक्तीच्या दृष्टीनं तेच आवश्यक आणि बरोबर आहे.

यात उरतात ते दोन प्रश्न - वंशाच्या सातत्याचे आणि इस्टेटींच्या व्यवस्थेचे. त्यासाठी आणि वरचे वात्सल्यादी भावांचे प्रश्न सोडवण्यासाठी समाजानं दत्तकाची व्यवस्था केली. पण जर आपण पारमार्थिकदृष्ट्या या

प्रश्नाकडं बघत असू तर, याचा आपल्याला वेगळा विचार करता येईल. याबाबतीत केव्हाही निसर्ग हा दृश्य जगात परमेश्वराचं प्रतिनिधित्व करतो. त्याच्या इच्छेवरून परमेश्वराच्या इच्छेचा-व्यवस्थेचा अंदाज करता येतो.

ज्याअर्थी तो मूलबाळ देऊन आपल्यापुरती ही व्यवस्था करू इच्छीत नाही तर, त्याचे दोन अर्थ होतात - एक, जसं विनोबा म्हणत, तसं निसर्गात एखाद्या वृक्षाच्या वाढीला परिपूर्णता आली की, म्हणजे सर्वोच्च फळ आलं की, त्यापुढं त्या झाडाला फळ येत नाही. तसं आपल्या वंशवृक्षाला सर्वोत्कृष्ट फळ, आपल्या रूपानं येऊन गेलं आहे, म्हणून आता त्याला पुढं फळ येत नाही, हे लक्षात घ्यावं.

म्हणजे या प्रश्नातली भावनिक नकारात्मकता तर जाईलच पण परिपूर्णतेची निसर्गाची जबाबदारी त्यानं आता पार पाडली. आता साधना करून मुक्त होण्याची जबाबदारी आपली आहे. ती पार पाडायला त्यानं आपल्याला मोकळं केलं आहे. मुलाबाळांच्या रूपानं, व्यावहारिक पाशही ठेवलेले नाहीत, हे लक्षात घ्यावं. कारण मनुष्य आता परमार्थ करायला चोवीस तास मोकळा आहे. व्यावहारिकदृष्ट्या आपलं स्वतःचं मूलबाळ आपल्या वृद्धपणची जी काळजी घेईल, त्यापेक्षा अशा पूर्ण परमार्थ करू इच्छिणाऱ्याची वृद्धपणची काळजी परमेश्वर जास्त उत्तम घेईल, याची खात्री बाळगावी.

आता याच्या दुसऱ्या अर्थाचा विचार करू. ज्याअर्थी परमेश्वर मूलबाळ देऊ इच्छीत नाही, त्याअर्थी बाकीच्या समाजासारखी आपल्या इस्टेटीचीही व्यवस्था लागणं त्याला अभिप्रेत नाही. आपल्याकडं काही वडिलोपार्जित चालत आलं असेल किंवा त्यात आपण भर घालून अशी इस्टेट निर्माण झाली असेल तर एरवीच्या परिस्थितीत ती आपल्या मुलाबाळांना गेली असती, पण या जीवाच्या परिपक्व अवस्थेत ती कुठं

खाजगी ठिकाणी जाण्याऐवजी आता समाजाला जाईल, हे उघड आहे. त्यासाठी लागणारी व्यवस्था आपण करावी. म्हणजे तोही प्रश्न सुटून जाईल आणि आपण नामाला मोकळे होऊ.

दोन गोष्टी जाताजाता उल्लेखलेल्या बऱ्या. एक, जे विनोबा म्हणत की, सर्वोत्कृष्ट निर्मितीनंतर त्या वृक्षाच्या-वेलीच्या वंशात पुढं निर्मिती न होणं नैसर्गिक आहे. ते तसं एकतर सर्व निसर्गाच्या चक्रालाही लागू असल्याचं आपल्या लक्षात येईल. कारण पाणी, वृक्षवेली, जलचर, भूचर असं करत मानवनिर्मितीचं सर्वोच्च फळ आल्यावर निसर्गाच्या वेलीलाही माणसाच्या पुढचं फळ आलेलं नाही. कारण माणूस स्वतःच सर्वोच्च निर्मिती आहे.

व्यावहारिकदृष्ट्या त्यात्या वंशांच्या वृक्षांचा विचार केला तरी महान सत्पुरुष देणाऱ्या वंशांच्या निर्मितीनंतर, ते वंश अनेकदा खरोखरच उत्तम निर्मितीनंतर थांबावे तसे, थांबले आहेत - उदाहरणार्थ, श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री रामदास स्वामी, श्री विनोबा, श्री रमणमहर्षी, योगी अरविंद, श्री कृष्णदास महाराज, श्री कृष्णमूर्ती, श्री मामासाहेब दांडेकर, श्री गणोरे बाबा, श्री गोंदवलेकर महाराज - अशी असंख्य उदाहरणं समोर येतील. त्यामुळं या मुद्याचा आता नकारात्मक विचार करण्याचं, पारमार्थिकदृष्ट्या काहीच कारण नाही. आता फक्त मिळालेली संधी घेऊन, साधना करून, मुक्तीला पात्र होण्याचं काम उरलं आहे.

आता दुसऱ्या गोष्टीचा उल्लेख करू की, मूलबाळ असणं हे वरील अर्थानं काही कमीपणाचं आहे, असंही कुणी समजू नये. आपल्या वंशवृक्षाला उत्तम फळ अजूनही यायचं असेल,असा याचा अर्थ कदाचित असेलही. पण जीव म्हणून आपल्या मुक्तीच्या आड आपलं किंवा दत्तक मूलबाळ असणं, हेही आड येत नाही. हे पारमार्थिकदृष्ट्या लक्षात ठेवावं.

*

२५. मला कधीकधी माझ्या गुरूंचं स्वप्नामध्ये दर्शन होतं. त्याचा अर्थ कसा घ्यावा ?

असं ज्यावेळेला स्वप्नामध्ये दर्शन होतं, तेव्हा त्याचे साधारणतः तीन अर्थ असतात :

१. पहिला अर्थ असतो जो साधारण स्वप्नांना लागू आहे, त्याप्रमाणं असतो. आपल्या मनामध्ये त्यांचे जे विचार चालू असतात, चिंतन चालू असतं, ते वारंवार असलं किंवा तीव्रतेनं असलं तर त्याचा परिणाम किंवा ठसा म्हणून आपल्याला असं दर्शन होतं. अर्थात त्यावर फार विचार करण्याचं कारण नाही.

२. दर्शनाचे दुसरे दोन अर्थ पारमार्थिकदृष्ट्या अधिक महत्त्वाचे आहेत. त्यांचा विचार करू. त्यांतला पहिला अर्थ असा की, ते आपल्या साधनेचं ॲप्रिसिएशन-कौतुकवजा पोच असते. त्याचा दुसरा अर्थ असा की, ते दर्शन हे रिमाइंडर-स्मरण देण्यासाठी दर्शन आहे.

३. आता हे ठरवावं लागेल की, हे ॲप्रिसिएशन कधी समजावं आणि रिमाइंडर कधी समजावं आणि त्यांचा अर्थ कसा घ्यावा. ते असं ओळखता येईल की, हे स्वप्न ज्यादिवशी पडलं, त्यादिवशी किंवा त्या पूर्वीचा एखादा सप्ताहभर आपल्याला त्यांचं आणि त्यांनी दिलेल्या किंवा आपण करीत असलेल्या उपासनेचं स्मरण किती नियमित आणि चांगलं होतं ? त्या दिवसाची परिस्थिती पाहिली किंवा काही वेळेला आपण जे संकल्प केलेले असतात त्यांनुसार तो दिवस कसा गेला, हे पाहिलं आणि तो जर चांगल्या अवस्थेत गेला असेल,असं आढळलं तर त्याचा अर्थ या साऱ्याची कौतुकवजा पोच देण्यासाठी, म्हणजे ॲप्रिसिएशनसाठी, ते स्वप्नात आले

आहेत. इथं हे लक्षात ठेवावं की, हा अर्थ माहीत असो वा नसो, आपली साधना आपण निष्कामपणे, तळमळीनं करीत असावं. त्यात अशा दर्शनवर्गैरेचीसुद्धा अपेक्षा बाळगू नये. असं असतानाही त्यांनी दर्शन दिलं तर हा अर्थ अधिक औचित्याचा ठरेल. योग्य असेल.

४. आता हेही ओळखावं लागेल की, ते पोच देण्यासाठी आले आहेत की आठवण देण्यासाठी-रिमाइंड करण्यासाठी ? वर सांगितलेली परिस्थिती नसली आणि दर्शन झालं असलं, तर ते उपासनेची आठवण देण्यासाठी आले आहेत, असं समजावं. त्याची खात्री होण्यासाठी आपण तो दिवस किंवा वर पाहिलं तसं त्याच्या आधीचा काळ-सप्ताह-महिना आपली उपासनेची, संकल्पांची, निदान स्मरणाची परिस्थिती पहावी. त्यांनी दिलेला उपदेश किंवा आपण ठरवलेल्या गोष्टी आपण करीत नसू, विसरूनही गेलो असू तर ओळखावं की, ते आठवण देण्यासाठी आले आहेत. मग मात्र त्याचा अर्थ आपण सावध व्हावं, आत्मपरीक्षण करावं, क्षमा मागावी आणि योग्य कृतीला शक्यतो लगेच लागावं.

५. अर्थ वरच्यांपैकी कुठलाही असला तरी त्याचा सगळ्याचा एक सामान्य अर्थ आहे की, त्यांचं आपल्याकडं, आपल्या साधनेकडं, प्रगतीकडं लक्ष आहे. त्याची त्यांना काळजी आहे. ही गोष्ट अर्थातच स्वतःच्या प्रगतीच्या दृष्टीनं आपल्याला आश्वासक व आनंद देणारी आहे.

६. जाताजाता याचा उल्लेख करणं योग्य होईल की, कुणाला असं दर्शन होत नसेल तर त्यांच्या गुरूंचं त्यांच्याकडं लक्ष नाही किंवा त्यांच्या साधनेत काही कमतरता आहे, असं मात्र नव्हे. गुरूंना पोच द्यायची असो किंवा आठवण द्यायची असो, त्याचे अन्य मार्गही असू शकतात.

*

२६. मुलांनी परदेशी नोकरी स्वीकारावी काय ?
अशावेळी आईवडिलांची भूमिका काय असावी ?
अशावेळी मुलांची कर्तव्यं कोणती ?

२६.१. ज्या अर्थानं पूर्वी स्वदेश-परदेश असे शब्द आपण वापरीत होतो, त्या अर्थानं ते वापरावेत अशी आता परिस्थिती राहिली नाही, हे आपण प्रथम लक्षात घेऊ. जग अनेक प्रश्नांमुळं आणि संपर्कसाधनांच्या प्रगतीमुळं जवळ आलं आहे, ही गोष्ट खरी आहे.

मात्र याचा अर्थ स्वदेश, त्याचं स्वातंत्र्य, पारतंत्र्य, अतिक्रमणं असे विषय आणि त्यांचे प्रश्न उरले नाहीत, असं मात्र समजू नये. राजकीय नसलं, उघड नसलं तरी दुसऱ्यावर स्वामित्व ठेवण्याची, त्याला आर्थिकदृष्ट्या गुलामीत ठेवण्याची प्रवृत्ती आजही ठळकपणे विद्यमान आहे, हे लक्षात घेऊन आपण नोकरीचे निर्णय घ्यावेत.

आपण घेतलेल्या शिक्षणाला अनुकूल अशी नोकरी कोणत्याही कारणांनी स्वदेशात शक्यच नसेल तर परदेशातली नोकरी स्वीकारावी. यामध्ये अपरिहार्यता आणि गरज हे निकष लक्षात ठेवावेत. हे सांगण्याचं कारण असं की, अधिक मोठी सत्ता-पैसा आणि अपरिहार्यता यांतली सीमारेषा पुसट असते, लक्षात येत नाही. तीच गोष्ट चैन आणि गरज यांच्यातल्या सीमारेषेची आहे. गरजेसाठी परदेशी जाणं वेगळं आणि अधिक चैनीचं जीवन जगता यावं म्हणून परदेशी जाणं वेगळं. यांतला फरक लक्षात घ्यावा.

एक लक्षात ठेवावं की, दुसरा देश आपल्याला नोकरीची संधी देतो आहे, याचा अर्थ त्याला गरज तर असेल, पण त्याचा त्यात फायदा आहे, हे नक्की. स्वतःचा तोटा करून कुणी दुसऱ्याच्या देशातल्या नोकरांना

संधी देणार नाही. आउटसोर्सिंगच्या फायद्यांचे नगारे वाजवणारे, त्यानुसार इतर देशांतल्या लोकांना नोकरीच्या संधी देऊन उपकार केल्याचं मिरवणारे देशही जेव्हा स्वतःच्या देशातली बेकारी त्यामुळं वाढते आहे, हे लक्षात आल्यावर आणि त्याचे दुष्परिणाम राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या त्यांच्याच देशाला सहन होत नाहीसे झाल्यावर, इनसोर्सिंगचे फायदे सांगू लागतात. यावरून काय ते ओळखावं.

अर्थात आपण आपल्या गरजेपोटी नोकरी स्वीकारीत असलो, तरी त्यात आपला देश गरीब ठेवून, त्यांचा देश श्रीमंत करीत असतो - हे नजरेआड होऊ नये. यात वैयक्तिक चैनीसाठी किंवा भविष्यांच्या अकारण काळजीपोटी तरी निदान, अशा नोकऱ्यांच्या मागं लागू नये.

यात दुसराही एक विचार अवश्य करावा की, आपण नोकरीसाठी म्हणून परदेशात जातो. तिथं रहाण्यात आपल्याला काही मर्यादेत स्वातंत्र्य असतं. तरीही एक समाजघटक म्हणून आपल्याला आणि आपल्याबरोबर जाणाऱ्या आपल्या कुटुंबियांनासुद्धा तिथं प्रत्यक्ष रहावं लागतं, त्यावेळी तिथल्या भाषा, वेष, संस्कृती, विचारपद्धती - यांचे प्रभाव नकळत आपल्यावर पडत असतात. त्याविषयी आपण जागरूक नसू तर हे प्रभाव आपल्याला आपल्या पुरातन आणि श्रेष्ठ संस्कृतीपासून नकळत दूर नेतात. आपणच स्वतःला कनिष्ठ किंवा मागासलेले वाटू लागतो. त्यामुळं होणारं नुकसान एका पिढीचं नसतं. हे आता अनुभवानं सिद्ध झालं आहे.

जिथंवर मिळणाऱ्या पैशाचा प्रश्न आहे, त्यालाही दोन-तीन बाजू आहेत. अगदी साधी म्हणजे, इथं पंचवीस हजार रुपये पगार घ्यायचा आणि परदेशात दोन लाख रुपये पगार घ्यायचा, यात दोन लाखाची भूल पडणं स्वाभाविक आहे. पण इथं चहा पाच रुपयांना मिळतो आणि परदेशात चाळीस रुपयांना मिळतो, हे तिथं गेल्यावर लक्षात येतं. याचा अर्थ तिथं

असेपर्यंत या आणि त्या पगाराची किंमत सारखीच असते. हे तर लक्षात येऊ शकतं.

खरं आकर्षण आणि सापळा पुढं आहे. ज्यावेळेला तिकडचा पैसा इथं येतो, तेव्हा मात्र तो रुपयांत एकदम कित्येक पट होतो. त्याचं आकर्षण असतं. ते वैयक्तिकदृष्ट्या खरी भूल घालतं. देशाच्या पातळीवर परकीय चलनाचा प्रश्न क्षणभर बाजूला ठेवला, तरी आपण स्वदेशात परतल्यावर किंवा स्वदेशात असा पैसा पाठवल्यावरच, त्याचा खरा फायदा सुरू होतो. जरी हा पैसा कष्टाचा असला तरी त्यात इथल्या एका रुपयाच्या तुलनेत एकदम चाळीस रुपये ओतले जातात. मग इथं असलेल्या कष्ट करणाऱ्या व्यक्तींच्या पैशांत, रहाणीमानात आणि व्यवस्थेत असंतुलन निर्माण होतं. येणारी व्यक्तीही जमिनीवर राहील, याची खात्री नसते. मग लॉटरी लागल्यावर एखाद्याला त्या पैशाचं काय करावं ते कळेनासं व्हावं, त्याला चैनीचे, अकारण खर्चांचे, नाहक गुंतवणुकींचे आणि अनेकदा व्यसनांचे फाटे फुटावेत तशी अवस्था होते. एक प्रकारची अनवस्था निर्माण होते, हेही लक्षात घ्यावं. दुसरा अर्थ सरळ आहे की, आपण तिथंच राहिलो तर त्या पैशाला तिथल्या रहाणीमानाचं आणि किमतीचंच मूल्य राहील. हा स्वदेशात आल्यावरचा लॉटरीसारखा फायदा होणार नाही आणि मग आपल्याला त्याचा त्या अर्थानं उपयोगही नाही. अन्यथा परत तरी यावं लागेल. तिथल्या रहाणीमानाची, संस्कृतीची गोडी लागली तर अनेकजणांचं आज होतं, तेच आपलंही होईल. आपल्या मातीचे उपकार आपण विसरून जाऊ आणि आपल्या तथाकथित प्रगतीच्या विश्वात मशगूल राहू.

या साऱ्या पार्श्वभूमीवर परदेशी नोकरी स्वीकारावी का, ती तात्पुरती असावी की कायमची असावी - असे अनेक निर्णय घ्यावेत असं वाटतं.

२६.२. मुलांनी परदेशी नोकरी करायची ठरवलीच असेल तर त्यांनी आधी सांगितलेलं सर्व समजावून घेतलं आहे ना, याची काळजी घ्यावी. काही वेळा परदेशी जाण्याचं आकर्षण हे मुलांच्या बरोबरीनं त्यांच्या आईवडिलांनाही असतं. ते मुलांनीच जावं यापुरतं मर्यादित नसून, त्यानिमित्तानं आपल्यालाही जायला मिळावं, असंही असू शकतं. यात 'केल्याने देशाटन...!' असा चातुर्य मिळवण्याचा चांगला हेतू असेल, तर मुलांनीही जावं आणि आपणही संधी मिळाल्यावर अवश्य जावं. पण आकर्षण म्हणून जाऊ नये, एवढं खरं.

अलीकडच्या शिक्षणांच्या नवनव्या शाखांमुळं, स्वदेशात संधी नसल्यामुळं मुलं परदेशी जात असतील, तर ते अपरिहार्य समजून स्वीकारायला काहीच हरकत नाही. उदाहरण म्हणून एक साधा विचार करावा की, शंभर वर्षांपूर्वी कोकणातून शिक्षणाची, नोकरीची, शेतीची कुठली संधी नाही आणि मुंबईत ती आहे, म्हणून त्या काळच्या पिढीतली कितीतरी मुलं मुंबईकडं गेली. कोकणात रहाणाऱ्यांना त्यावेळी मुंबई म्हणजे आजच्या परदेशसारखीच अवस्था होती. रस्ते नव्हते, वहानं नव्हती, प्रवासाला वेळ लागे, खर्च करण्याची क्षमता नव्हती. तेव्हा गरज म्हणून आणि मुंबईत संधी आहे म्हणून पालकांनी लहान भावंडांना, मुलांना त्याकाळच्या परदेशात, घाटावर - मुंबईत पाठवलंच ना ?

आजच्या वाहनांच्या, संपर्कांच्या यंत्रणा पहाता ती मुलं आज त्याच पद्धतीनं लंडनला, वॉशिंग्टनला, दुबईला- म्हणजे आजच्या मुंबईला चालली आहेत, असं समजलं की, हा प्रश्न फार मोठा वाटणार नाही. मग त्यांना पाठवण्याची भूमिकाही किंवा त्यांनी जायचे निर्णय घेतले असल्यास ते समजून घेण्याची भूमिकाही, वास्तव राहील.

वर म्हटल्याप्रमाणं इतक्या लांब मुलं जाण्यामध्ये त्यांची काळजी

वाटणं स्वाभाविक असतंच. पण खरी काळजी लागते ती आपल्या स्वतःकडं कोण पाहील याचीच असते, हे स्वीकारावं. मुलं तिथून त्यांच्या सवडीप्रमाणं संपर्क ठेवतील, पैशाची मदत करतील - एवढ्याच अपेक्षा त्यांच्याकडून या परिस्थितीत बाळगता येतील.

वर मुलांसाठी सांगितलेल्या साऱ्या महत्त्वाच्या गोष्टी समजून घेऊनही त्यांची जायची किंवा तिथं रहायची - स्थायिक व्हायची भूमिका ठाम असेल, भले ती चुकीची असेल, तरी आता आपल्या दृष्टीनं ते अपरिहार्य म्हणून प्रारब्ध ठरतं.

अगदी स्पष्ट म्हणायचं झालं तर एखाद्याला मुलगा झाला, पालकांच्या अपेक्षेप्रमाणं त्यांच्या वृद्धपणी तो त्यांना आधार होणार असला, तरी दुर्दैवानं काही अपघातानं म्हणा, आजारानं म्हणा तो ऐन तरुणपणी गेला, तर पालकांचं वृद्धपण थांबत नाही. त्यात काय तो मार्ग निघतोच. किंबहुना त्यासाठी आलेली परिस्थिती स्वीकारून मनुष्य मार्ग काढतो. तो मार्ग निघतोही.

आता इथं वेगळ्या अर्थानं मुलगा परदेशी आहे, यात 'आहे' एवढंच समाधान आहे ! पण बाकी सर्व परिस्थिती तो इथं नसल्यासारखीच आहे. म्हणजे ती स्वीकारून काढायचे मार्ग, आपले आपल्याला समजुतीनंच काढावे लागतील. ते निघतीलही. आजारपणात मदत होईल, हाकेला कुणी दुसरा मुलगा येईल, नातेवाईक येईल, कुणी त्रयस्थही येईल. त्याच वेळी हेही घडेल की, आपल्याला आपल्या मुलांच्या बुद्धीची, कर्तृत्वाची कितीही तरफदारी वाटत असेल, पैशाचंही कौतुक वाटत असेल, तरी बाथरूमध्ये पाय घसरून पडल्यावर, शेजारचा गरीब पण प्रेमळ मुलगा-माणूसच, हात धरून न्यायला उपयोगी पडेल, आपला मुलगा, त्याचं कर्तृत्व आणि त्याचे डॉलर नव्हे ! हेही एकदा आपल्याला कळून जाईल.

त्यानं आपलंच आकलन ठीक होऊन जाईल.

म्हणून आता विशेष काळजी न करता या वयात, परिस्थितीत इतर सर्वांची मदत उपलब्ध करून देणाऱ्या परमेश्वरावर भरवसा ठेवणं आणि त्याच्या स्मरणात उत्तरायुष्य घालवणं, हा अत्यंत विधायक मार्ग ठरेल. यात मुलांना दूषण देणंही टळेल, असहायताही टळेल आणि चार माणसं जोडून रहाण्याची - त्यानिमित्तानं भगवंत जोडून रहाण्याची, एक चांगली सवयही आपल्याला लागेल.

एवढी विधायक भूमिका आपल्याला या बाबतीत घेता येईल.

२६.३. परदेशची नोकरी स्वीकारण्याविषयी आधी तपशिलानं सांगितलेलं असल्यामुळं, आता मुलांच्या कर्तव्यांबद्दल एवढंच म्हणावं लागतं की, या परिस्थितीत खरंतर ज्या गोष्टी आपण प्रत्यक्ष हजर राहून करायच्या त्या आता करता येणं शक्य नाही, याची निदान जाणीव तरी बाळगावी. ती नुसतीच बोलण्यापुरती नसावी. तिला कृतीची जोड असावी. आपल्या गरजा, आपल्याला मिळालेल्या संधी या आईवडिलांपासून दूर रहाण्यासाठी किंवा त्यांची जबाबदारी टाळण्यासाठी, ढालीसारख्या वापरू नयेत ! जिथं शक्य आहे तिथं परदेशातून जरूर परतावं आणि 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' एवढा सुसंस्कृत आणि व्यापक दृष्टिकोन असलेली आपली संस्कृती सांभाळावी. त्यात नुसतीच दुसऱ्यांची सोय होत नसते, तर आपल्या भविष्याचीही तरतूद होत असते, याची खात्री बाळगावी. जे हजर राहून करता येणार नाही, ते निदान सतत संपर्क ठेवून साधावं. जो कुणी आपल्याजागी आपली कर्तव्यं पार पाडतो, त्याच्याविषयी कृतज्ञता बाळगून त्याच्यासाठी, त्याला गरजेची अशी मोठ्यात मोठी कृती करावी. एवढा पर्याय आपल्याकडं आहे. आणि हीच आपली कर्तव्यं होत.

*

२७. जग संतांशिवाय असणं शक्य नाही, असं महाराज तसंच अनेक संतही म्हणतात. आजही अनेक संतांची माहिती कळून त्यांच्याकडं अनेक साधक, श्रोतेलोक जातात पण कधी पदरात काही पडत नाही, अनेकदा फसगत होते. मग खरे संत हयात आहेत का ? आणि त्यांना कसं ओळखावं ?

हा प्रश्न सोपा वाटला तरी अवघड असलेला आणि तितकाच गरजेचाही असलेला प्रश्न आहे. जग संतांशिवाय असणं शक्य नाही, हे खरं आहे. कारण चांगुलपणाशिवाय जग टिकणारच नाही. वाईटपणा तर ते उध्वस्त करील. त्या अर्थानं संत आहेत, हे खरंच.

आता हा प्रश्न अवघड अशासाठी की, संत असले तरी त्यांच्या अशा कुठल्या आपल्याला पटकन ओळखू येतील अशा बाह्य खुणा नाहीत. कुणी स्वतःला काहीही म्हणवून घेवो पण लौकिक व्यवहारात एखाद्या वैद्य-डॉक्टरची, अन्य व्यावसायिकाची परीक्षा घेणारी कुणी व्यवस्था असावी आणि त्यात ते पास झाल्याचं प्रमाणपत्र त्यांच्याकडं असावं, तसं संतपणाचं काही नाही. म्हणूनच संत म्हटलं गेलं, म्हणवून घेतलं गेलं, तरी नुसतं तेवढ्यावर ते ठरवणं, ओळखणं कठीण आहे. या अर्थानं हा प्रश्न अवघड आहे.

हा प्रश्न सुटणं म्हटलं तर गरजेचंही आहे अशासाठी की, हयात असलेल्या, देहात असलेल्या संतांचा संपर्क साहजिकच खूप प्रभावी, उभयपक्षी सोपा आणि उपयोगी ठरतो, हेही संतांनी सांगितलं आहे. आपल्यालाही हा अनुभव येतो. त्यामुळं हे जर ओळखता आलं तर, आपल्या उद्धाराचं काम, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं काम, सहवासाचा फायदा, अनेकदा चर्चेच्या मार्गानं आवश्यक ते बौद्धिक समाधान

मिळण्याची गरज पूर्ण होणं, भ्रम आणि दिशाभूल टळणं - अशा अनेक दृष्टींनी हा प्रश्न सुटला तर आपली एक महत्त्वाची गरज पूर्ण होईल.

यासाठी लक्षात घेण्याची पहिली गोष्ट म्हणजे संत ही आपल्यासारखीच देहधारी व्यक्ती आहे. आपल्यात जसं एक देवत्व प्रत्येकाच्या ठिकाणी आहे. भले त्याचं प्रमाण कमी असेल, ते कमी वेळा जागृत असेल, कदाचित कृतीच्या वेळेला त्याचा विसर पडत असेल, तरी ते आपल्यात असतं आणि आपल्याला त्याची जाणीव होऊ शकते. त्यामुळं मिळणाऱ्या सात्त्विक आनंदाची आपल्याला कल्पना असते. हेच देवत्व ज्यांच्या ठिकाणी सदैव विद्यमान असतं, कृतींत असतं, पूर्णत्वानं असतं, प्रकर्षानं जाणवतं - त्या ठिकाणी संतत्व वास करतं. यात अर्थातच बाह्यांगाचा भाग नसतो आणि असला तरी तो या देवत्वालाच व्यक्त करणारा असतो. साधेपणा हे संतत्वाचं एक लक्षणच आहे.

अत्यंत निर्लोभता, निःस्वार्थी प्रेम, मान-मान्यतेपासून कुठल्याही लौकिक अपेक्षा नसणं, सदैव दुसऱ्याच्या मनाची, हिताची काळजी वहाणं, कशात न गुंतणं, पैशाचा अजिबात लोभ नसणं-अशा अनेक खुणा आहेत. त्यांत सर्वांत मोठी ही की, वर म्हटल्याप्रमाणं आपल्या ठिकाणीही अशा तऱ्हेच्या देवत्वाची असलेली जाणीव त्यांच्या सहवासात नकळत वाढते, प्रपंचाची आसक्ती कमी होते, साधनाला बळकटी येते - त्या ठिकाणी संतत्व विद्यमान आहे, असं समजावं. बाकी बाह्य अवडंबराला कृपा करून भुलू नये. नुसत्या सहवासात जाऊन आल्यावर आपलं चांगुलपण जर सहजपणे वाढीला लागलं तर ती संतांची खूण समजावी.

त्यातूनही आपली फसगत होऊ नये असं वाटत असेल तर आपण कुठं जाऊ नये, मनापासून नाम घ्यावं आणि खऱ्या संतांची भेट व्हावी, ही तळमळ बाळगावी. कुणी खरे संत आपोआप भेटतात.

*

२८. नामासारखा परमार्थाच्या साधनेचा कुठला मार्ग स्वीकारला की, नेहमीचं आयुष्य जगताना उदाहरणार्थ शॉपिंग, ट्रीप, वैवाहिक जीवन, मनोरंजन, खाणं, गप्पा, नातेवाईकांची फंक्शन्स - अशा गोष्टी अपरिहार्य असल्या तरी त्या करताना अपराधीपणाची भावना वाटते. हे बरोबर आहे का ? वासना, विकार व अहंकार यांचं या मार्गात स्थान कोणतं ? या साऱ्या बाबतीत परमार्थात काय अपेक्षित असतं ?

हा प्रश्न सबंध जीवनाचा आणि त्यामुळं मोठा आहे. तरी त्याचा थोडक्यात काही मुद्यांना धरून विचार करुया :-

२८.१. सर्वांत प्रथम हे स्पष्ट होणं आवश्यक आहे की, खरा परमार्थ हा नेहमीचं जीवन जगण्याचाच एक परिपक्व प्रकार आहे. मग तो नामाचं साधन स्वीकारून असो की अन्य कोणतं साधन करून असो. त्यामुळं नेहमीच्या नैसर्गिक जीवनाच्या विरोधात तो असणं शक्य नाही.

आपण उल्लेख केलेल्या सर्वसाधारण गोष्टी नैसर्गिक जीवन जगताना कौटुंबिक व सामाजिक आयुष्यात सहजपणे येतातच. त्या माणसाच्या नैसर्गिक गरजा आणि सामाजिक भावनाही दर्शवतात. असं नेहमीचं कौटुंबिक किंवा सामाजिक जीवन नाकारणारा किंवा एकट्याची वेगळी जीवनपद्धती जाणीवपूर्वक स्वीकारणारा संन्यासमार्ग सोडला तर परमार्थाला या नेहमीच्या नैसर्गिक जीवनाचं काहीही वावडं नाही.

मनुष्य कुटुंबात राहील, समाजात राहील तर आपण उल्लेखल्याप्रमाणं मनोरंजन, सहल, कौटुंबिक, वैवाहिक जीवन, खाणं-पिणं, सभा-संमेलनं, सामाजिक संस्था, चळवळी, कार्यं - अशा गोष्टी त्यात्या ठिकाणच्या सामाजिक, राजकीय गरजांप्रमाणं मनुष्याच्या जीवनात

रहातीलच. नाम घेत असलो तरी आपल्याला कौटुंबिक, सामाजिक, राजकीय जीवन असेल. त्यानं काही बिघडतही नाही. माझं जसं माझ्याशी कर्तव्य लागतं तसं ते कुटुंबातल्या प्रत्येक घटकाशीही लागतं आणि इतर संस्था-संघटनांशीही. त्यामुळं त्या संबंधातल्या आपल्या अनेक घटना आणि कृती यांत अनैसर्गिक काही नसून ते सहज आणि त्यात्या समाजाच्या रीतिरिवाजाप्रमाणं योग्यच असतं. म्हणून त्यात अपराधीपणाची भावना वाटून घेऊ नये.

२८.२. माणसाला ज्या अर्थी वासना आणि विकार दिले आहेत, त्याअर्थी त्यांना जीवनात काही स्थान असेलच. तीच गोष्ट अहंकाराचीही आहे. परमार्थ माणसाला परिपक्व जीवन जगायला शिकवतो, याचा अर्थ त्या साऱ्यांना असलेलं स्थान ओळखून, त्यांना योग्य तऱ्हेनं वापरायला माणसाला तयार करतो, शिकवतो.

उदाहरणार्थ, माळ घेतली की, व्यसन करू नको, अपेय पान करू नको म्हणतात. पण पाणी पिऊ नको, असं म्हणत नाहीत. तसं अपेक्षितही करत नाहीत. पाणी पिण्याचीसुद्धा एक इच्छाच आहे. ती नैसर्गिक आहे. पण ती माणसाला जगवते. मात्र अपेय पिण्याची, व्यसनाचीही एक इच्छा आहे. पण ती माणसाचा घात करते, नव्हे त्याला जीवनातून उठवू शकते.

तीच गोष्ट अन्नाच्या इच्छेची आहे. माळ घेतली, नाम घेतलं तर एकवेळ मांसाहार करू नका म्हणतील, पण अन्न खाऊ नका म्हणणार नाहीत. कारण अन्नाची इच्छा पूर्ण केली तर ती माणसाला जिवंत ठेवील, नैसर्गिकरित्या जगवील. त्याचा नाम घेण्याशी विरोध असण्याचं काही कारण नाही. आता नाम चांगलं व्हावं म्हणून आणि आरोग्यासाठीसुद्धा माणूस एक बंधन म्हणून आठवड्यातून एखादा उपास करील, एकादशी

करील ही गोष्ट वेगळी. पण जिभेची चव म्हणून तो जर त्याच्याचसारख्या दुसऱ्या एखाद्या सजीवाचा जीव घेऊन ते अन्न खाईल, तर ती अन्नाची इच्छा नसून, नैसर्गिक नसून, अन्नाची वासना होईल.

म्हणून थोडं स्पष्ट पहायचं तर, नैसर्गिक इच्छा या माणसाचं भरण-पोषण-वर्धन व्हावं आणि त्याच्याबरोबरच्या सृष्टीचंही भरण-पोषण-वर्धन व्हावं, सर्व घटकांची जीवनं संतुलित होऊन एकमेकांना आड न येता, सुरळीत चालावीत यासाठी निर्माण झालेली नैसर्गिक व्यवस्थाच आहे. पण या इच्छेचं तीव्र आणि वेळी घातक स्वरूप म्हणजे वासना होय. त्या माणसाचं जीवन असंतुलित करतील आणि निसर्गाचं चक्रही असंतुलित करतील.

तीच गोष्ट विकारांची आहे. माणसाला जगण्यासाठी काम, राग, लोभ इत्यादी भावना नैसर्गिकरित्या दिल्या आहेतच. त्या त्यांच्या मर्यादेत राहिल्या तरच माणसाचं जीवन सुरळीत सुरू राहील. समाजाचंही राहील. पण त्या भावनांचं तीव्र आणि घातक स्वरूप म्हणजे विकार होत. ते मात्र माणसाचं आणि त्याच्या समाजाचं जीवनही असंतुलित करतील आणि त्याचं व्यक्तिगत, सामाजिक नुकसानही करतील.

मनुष्य बेसावध असेल तर इच्छेचं वासनेतलं आणि भावनेचं विकारांतलं परिवर्तन केव्हा घडतं, हे त्याला कळणारही नाही. आणि त्याला उत्तम जगण्यासाठी - कौटुंबिक, सामाजिक जीवन - जगण्यासाठी दिलेल्या नैसर्गिक इच्छा आणि भावनांचं, नुकसान करणाऱ्या अनैसर्गिक वासना आणि विकारांत परिवर्तन होऊन, स्वतःचं नुकसान कधी होईल, ते त्याला कळणारही नाही. त्याचे अनेक दुष्परिणाम तर दुरुस्त करण्यापलीकडचे असतील, अनैसर्गिक असतील. याचे अनेक दुर्दैवी सामाजिक परिणाम - अत्याचार, अनाचार, हिंसा, विध्वंस - या साऱ्यांच्या

रूपानं आज अनुभवाला येत आहेतच. हे सारं माणसाला जर कळू शकलं नाही तर त्याचं होणारं नुकसानही त्याला टाळता येणार नाही. त्यातून निर्माण होणारं सामाजिक नुकसान आणि अवनतीही त्याला टाळता येणार नाही. म्हणून या साऱ्याची कल्पना आणून देणाऱ्या परमार्थविद्येची माणसाला गरज आहे.

आता इच्छांचं वासनांत आणि भावनांचं विकारांत रूपांतर होऊ नये म्हणून काय करावं आणि रूपांतर आधीच झालं असेल तर त्याचं काय करावं, यासाठी परमार्थानं संयम, दमन आणि शुद्धीकरण असे अनेक मार्ग सांगितले. संयम हे, समजुतीनं विकसित केलेलं स्वभावाचं वळण आहे. दमन हा, साध्या भाषेत, उधळलेल्या जनावराला घालावा तसा आवर आहे, दावं लावणं आहे. शुद्धीकरण हे त्यात्या गोष्टींतले दोष काढून टाकण्यासारखं आहे, म्हणजे गढूळ पाण्याला तुरटी लावून ते पिण्याजोगं करण्यासारखं आहे.

अहंकारसुद्धा असाच आहे. तो शुद्ध आणि प्रमाणात असला तर जीवन जगायलासुद्धा गरजेचाच आहे. नैसर्गिक आहे. भुकेची जाणीव होण्याइतपत तरी मनुष्याच्या ठिकाणी जगण्यासाठी अहंभाव लागेलच. तीच अवस्था इतर गरजांची आहे. म्हणून इच्छा, भावना आणि संयमित विकार, वासना यांना त्यांच्यात्यांच्या ठिकाणी स्थान आहे. ते सारे अनैसर्गिक समजू नयेत.

मग प्रश्न असा येईल की, माळेचा, नामाचा - परमार्थाच्या कुठल्याही मार्गाचा स्वीकार केला तर जगलं जाणारं जीवन आणि हे काहीही न स्वीकारता जगलं जाणारं जीवन - यांत फरक काय राहील ? आणि त्यांतलं कोणतं जीवन अधिक स्वीकार्य राहील ?

तर, वर आपण सुरुवातीला म्हटल्या त्या - मनोरंजन, खाणंपिणं,

वैवाहिक जीवन, सामाजिक कामं - इत्यादी गोष्टींत पारमार्थिक मनुष्य भाग घेईल पण त्याच्या बाबतीत, त्याच्या मनाची ठेवण व दृष्टिकोन वेगळा राहील. कारण बेसावधतेचे वर सांगितलेले परिणाम त्याला परिचित रहातील. तसंच सावधतेनं साधणारं स्वतःच्या आणि समाजाच्या जीवनाचं निकोपपण आणि साफल्य याचीही कल्पना त्याला असेल. त्यामुळं त्याच्या जीवनात आणि इतर सामान्य माणसांच्या जीवनांत लक्षणीय, विधायक व स्वागतार्ह फरक राहील.

म्हणूनच पारमार्थिक जीवन अधिक नैसर्गिक, हितकर आणि त्यामुळं स्वीकार्य राहील.

२८.३. या पार्श्वभूमीवर, आता परमार्थात अपेक्षित जीवनाचा विचार करू. प्रथम पुन्हा हे लक्षात घेऊ की, नेहमीच्या जीवनातल्या वर उल्लेखलेल्या गोष्टी करण्यात, जगण्यात अपराधीपणाची भावना आता उरणार नाही. मात्र इच्छा, भावना, वासना, विकार यांचं वैयक्तिक पातळीवर योग्य आणि संतुलित व्यवस्थापन करणं पारमार्थिक माणसाकडून अपेक्षित आहे. परमार्थ माणसाला नैसर्गिक जीवन निकोपपणे जगायला शिकवतो, अडवीत नाही.

हे लक्षात आलं की, एका बाजूनं नेहमीचं जीवन जगता येईल. तसंच दुसऱ्या बाजूनं त्या साऱ्यांत बेसावधपणे अडकून, स्वतःला निसर्गानं दिलेल्या उत्तम मानवी जीवनाच्या देणगीचा दुरुपयोगही त्याच्याकडून होणार नाही. कुटुंबाची, समाजाची, निसर्गाचीही देणी देणं, कर्तव्यं करणं परमार्थात अपेक्षित असतं, तेही त्याच्याकडून कृतज्ञतेनं घडेल. ही सारी कर्तव्यं पार पडतील, पण त्याची आसक्तीही राहणार नाही आणि अहंकारही होणार नाही. (विकार शब्दाच्या पारंपरिक अर्थाच्या संबंधातील उत्तरासाठी कृपया उत्तरायण - भाग : १, प्रश्न क्र. २६ पहावा.)

*

२९. मृत व्यक्तींचे फोटो घरात लावणं अशुभ असतं, असं म्हणतात. ते खरं आहे का ? त्याबाबतीत काय करावं ?

आपल्या शुभ-अशुभाच्या कल्पना मोठ्या विचित्र असतात. विशेषतः अशुभाच्या कल्पनांमागं भीतीचा मोठा वावर असतो, हे लक्षात घ्यावं. त्यात अनेकदा वस्तुस्थितीकडंसुद्धा दुर्लक्ष होतं.

आपली संस्कृती आईवडिलांना देवाचं स्थान देणारी आहे. कृतज्ञतेसारखा अत्यंत मोलाचा पायाभूत सद्‌गुण शिकणं, तिथून सुरू होतं. आईवडील हेही देहात असल्यामुळं कधी ना कधी ते काळाच्या पडद्याआड जातीलच. पण आपल्या पिढीपुरती तरी त्यांच्याबद्दलची कृतज्ञता मात्र तशीच रहाते आणि रहावीही.

ती स्मृतीच्या पडद्याआड जाऊ नये, आपण अकृतज्ञ होऊ नये, म्हणून श्राद्ध करणं, निदान फोटो लावणं आवश्यक झालं. ज्या फोटोनं आईची किंवा वडिलांची, लहानपणापासून त्यांनी केलेल्या संस्कारांची, उपकारांची, त्यात्या काळातल्या संस्मरणीय दिवसांची आठवण होते, ज्यामुळं आज सात्त्विकता आणि कृतज्ञता वाढते, ती कृती अशुभ कशी असेल ? त्यामुळं त्यात्या पिढीनं मागच्या पिढीपुरते तरी फोटो लावावेत, हे शुभ व उपयोगी आहे.

एक साधा विचार करावा की, एखाद्या सत्पुरुषांचा फोटो पाहिला तर, ते देहानं मृत असूनसुद्धा त्यांच्या केवढ्या उदात्त जीवनाची स्मृती होते, प्रेरणा मिळते. त्यानं आपली जीवनं घडतातच ना ? तो नुसताच फोटो नसतो तर ते कृतज्ञतेची, आनंदाची, सावधतेची जाणीव देणारं प्रतीक असतं, हे लक्षात घेतलं तर या प्रश्नाचं उत्तर आपल्यालाच मिळेल.

*

३०. विवाह करण्यापूर्वी विवाहाकडं बघण्याचा आमचा (मुलाचा-मुलीचा) दृष्टिकोन काय असावा ?

एकंदरीत सध्याच्या विवाहित मंडळींकडं पाहून नंतर दृष्टिकोन वगैरे ठेवण्याचं स्वातंत्र्य रहात नसावं, असा आपल्याला अनेकदा अनुभव येतो. त्यामुळं हा प्रश्न आपण आधीच विचारला, हे बरं झालं.

१. विवाहानंतर सुरू होणारं वैवाहिक जीवन हा गृहस्थाश्रम आहे, हे प्रथम लक्षात ठेवावं. आधीच्या एका प्रश्नात पाहिल्याप्रमाणं आपापल्या नैसर्गिक इच्छा, भावना यांची सहजतेनं पूर्ती करण्याची ती एक उत्तम व्यवस्था असली तरी तिला आश्रम म्हटलेलं आहे, हे लक्षात ठेवावं. आश्रम म्हणजे जिथं श्रमलेला माणूस विसाव्यासाठी काही काळ थांबतो आणि पुढच्या प्रवासाला रवाना होतो, अशी जागा.

अर्थातच अशी जागा, हे मुक्कामाचं अंतिम ठिकाण नसतं. पुढं निवृत्तीची तयारी करून घेणारा वानप्रस्थाश्रम किंवा आजच्या भाषेत प्रौढपण ठेवलेलं असतं. तिकडं जायची सोय आणि वय होईपर्यंत थांबण्याची गृहस्थाश्रम ही जागा आहे, हे लक्षात ठेवलं तर विवाहानंतरच्या जीवनातल्या आपल्या अपेक्षा, कार्यक्रम यांनाही निश्चित आणि योग्य स्थान येईल.

२. उदाहरणानं पहायचं झालं आणि आपण रागावणार नसाल तर नदी, म्हैस आणि प्रवासी यांचा विचार करावा. नदी सारखीच असली तरी म्हैस त्यात उतरते ती डुंबण्यासाठी आणि परत पुन्हा होती तिथं, त्याच काठावर येण्यासाठी. पण प्रवासी त्यात उतरतो, तो पैलतीरी जाण्यासाठी. एकदा हा दृष्टिकोन लक्षात आला तर,आपल्याला काय व्हायचं आहे, ते आपल्याला आधीच ठरवता येईल आणि त्यानुसार आपल्या वैवाहिक जीवनाची ठेवणही

राहील. एकात पुनर्जन्म आहे, तर दुसऱ्यात उद्धार आहे, हे वेगळं सांगायला नकोच. विवाह हे ध्येय नसून ध्येयपूर्तीचं साधन आहे. त्यात वंशतंतु टिकवणं, कुटुंब, समाज यांची धारणा साधणं अशी अनेक ध्येयं आहेत. हे लक्षात आलं की, लग्नाकडं बघण्याचा चांगला दृष्टिकोन तयार होतो.

३. पूर्वी म्हटलेल्या गृहस्थाश्रमाला 'धन्यो गृहस्थाश्रमः' अशा तऱ्हेनं धन्य ठरवलं गेलं आहे. ते अशासाठी की, इतर सर्व आश्रमांना हा आश्रम आधार देणारा आश्रम आहे. तेव्हा तितक्या जबाबदारीनं आणि आनंदानं हा आश्रम अवश्य स्वीकारावा. या आश्रमानं साधणारी सोय माझी एकट्याची नसते, हे लक्षात राहिलं तर इतरांचा त्रासही वाटत नाही आणि त्यांच्यामुळं संघर्षही निर्माण होत नाहीत. पतीला पत्नी किंवा पत्नीला पती मिळत असला आणि त्यांची सोय होत असली तरी, त्यात सासऱ्यांना व सासुबाईंना सून, कुणा बहिणीला किंवा भावाला वहिनी, कुणा भाच्याला मामी, कुणा पुतण्याला काकू मिळत असते, हे लक्षात राहिलं म्हणजे ती सगळी आनंदानं करायची कर्तव्यं ठरतात.

४. विवाहाला बहिरंग असलं तरी मोलाचं अंतरंग असतं, हेही लक्षात घेण्यासारखं आहे. ते परस्पर संवाद, सुखदुःखाचे वाटे, जपणूक, आधार अशा अनेक स्वरूपाचं असतं आणि तेच खरं टिकून रहातं.

५. विवाहानंतर सुरू होणाऱ्या प्रपंचात माणसं दोन असोत किंवा कुटुंबाच्या ठेवणीप्रमाणं अनेक असोत, मूळ दोन माणसांना आदरानं लक्ष ठेवण्यासारखी, महाराज म्हणत तशी, तिसरी वस्तू असणं गरजेचं आहे. ही तिसरी वस्तू म्हणजे आपली श्रद्धा असलेला देव असेल, गुरू असतील किंवा घरातलं कुणी मोठं माणूस असेल. मग आपल्या अडचणीत, विसंवादात त्यांच्या मदतीनं सामंजस्य राहील. एवढं पुरे.

*

३१. एका बाजूला 'देव भेटे याचि देही' ही तळमळ आणि ध्येय बाळगणं आणि 'मोक्ष देई का घाली संसारी' अशी कृपेसाठी अनंत काळ वाट पहाण्याची तयारीही ठेवणं, यांत ध्येय असणं आणि अधीरता तर नसणं, यांचा मेळ कसा घालावा ?

आपल्या प्रश्नाचा रोख माझ्या लक्षात येतो तो असा की, एकदा ध्येय ठरलं की, ते गाठण्याविषयी तळमळ आणि अधीरता उत्पन्न होते. त्यांच्यामुळं प्रयत्नांवर होणारा विपरीत परिणाम कसा टाळावा ?

एका सोप्या उदाहरणानं हे अधिक स्पष्ट होईल. वर्षाची सुरुवात जूनला होत असेल, तर आपापल्या कुवतीप्रमाणं मी विशेष योग्यता किंवा किमान पंच्याण्णव टक्के मार्क मिळवीनच, असं निश्चित ध्येय ठरवावं लागतं. त्या ध्येयाबद्दलची खात्री आपल्याला वर्षभर टिकवावी लागते. त्यासाठी तळमळही बाळगावी लागते. पण नुसती तळमळ बाळगून हे ध्येय गाठता येणार नाही, हे आपण नक्की जाणून असतो. ते गाठायचं असलं तरी पुढच्या वर्षीच्या निकालाच्या दिवशीपर्यंत थांबण्याचा धीर आपण दाखवतो, प्रतीक्षा करतोच ना ? उलट अधीर होण्यापेक्षा तेवढे गुण मिळवायला लागणारा अभ्यास वर्षभर नियमित करतो.

हीच प्रक्रिया आपल्याला 'देव भेटे याचि देही' या ध्येयाबद्दल करायची आहे.एकवेळ विशिष्ट गुणवत्तेसाठी तेवढी बुद्धिमत्ता असणं गरजेचं असेल. पण उद्धाराचं ध्येय मात्र प्रत्येकाला शक्य असलेलं ध्येय आहे. वर म्हटल्याप्रमाणं अधीरता टाळून, ते गाठण्यासाठी उलट नियमितपणे आवश्यक साधना करू. तळमळीनं साधन अधिक चांगलं होईल आणि अखेर हे ध्येयही गाठलं जाईल. हा मेळ असा घालता येईल.

*

जिज्ञासू साधकांच्या संदर्भासाठी उत्तरायण भाग : १ ची प्रश्नसूची
(उत्तरांसाठी कृपया भाग : १ पहावा.)

१. साधनेची ओढ लागलेली आहे, पण प्रापंचिक जबाबदाऱ्याही आहेत. जोडीदाराचा विरोध नसला तरी अनुकूलताही नाहीये.या प्रसंगाचा कसा सामना करावा, जेणेकरून दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतील ?...१३

२. मुलांनी जप करणं योग्य आहे का ? या वयात त्याची गरज आहे का ? ...१४

३. जगात दु:ख का दिसतं ? सगळे प्रापंचिक लोक त्याबद्दल तक्रारी का करीत असतात ? परमेश्वरानं एवढं दु:खमय जग का निर्माण केलं आहे ? प्रपंच नाही केला तर चालेल का ?परमार्थात भाव हा शॉर्टकट आहे का ?...१५

४. परमार्थाला लागल्यावर प्रपंचातली काही माणसं, संबंध दुरावतात हे का व कसं ? ...२१

५. भगवंताचा शोध घेताना अनेक मार्ग सांगितले जातात. त्या मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे मीचा शोध (आत्मशोध) हा आहे का ? त्या मार्गात कोणकोणत्या पायऱ्या आहेत ? सर्वसाधारण साधकाला या पायऱ्यांवरून जाता येईल का ? येत असल्यास कसं जाता येईल ? साधक बरोबर मार्गावरून जातो आहे याच्या खुणा त्याला पडताळून पाहाता येतात का ? ...२९

६. लहानपणापासून देवाची आवड आहे, श्री महाराजांचं वाचायची आवड आहे. पण माझे माझ्या बाबतीतले सर्व निर्णय चुकीचे झाले याला काय कारण असावं ? ...३१

७. सद्गुरू कृपा करतात म्हणजे काय करतात ? ...३३

८. देवांच्या जुन्या फ्रेमचं काय करावं ? त्या खराबही होतात व टाकण्याचीही भीती वाटते. ...३४

९. आजवरचं आयुष्य मी चुकीच्या पद्धतीनं घालवलं.आता वय झालं आहे. उरलेल्या थोड्या आयुष्यात उद्धार होईल का व कसा होईल, याची चिंता लागते. काय करावं ? ...३५

१०.आत्मज्ञान झाल्यावर माणसाच्या जीवनात कोणते बदल होतात? ध्येय, कार्य, बुद्धीच्या विविध क्षमतांत काय बदल होतो? देहबुद्धी नाहीशी झाल्यामुळं झोपेची गरज किती असते? भूक लागते का ? ...३६

११. संसारातील खरेदीकडं बघण्याचा दृष्टिकोन काय असावा ? ...३८
१२. ईश्वराच्या इच्छेनं सर्व घडत असतं, आपला हात लागतो इतकंच. अशा स्वरूपाचंही श्री महाराजांचं वचन आहे. या वचनाशी आपल्या दैनंदिन कर्तृत्वाचा मेळ कसा घालावा ? ...३९
१३. माझा जप संतछायेत आल्यावर होतो, पण घरी होत नाही, ही मानसिकता कशी बदलेल ? ...४०
१४. कृपा झाली हे कसं समजावं ? ...४०
१५. श्री महाराजांनी श्री दत्तगुरूंचं मंदिर बांधलं, त्याच्या शेजारी नृसिंहाची स्थापना केली याचा उद्देश काय असावा ? ...४१
१६. ईश्वरी कृपा होणं म्हणजे नक्की काय ? ती कोणावर होते ? पारमार्थिक वाटचालीत मानवी प्रयत्नांचं महत्त्व किती ? ...४३
१७. आणीबाणीचे प्रसंग, युद्ध, बाँबस्फोट इ. प्रसंगी साधकाची भूमिका काय असावी ? ...४५
१८. मृत्यूची भीती काढून टाकायला नामस्मरणाचा कसा उपयोग करून घ्यावा ? ...४७
१९. जोपर्यंत एखादी गोष्ट अमुक तऱ्हेनं घडून यावी असं वाटतं आहे तोपर्यंत व्यवहारानं योग्य प्रयत्न करणं जरूर आहे.या महाराजांच्या वचनाचा अर्थ कसा लावावा व त्यात कोणतं कर्तृत्व अभिप्रेत आहे? ...४९
२०. विद्यार्थ्यांना अभ्यास करताना नेहमी एकाग्रतेविषयी सांगितलं जातं.मग तसंच नाम घेणाऱ्याला जपाच्या गुणवत्तेबद्दल का सांगितलं जात नाही ? ...५०
२१. सत्याचा मार्ग धरून जर चाललं तर व्यवहाराशी सांगड घालणं अवघड जातं. यासाठी काय करावं ? ...५२
२२. साधना कशासाठी करायची असते ? ...५४
२३. जगामध्ये चांगली स्थिती येणं हे कधी होणारच नाही का ? हे अशक्य आहे का ? ...५५
२४. जर असं असेल तर सामाजिक कार्याला काही महत्त्व आहे का ? ...५५
२५. आपल्याला कुणी नमस्कार करीत असेल तर काय करावं ? ...५६
२६. विकारांचं आपल्या जीवनातलं स्थान काय ? ...५७

२७. श्री गोंदवलेकर महाराजांचं नामाचं प्रेम प्रचंड असतानाही त्यांनी त्यांचा एका शब्दातला परमार्थ 'सावधानता'असा का सांगितला ?...५९
२८. एकच नाम घेतल्यानं ते खोलवर जातं व मुरतं असं म्हटलं जातं. मग संतछायेतील उपासनेच्या वेळी आपण वेगवेगळी नामं घेण्याचा हेतू स्पष्ट करावा. ...६०
२९. योगमार्ग, भक्तिमार्ग सर्व मार्ग परमेश्वराकडंच नेतात. योगमार्गात दिवसेंदिवस शरीर बळकट होत जातं. पण भक्तिमार्ग हा प्रभावी असूनही कुठल्यातरी कारणानं भक्तिमार्गात देहभोग सोसावे लागतात.या देहभोगांना भक्तिमार्गात काही संरक्षण नाही का? ...६१
३०. परमार्थमार्गावर अर्ध्यावर गेल्यावर पुढं जाणारे साधक फार थोडे असतात, असं श्री महाराजांनी म्हटलं आहे. यामध्ये अर्धा टप्पा कुठला आणि त्यापुढं जाण्यामध्ये कोणते अडथळे असतात ? ...६४
३१. प्रार्थनेला मोठं महत्त्व आहे असं म्हणतात. दुसऱ्याचे आजार बरे व्हावे म्हणून, व्यसन सुटावं म्हणून प्रार्थना करावी का? अशी दुसऱ्यासाठी प्रार्थना केल्यानं नामसाधना करणाऱ्या व्यक्तीची नामसाधना खर्ची पडते का ? ...६५
३२. साधनेत प्रगती होते की नाही हे कसं कळतं ? ...६६
३३. शिक्षणपद्धतीची सद्य:स्थिती लक्षात घेता शिक्षणाबद्दल विद्यार्थ्यांची व पालकांची भूमिका काय असावी ? ...६७
३४. भावाचा भावनिकतेशी कितपत संबंध आहे ? ...६८
३५. प्रपंच हा मोठा प्रश्न असून त्याचं निश्चित उत्तर कधीच सापडत नाही व सोडूनही देता येत नाही.प्रपंचाच्या अशा उत्तर न मिळालेल्या प्रश्नामुळंच आपण अपयशी ठरतो. अशा वेळी काय करावं ? ...६९
३६. मी काही दिवस एक नाम घेतो त्यानंतर नाम बदलतो. पुन्हा काही दिवस ते नाम घेतो. त्यानंतर पुन्हा दुसरं नाम घ्यावं असं वाटतं. हे योग्य आहे काय ? ...७०
३७. नामस्मरण करीत असताना नाम चालू आहे हे जाणवतं. पण त्याचवेळी मनोव्यापारही चालू असतो, असं जाणवतं. या दोन्ही गोष्टी मनाच्या कोणत्या स्तरावर चालू असतात आणि हे मनोव्यापार क्षीण होण्यासाठी काय करावं ? ...७१

३८. आम्हाला आपल्यासारखं होता येईल का ? त्यासाठी काय करावं ? काय करू नये ? ...७२
३९. अनेक वर्षं सत्संगात राहूनही साधनेशिवाय, नामाशिवाय माझं अडतंय,असं वाटत नाही.कल्पनेत मात्र नाम म्हणजे सर्वस्व असावं असं वाटतं.पण तशी कृती घडत नाही. यासाठी काय करावं ? ...७३
४०. प्रपंचात नेहमी न केलेल्या उपासनेशी निगडित अपराधीपणाची भावना असते. त्यासाठी काय करावं ? काय करू नये ? ...७६
४१. नामस्मरण काही वेळा खूप चांगलं होतं, काही वेळा ते चांगलं होत नाही.करणारे आपणच असूनही असं का होतं ? ते चांगलं व्हावं म्हणून काय करावं? ...७७
४२. प्रत्येकाला जीवनात अध्यात्माची गरज आहे काय ? असल्यास ती का आहे ? ...७८
४३. साधन करताना येणारे अनुभव खरे असतात का ? ...८०
४४. समाजात व्यवहार करताना प्रत्येकाचं व्यक्तित्व जाणण्याची गरज आहे का ? ...८१
४५. संतनमनमालेमध्ये पाचव्या ओवीत महाभूते आणि जाणीव एकचि आहे असं म्हटलं आहे, त्याचा अर्थ स्पष्ट करावा. ...८२
४६. बहुसंख्य बुद्धिमान व्यक्तींनी आत्मज्ञान करून घेतल्याचे दाखले इतिहासात सापडतात. उदा.विवेकानंद,समर्थ,ज्ञानेश्वर माउली, गुरुदेव रानडे, श्री महाराज इ. असं असूनही अडाणी माणसाला परमार्थ सोपा असं श्री महाराज का म्हणतात ? ...८३
४७. देव किंवा गुरू यांच्या फोटोकडं पाय करून झोपू नये असं म्हणतात, ते खरं आहे का ? ...८४
४८. झाडांना भावना असतात हे विज्ञानानं सिद्ध केलेलं आहे. त्यांच्यात भावना विकसित झालेली आहे का ? जर भावना विकसित झालेली नसेल तर त्यांच्यात स्पर्धा, द्वेष अशा गोष्टी कशा असतील ? व मग आपण 'सृष्टिसंदेश'मध्ये म्हणतो तसे संदेश ती कसे देऊ शकतील ?...८५
४९. उपासनेत किंवा वृत्तीत स्थिर होणं म्हणजे काय ? स्थिर झाल्याची लक्षणं कोणती ? ...८६

५०. कृमी, कीटक, मुंग्या, डास आपल्याकडून अजाणतेपणी मरतात
याबद्दल काय करावं ? ...८७
५१. देहबुद्धी कमी करण्यासाठी नेमकं काय करायला हवं ? ...८९
५२. प्रपंच आणि परमार्थ विरोधी आहेत काय ?
सामान्य प्रापंचिकांचा परमार्थाला विरोध का असतो ?
त्यांनी ती म्हातारपणची गोष्ट का ठरवली आहे ? ...९०
५३. जीवनात प्रपंच आणि परमार्थाची सांगड का व कशी घालावी ? ...९४
५४. सृष्टीची, गुरुपदाची, विश्वात्मकाची इ. नव्या विविध आरत्या
करण्यात काही विशेष कारण आहे का ?
उपासनेसाठी त्याचा उपयोग कसा करता येईल ? ...९५
५५. शरीराला दुखापत झाल्यामुळं सारखा त्रास होऊ लागला.
त्यावेळेला एकदम 'देहेदुःख ते सुख मानीत जावे' हा मनाचा श्लोक
आठवला.तर अशा देहदुःखाच्या वेळेला सुख कसं मानावं ? ...९६
५६. साधना करीत असताना सुटलेल्या वासना पुन्हा चिकटण्याची
शक्यता असते का ? ...१००
५७. आपल्या इथले संस्कार पाहाता, बाहेरील चंगळवादी,
भोगवादी परिस्थितीशी आम्ही कसं ॲडजेस्ट व्हावं ? ...१०१
५८. मंदिराची गरज आहे की नाही ?
आणि मंदिरांमुळं एवढे गोंधळ का दिसतात ? ...११३
५९. आत्मज्ञानासाठी सद्गुरूंची आवश्यकता आहे की नाही ? ...११५
६०. गुरुकृपा हा प्रयत्नाचा विषय की प्रारब्धाचा ? ...११६
६१. वृद्धत्वाची तयारी कशी करावी ? ...११७
६२. दुश्चित्तपणा म्हणजे काय ? ...११८
६३. घरात अनेक देव झाले असल्यानं त्यांची पूजाअर्चा नीट
होत नाही. रुखरुखही वाटते. अशा वेळी काय करावं ? ...१२१
६४. मुलांनी उपासना करावी का ? असल्यास का ?
व तिचं प्रमाण किती असावं ? ...१२२
६५. इच्छा नसताना अनेक गोष्टी कराव्या लागतात,
अशा वेळी मनाची भूमिका काय ठेवावी ? ...१२४

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

उत्तरायण

ही उत्तरं म्हणजे मी अंतिम शब्द किंवा निकाल समजत नाही. अनेकदा उत्तरांना वेळेच्या व सामूहिकतेच्या मर्यादा असतात. त्यामुळं अनेक मुद्यांचा समावेश उत्तरांत होऊ शकला नाही, हे वाचकांनी कृपा करून समजून घ्यावं अशी प्रार्थना आहे. माझी भूमिकाही कुणा मार्गदर्शकाची नाही. शोधकाची आहे. शोधताना, जाताना सापडलं ते समोर ठेवलं आहे. म्हणून याला शंकानिरसन म्हटलं असलं तरी काहींचं पूर्ण निरसन कदाचित होणार नाही, पण उत्तराच्या दिशेनं विचारसूर्याचा प्रवास – उत्तरायण – तरी सुरू व्हावं, एवढी नम्र भूमिका आहे.